...स. ठाणे.
विषय भू-प्रवास
७९०



REFBK 0028327
REFBK-0028327

[illegible] ढ. ना. जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास ७६०
ग्रा. क्र. ९८३२५
ग्रंथ
शाखा

# शिवनेरी ते रायगड

**डॉ. द. ना. जोशी**

प्रस्तावना

**शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे**

REFBK-0028327

इंप्रेशन्स
पब्लिशिंग हाऊस
३३६०/४ गोंधळी गल्ली, बेळगाव-५९० ००२ दूरध्वनी : ४२१३०९

# शिवनेरी ते रायगड

© डॉ. दत्तात्रय नागेशराव जोशी,
एम.ए., पी.एच.डी.
वसिष्ठाश्रम, तेली गल्ली,
निपाणी.

प्रथमावृत्ती १९९४

प्रकाशक :
इंप्रेशन्स पब्लिशिंग हाऊस
३३६०/४ गोंधळी गल्ली,
बेळगाव - ५९० ००२
दूरध्वनी : ४२१३०९

मुखपृष्ठ :
भरत जगताप, बेळगाव

चित्रकार :
श्री. सुरेश कांबळे, बेळगाव

मुद्रक :
मे. इंप्रेशन्स
३३६०/४ गोंधळी गल्ली,
बेळगाव - ५९० ००२

मूल्य रु. ३०/-
विशेष प्रत
मूल्य रु. ४५/-

इंप्रेशन्स
पब्लिशिंग हाऊस
३३६०/४, गोंधळी गल्ली,
बेळगाव - ५९० ००२.
दूरध्वनी : ४२१३०९

“ चि. सौ. मीना,

चि. सौ. आशा,

चि. सौ. नंदिनी,

चि. पद्मनाभ

तुमच्या स्नेहाळ व
सुसंस्कृत वर्तणुकीप्रीत्यर्थ ”

- दादा

# अनुक्रमणिका

पायघड्या ........................................ ७
शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे

महाद्वारी ........................................ ९

शिवनेरी ........................................ ११

प्रतापगड ........................................ २२

पन्हाळगड ........................................ ३१

राजगड ........................................ ४१

सज्जनगड ........................................ ५०

सिंहगड ........................................ ५८

रायगड ........................................ ६६

# पायघड्या

॥ श्रीशक्ति ॥

स्वस्ति श्री शिवराज्याभिषेक शके ३२० चैत्र शुद्ध प्रतिपदा,

पुरंदरे वाडा, पर्वती, पुणे.

अखंडित लक्ष्मी अलंकृत सकळ गुणालंकरण राजश्री दत्तात्रय नागेशराव जोशी

स्वामी सेवेशी बाबासाहेब पुरंदरे

सेवकाचे प्रेमादरे करोन दंडवत, विज्ञापना,

विशेष तरी आपले किल्ले शिवनेरी ते किल्ले रायगड अशी सात किल्ल्यांची आपण लिहिलेली बखर येका बैठकीत वाचोन काढली. ये सर्वच गड म्यां अनेकवार वास्तव्य करोन बैजवार पाहिले आहेत. येणे करोन आपली ही बखर वाचताना पुनःप्रत्ययाचा आनंद जाहला. ऐसा मनोमनी भास जाहला कीं आपण या गडावरोन आत्ताच प्रत्यक्ष फिरतच आहोत. हेच या बखरीचे यश आहे. आपली कलम हे सातही किल्ले कबजा करण्या फते जाहली आहे.

विशेष तरी गडांचा बारिकसारिक तपशील आपण मोठ्या साक्षेपाने दिला आहे. किल्ले शिवनेरीचा प्राचीन काळापासोनचा इतिहास तारीख-ब-तारीख आपण दिला. आमची तबियत तो वाचोन निहायत खूष जाहली. लेकिन श्रीमंत प्रधानपंत पेशव्यांचे हुकमतीत सदरहू गड इ. स. १७५१त ताबीन जाहला म्हणजेच थोरल्या महाराज शककर्त्या छत्रपती स्वामींच्या स्वर्गवासानंतर तब्बल ७१ वर्षांनी किल्ले शिवनेरी मुक्त होवोन मराठी दौलतीत प्रथमच दाखिल जाहला. अनेक घटना गडावरी जाहल्या त्याचा किमानपक्षी आपल्या बखरीत उल्लेख हवा होता. ये कार्यी आपण गडावर काये म्हणोन रुसवा केलात? तैसेच गडाच्या एका दरवाजावर घोरपडीचे चित्र कोरलेले आपल्या नजरेतून कैसे गळाले? हीच गोष्ट प्रतापगडाचे बाबतीतही जाहली. प्रतापगडाचे बाले किलियावरील राजपहाऱ्याचे दरवाजावर राजेश्री मोरोपंतीं घोरपड कोरली आहे तीही नजरेतून सुटली. असे काही तपशील इतर सहाही किल्ल्यांचे बाबतीत जाहले आहेत. तरी स्वामीस विनंती की बखरीचे पुढील आवृत्तीत ये तपशील बैजवार यावेत म्हणजे आधीच सालंकृत जाहलेल्या या बखरीस जडाव जडेल.

किल्ले पन्हाळगड, राजगड, सज्जनगड आदि किल्ले आपण मातब्बरीने कलमबंद केले आहेत तो तपशील वाचोन ऐसा आनंद जाहला कीं आपल्या लेखणीस मोगरियाचा गजरा माळावा.

स्वामीस या सर्वच गडांचा दर्शनी साक्षात्कार जाहला ऐसे प्रत्ययास आले. या गडांची तर्बियत करो पाहणाऱ्या आजच्या अभ्यासकांस ही बखर फारच मोलाची ठरणार आहे. परंतु येक अर्जी आपणास कराविशी वाटते कीं या गडावर घडलेल्या अतीव रोमांचकारी इतिहासाचा तपशील आपण पुढील आवृत्तीत द्यावा. तो हरगीज मने फुलविणारा ठरेल. आपण या सप्तगडास 'तीर्थक्षेत्रे' म्हणोन संबोधिले. ये केवळ बिनंचूक आहे. परंतु आम्ही शहरी चैनबाजांनी या तीर्थक्षेत्रांची घाण करोन टाकली आहे. येक सज्जनगड वगळता बाकीचे गड म्हणजे दारूबाजांचे अड्डे जाहले आहेत. वीररसांनी आमची मने उद्दीपित होण्याऐवजी उन्मत्त द्रव्य पियोन सैराट वागणारी आणि छिनाल चाळे करणारी आजची पिढी आपल्या बखरीच्या वाचनाने थोडीतरी सावरेल ऐसा भरंवसा वाटतो.

आपल्या कुलीन लेखणीस थोरल्या महाराज शिवछत्रपती स्वामींच्या आज्ञापत्रातील अक्षरांचे अक्षरबळ लाभो हीच श्रीजगदंबेच्या चरणीं प्रार्थना.

बहुत काय लिहिणे?

आमचे अगत्य असो द्यावे, विज्ञापना, राजते लेखनावधि ॥

# महाद्वारी

राजकारणात शिवाजी महाराज, समाजकारणात स्वातंत्र्यवीर सावरकर आणि अध्यात्मात योगीराज ज्ञानेश्वर माउली ही माझी मर्मस्थानं! त्यांच्या गुणांचं संकीर्तन करण्यात मनापासून धन्यता वाटते, आनंद ओसंडून वाहतो.

थोरल्या महाराजांच्या जीवनात अनेक दुर्गांनी आपली मुद्रा उठवली. परंतु त्यातल्या त्यात सप्तदुर्ग हे विशेष लक्षणीय आहेत. थोरल्या महाराजांच्या जीवनाला निर्णायक वळण लावण्याचे, पर्यायाने सर्व जगाचा इतिहास बदलण्याचे कार्य जणूं या दुर्गांनी केलंय असा माझा विश्वास! त्यामुळं त्या 'शिवतीर्थां'ना भेटी देऊन मी जो आनंद अनुभवला, तो इतराना अल्पसा का होईना देता येतो का हे पाहण्याच्या मिषाने मी 'शिवरायांचे दुर्ग' ही एक लेख-माला दै. तरुण भारत, बेळगाव मध्ये लिहिली. त्या लेखमालेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. तीच लेखमाला अल्पशी भर घालून आपल्यासारख्या रसिकांपुढे ठेवत आहे.

ही थोरल्या महाराजांची पुण्याई!

या दुर्गात प्रवेश करण्याआधी शिवचरित्रसंकीर्तक (शिवशाहीर) श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी आपल्यासाठी उत्तम 'पायघड्या' घालून माझं कार्य सुकर करून ठेवलंय, श्री बाबासाहेब यांच्या प्रेमाचा ज्यानी अनुभव घेतलाय त्यांनाच यातलं मर्म कळेल. मी त्यांच्या प्रेमाला पात्र झालोय, मला ते आपला मानतात यातच सारं आलं, ही माझी श्रीमंती आहे.

श्री. गो. नी. दांडेकरांची कृपा ही 'किल्ले' हे त्यांचे पुस्तक वाचून झाली. त्यांचाही या पुस्तक निर्मितीत मोलाचा सहभाग लाभला. आणि बेळगावच्या 'इंप्रेशन्स पब्लिशिंग हाऊस'मुळेच ही सुंदर कृती अस्तित्वात येतेय. त्यांना धन्यवाद देणे आवडणार नाही हे माहीत असूनही एवढेच म्हणता येईल, त्यांच्या अगत्याला सीमा नसते.

या दुर्गात जे चांगलं आहे ते शिवप्रभूंचं आणि जे काही न्यून असेल ते माझं!

तुम्हा रसिकांना हे पुस्तक या 'शिवतीर्थांना' भेट देण्यास प्रवृत्त करण्यात यशस्वी ठरलं तर माझे सारे श्रम सार्थकी लागले असं होईल. तसं घडावं ही कांक्षा!


चला तर,

तुतारी घुमतेय अन् म्हणतेय,

'सावधान! राजे दुर्गात प्रवेश करताहेत, सावधान!'

शिवजयंती २३०

विनीत



ठाणे
कल्याणकडे
ओतूर
नासिककडे
आळे फाटा
शिवनेरी
जुन्नर
नारायणगांव
अहमदनगरकडे
खोपोली
अहमदनगरकडे
पुणे
सिंहगड
रायगड
महाड
राजगड
शिरवळ
सोलापूरकडे
पोलादपूर
प्रतापगड
हर्णे
दापोली
पंढरपूरकडे
महाबळेश्वर
वाई
सातारा
खेड
चिपळूण
सज्जनगड
पंढरपूरकडे
गुहागर
कराड
विटा
संगमेश्वर
पेठ
सांगली
रत्नागिरी
कोल्हापूर
मिरज
राजापूर
पन्हाळा
निपाणी

# शिवनेरी

ग्रं. क्र. २८३२८ २०१/५६८ राज्य

म्हटलं तर महाराष्ट्र हा दगडा धोंड्यांनी भरलेला देश! नाहीतर म्हणा, संतांच्या अमाप पिकानं डंवरलेला प्रदेश!! किंवा सह्याद्रीचा काळा कातळ फोडून त्यात अगणित लेणी खोदून आपली रसिकता प्रकट करणारा रसिक!! का म्हणता त्याला, लाखो वारकऱ्यांच्या रूपाने प्रतिवर्षी न चुकता पंढरीला जाणारा भाविक? अथवा भीमथडीच्या ठेंगण्या, ठुसक्या तट्टावर बसून अटकेपार जाऊन आपल्या तलवारीचा धाक दाखवणारा धारकरी म्हणूया? नकोच, त्याला 'माझा मऱ्हाटाची बोलु कौतुके! परी अमृतातेही पैजा जिंके' असं नम्रपणे पण आव्हानात्मक बोलणारा, मायमाउली मऱ्हाटीवर निस्सीम प्रेम करणारा मराठीचा सुपुत्र म्हणणे योग्य ठरणार नाही का?

नर्मदा-तापी नदीच्या दक्षिण तटापासून कृष्णेच्या खोऱ्यापर्यंत पसरलेल्या 'काळी'ने घडवलेला, अजंठा वेरूळच्या जगप्रसिद्ध लेण्यामुळे ख्यात झालेला, "जानबा-तुकारामा"च्या मंत्रघोषानी गद्‌गद्‌णारा, आणि आतून अध्यात्माच्या जाणीवेने फुलणारा, "हरहर महादेवा"च्या निनादाने रोमांचित होणारा, रामजोशी, होनाजी, प्रभाकर, सगनभाऊंच्या लावणीवर दौलतजादा करणारा, जनाबाई-बहिणाबाई सारख्या साध्वींसमोर किंवा ज्ञानेश्वर तुकारामासम संतांपुढे नतमस्तक होणारा असा हा महाराष्ट्र आहे तरी कसा?

"भले तरी देऊ कासेची लंगोटी नाठाळाचे माथां देऊ काठी"

असं म्हणणारा, प्रसंगी भाबडा, प्रसंगी कठोर वाटणारा अनोख्या, आगळ्या रसायनाचा आविष्कार!

एकाचवेळी मार्दव आणि काठिन्य, अध्यात्म आणि संघर्ष, तसंच रसिकता आणि अलिप्तपणा यांच्या मिश्रणांचा अद्‌भुत नमुना!

अशा या गुणांचं स्वरूप वरवर परस्परविरोधी वाटत असलं तरी त्यात आहे एक सरलता, एक जीवाभावाचं स्नेहाळ सूत्र!

पहायचाय याचा प्रत्यय? चला,

पहा हा शिवनेरी!

शिवनेरीच का? कारण, शिवनेरी परस्परविरोधी वाटणाऱ्या गुणांचं मनोहर प्रतीक आहे.

शिवनेरी !

शिवाजी महाराजांच्या जन्मामुळं पुलकित झालेला, पावन वाटणारा, पण शिवाजी महाराजानासुद्धा आपल्या उरी शल्य जोपासावयाला लावणारा हा दुर्ग आपलं एक वैशिष्ट्य जोपासून आहे! महाराष्ट्रातला हा एकमेव दुर्ग! ज्यानं जवळ जवळ चार पाचशेहे वर्षं आपल्या अंगाखांद्यावर अध्यात्म मिरवलं तो दुर्ग!

जिथं "बुद्धं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि, धर्मं शरणं गच्छामि"

या मंत्राने इथल्या शिवनेरीच्या प्रत्यक्ष दक्षिण, पूर्व आणि पश्चिम दिशांमध्ये असणाऱ्या गुंफांमध्ये अध्यात्माची रोपटी फुलली, पण केव्हा कुण्या पाप्याची दृष्ट लागली कोण जाणे, परंतु, ज्याच्या कबंधात आदराने, मायेने जोपासली गेली होती ती ही अध्यात्म रोपटी सुकत गेली ती कायमची !

असा हा दुर्ग शिवनेरी!

या अध्यात्याच्या उरावर येऊन बसणारा, त्याच्यावर नाचणारा, त्याला तुडवून मातीमोल करणारा तसा तो राजकारणी प्रसंगही या शिवनेरी दुर्गानं आपल्या अंगाखांद्यावर वागविला. तोही चार शतके !

एकाच गडावर अध्यात्म आणि संघर्ष नांदला जाण्याची किमया घडणारा महाराष्ट्रातला एकमेव दुर्ग!

सह्याद्रीच्या उत्तर शाखेमधला एक फाटा ज्या परिसराला व्यापून त्यावर लक्ष ठेवतोय त्या परिसरात असणाऱ्या दुर्गांपैकी एक!

एकेकाळी जगासमवेत व्यापार करणारे बंदर म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या नालासोपारा या बंदराकडे जाण्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या नाणेघाट, दऱ्याघाट यांच्या परिसरात असणारा हा दुर्ग!

या शिवनेरीच्या पायथ्याशी असणाऱ्या जुन्नर नावाच्या गावाने एकेकाळी निजामशाहीचे राजधानीचे गाव म्हणून प्रसिद्धी मिळवली होती. त्या राजधानीच्या गावाजवळून होणाऱ्या व्यापारावर, नाणेघाटावर वा दऱ्याघाटावर लक्ष ठेवता यावे म्हणून सतत सज्ज असणारा हा दुर्ग!

येथल्या परिसरातील कुकडी, मीना, आणि पुष्पावती या तीन नद्यांनी या परिसरात पाण्याची रेलचेल करून सोडलीय म्हणून तर या परिसराला 'मंगल पाण्याचा साठा' असं मानून नोंद झालेय, ती 'नेर' या शब्दानं. या शब्दाचा लाभ उठवणारा शिवनेर!

ये परिसरात असं मंगलमय घडलं, शिवछत्रपतींच्या पुण्यपावन जन्मानं याला इतिहासात नाव मिळालं. शिव म्हणजे मंगल, आणि नेर म्हणजे पाण्याचा साठा!

असा मंगल पाण्याचा साठा म्हणजे शिवनेर!

शिवनेर मधील दुर्ग म्हणून शिवनेरी!!

कुकडी, मीना, आणि पुष्पावती या काही फार मोठ्या नद्या नाहीत, पण या तिघींनी या प्रदेशाला, परिसराला सुजलां सुफलां करून सोडलं. परिणामतः इथं एक संस्कृती भरभराटली. जुन्नरने त्या संस्कृतीला आपल्या वास्तव्याने, वात्सल्याने कुरवाळले. परिणामतः पुष्कळ परकीयांचं लक्ष त्यानं आपल्याकडे वेधून घेतलं. जुन्नर एकेकाळी 'ओमेनगर' म्हणूनही ओळखले जात असावे, कदाचित त्याला 'मीन' म्हणूनही नाव असावे अथवा 'नहपान' नावाच्या एका क्षत्रपाची ती राजधानी असावी. कारण त्या परिसराला 'मिन्नेर' म्हणतात. पण त्यात फार तथ्य नसावेही!

एक मात्र खरं

इ.स. १४७० च्या सुमारास रशियन प्रवासी अफनासीयस् निकीतन जुन्नरला आला होता. तो म्हणतो 'जुनीर' एका मोठ्या दगडी बेटावर बसलंय.

इ.स. १६६२ च्या सुमारास डॉ. जॉन फ्रायर हा इंग्रज भारतात वैद्य म्हणून आला तो जुन्नरचा उल्लेख 'जिनेह' असा करून जवळच एक गड असल्याचा उल्लेख करतो.

त्याच्या आधी महंमद कासीम फरिस्ता हा पर्शियन इतिहासकार विजापूर दरबारातील शहा दुसऱ्या आदिलशहाकडे इ.स. १५५९ च्या सुमारास आला होता. तो विजापुरात १६११ पर्यंत होता. तो शिवनेरीचा 'सुनेरे' आणि जुन्नरचा 'जुनागढ' म्हणून उल्लेख करतो. अशा मंगलमय साठ्यावर या सुजलां सुफलां भूमीवर मुस्लिमानी सतत आक्रमणे केली, अन् एकेदिनी जुन्नर, शिवनेरी त्यांच्या अधिपत्याखाली आले.

साधारणतः इ.स.पू. ९० ते इ.स. ३०० पर्यंत हा परिसर आंध्रभृत्यांच्या अधिपत्याखाली होता. पुढे राष्ट्रकूटांनी त्यावर आपला अधिकार बसवला तो १०० वर्षे! पुढे इ.स. ६७० च्या सुमारास चालुक्य राज्य सरले आणि पुनः राष्ट्रकूटानी हा परिसर जिंकून घेतला. पण पश्चिमेकडील चालुक्यांनी ९७३ पासून ११९० पर्यंत इथं राज्य केलं, पण हा परिसर देवगिरीच्या यादवांनी आपल्याकडे आणण्यात यश मिळवले. इ.स. १२९४ ला अल्लाउद्दीन खिलजी विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेत उतरला. इ.स. १३१८ ला यादवांचे राज्य त्याला गेले. पण १३४७ ला अल्लाउद्दीन गंगू बहामनीने दिल्लीश्वर खिलजीचे नेतृत्व झिडकारून गुलबर्गा येथे बहामनी (ब्राम्हणी) राज्य स्थापले. राज्यकर्ते दूरदृष्टी ठेवणारे होते म्हणून हे राज्य १५० वर्षे टिकले. पण इ.स. १४६० च्या तसेच १४७२, ७३ च्या दुष्काळाने याचे कंबरडेच मोडून काढले आणि या बहामनी राज्याचे पाच तुकडे पडले. इ.स.

१४८५ च्या सुमारास महंमद गवानच्या मुलाकडे म्हणजेच मलिक अहमदकडे या प्रदेशाची व्यवस्था पाहण्याचे काम आले.

या मलिक अहमदने जुन्नर ही आपली राजधानी बनवली. आपल्या कुटुंबियांच्या रक्षणासाठी शिवनेरीचा उपयोग केला, आणि अशारीतीने जुन्नर तसेच शिवनेरी ही ठिकाणे अध्यात्माची केंद्रे जाऊन राजकारणाची ठिकाणे बनली गेली.

अत्यंत भव्य, काटकोनात कोरलेली लेणी, शिवाजी महाराजांचे जन्मस्थान, नि उभ्या कपारी यासाठी प्रसिद्ध असणारा हा दुर्ग तुम्हा आम्हा सर्वांचे लक्ष वेधून घेत राहिलाय तो त्याच्या आगळ्या वेगळ्या ऐतिहासिक वैशिष्ठ्यामुळे होय.

जुन्नर नगरीच्या नैऋत्येला २ मैलांवर असणारा हा दुर्ग प्रथमतः कोणी बांधून काढला हे सांगणे कठीण आहे. राष्ट्रकूट राजवटीच्या अंतिम पर्वामध्ये केव्हातरी याची निर्मिती असावी असं भासतं. गडावरील तटबंदी, बुरूज इत्यादी बांधकाम वेगवेगळ्या काळातले आहे यात संशय नाही.

या दुर्गावर असणाऱ्या 'शिवाई' देवीच्या तांदळावरून प्रारंभी मावळे आणि कोळी यांच्या आधिपत्याखाली याने या परिसरावर आपले आधिपत्य गाजवले असावे.

इ.स. १४४३ मध्ये मलिक-उल-तुजार याने येथे आधिपत्य गाजवणाऱ्या मावळे, कोळी यांचा पराभव करून प्रथम हा आपल्या आधिपत्याखाली आणला. पण मावळे, कोळी यांनी तो परत मिळवला. पुढे १४८५ मध्ये मलिक-उल-तुजारचा प्रतिनिधी 'निजाम-उल-मुल्क बहिरी' म्हणजेच मलिक अहंमदने हा पुनः जिंकून याला आपल्या कारभाराचे मुख्य ठाणे बनवले. आणि अशा रीतीने निजामशाही राजघराण्याच्या पहिल्या राजधानीचा मान शिवनेरीने मिळवला. इ.स. १४८६ चा हा कालावधी आहे. याच दशकात मलिक अहंमदने देवगिरीवर आपल्या मेहुण्याचा वध झाल्याची वार्ता घेऊन येणाऱ्या बहिणीच्या सांत्वनासाठी चाल केली पण तो त्याला जिंकता आला नाही. देवगिरी एव्हांना दौलताबाद झाला होता. जुन्नरपासून तो दूर असल्यानं मलिक अहंमदने इ.स. १४९० च्या सुमारास सीना नदीकाठी नवी राजधानी बनविण्याचा निश्चय केला. तेथून दौलताबाद दुर्ग आणखी जवळ येणार होता. एवढ्यात 'सीना' नदी काठी नवी राजधानी बांधून काढायची याला एक जोरदार कारण मिळाले. बहामनी राज्याचा बादशाह महंमद शाह बहामनी दुसरा याने विजापूरच्या युसूफ आदिलशाह यास आणि चाकणच्या सुभेदारास मलिक अहंमदचा बंदोबस्त करण्यास पाठवले. परिणामतः मलिक अहंमदने आपले कुटुंब शिवनेरीवर ठेवले आणि चाकणचा सरदार तसेच युसुफ आदिलशाह याचा समाचार घेण्यासाठी तो भिंगारकडे निघाला. त्याने २८ मे १४९० दिवशी

भिंगारजवळ बहामनी सैन्याचा पराभव केला. त्या विजया प्रीत्यर्थ ज्या जागी त्याने विजय मिळवला त्याला त्याने "निजाम बाग" हे नाव दिले. आपल्याला ही जागा "लाभप्रद" आहे असं वाटल्यानं त्यानं १४९४ पर्यंत "निजामबाग" बंदिस्त करून घेतली. तोच आजचा अहमदनगराचा सुप्रसिद्ध तसाच ऐतिहासिक दुर्ग होय! अन् त्या दुर्गाच्या पश्चिमेस जी राजधानी वसवली ते ठिकाण म्हणजे आजचे अहमदनगर होय.

इ.स. १४९४ ला मलिक अहंमदने शिवनेरीहून आपली राजधानी हलवली आणि अशा रीतीने शिवनेरीचा राजधानीचा मान संपला तो संपलाच. केवळ आठ वर्षांच्या कालावधीत तिथं पुष्कळ घडामोडी घडल्या. नाही असं नाही, पण शिवनेरीचे तेज सरले ते १६३० पर्यंत!

या शंभर सव्वाशेहे वर्षांच्या कालावधीत शिवनेरी तसा गाजला नाही. इ.स. १५९५ मध्ये शिवाजी राजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांना बहादुर निजामशाह दुसरा याने पुणे, सुपे, चाकण आणि शिवनेरीची जहगिरी दिली. आणि 'राजे' ही उपाधीही दिली. या प्रसंगाने शिवनेरी अल्पसा प्रकाशझोतात आला.

इ.स. १६३० च्या सुमारास शिवनेरीचे दुर्गाधिपती (किल्लेदार) म्हणून विजयराव सिद्धोजी विश्वासराव यांची नियुक्ती झाल्याचे आढळते. शिवाजी राजांचे ज्येष्ठ बंधू संभाजी राजे यांचे ते सासरे होत. शहाजीराजे यांनी आपल्या व्याह्याना दुर्गाधिपती नेमून पुढचा सारा व्यूह रचला.

शिवनेरी हा तसा नगरपासून दूर, तसंच विजापूर पासूनही फार फार दूर, त्यामुळे युद्धभूमीचं स्वरूप लाभण्याची शक्यता जवळ जवळ नव्हती. परिणामतः आपल्याला होणाऱ्या दुसऱ्या अपत्याला रणभूमीची झळ लागण्याची परिस्थिती नाहीच असा विचार शहाजी राजांनी या दुर्गाची निवड करण्यामागे केला होता. तसंच सुपे, चाकण, पुणे या जहागिरीची व्यवस्थाही येथून करणं सोपं होतं. राजकीय धामधूम लक्षात घेऊन केलेली ही निवड किती योग्य होती हे इतिहासाने सिद्ध केलंय. अशा रीतीने शहाजी राजांनी शिवनेरीला एक आगळे वेगळे महत्त्व मिळवून दिलं, यात संशय नाही.

अतिशय सोपा, परंतु तितकाच उंच, आटोपशीर पण भव्य असा हा दुर्ग सभोवती प्रचंड दऱ्या डोंगरांनी व्यापलेला नसताही एकांगी अभेद्य वाटतो. या गडाकडे पाहिल्यावर आपल्याला एक गोष्ट निश्चित लक्षात येते ती ही की हा एका अभेद्य एकसंध कातळावर उभा आहे.

आज जुन्नर केवळ तालुका स्वरूपात ओळखलं जातेय. पण एकेकाळी याच जुन्नरने बावन्न मावळांच्या कारभाराचे प्रमुख केंद्र म्हणून मान मिळवला होता.

यातला एक मावळभाग बेळगाव परिसरातला होता हे लक्षात घेतल्यास त्या नगरीचे महत्त्व कसे होते लक्षात येईल. अशा या जुन्नरच्या पश्चिमेस असणाऱ्या नव्या परिवहन आगाराच्या जवळपास असणाऱ्या डांबरी रस्त्याने आपणास शिवनेरीच्या दक्षिण भागास जावे लागते, कारण दुर्गाचे बहुतेक मार्ग तिथं एकवटले आहेत, स्टॅंडपासून जवळ भासणारा हा दुर्ग तसा त्रिकोणी आकाराचा नसला तरी आडवा ठेवलेल्या नारळासारखा भासेल असं म्हणता येईल.

आता दुर्गाच्या प्रमुख प्रवेशद्वारापर्यंत चार चाकी वाहने सरळ जावू शकतात, पण गडाचा राबता तसा नव्हता.

संपूर्ण भारतात एकूण १४०० लेणी आहेत, त्यापैकी जवळजवळ १००० लेणी महाराष्ट्रात आहेत. यापैकी जुन्नर परिसरात सर्वाधिक आहेत. त्यातल्या त्यात शिवनेरीच्या पूर्वगटात ९५ लेणी, ६ शिलालेख, दक्षिण गटात ३७ लेणी आणि ३ शिलालेख तर पश्चिम गटात १२ लेणी आहेत. त्यामुळे शिवनेरीवर राबता होता तो दक्षिण बाजूने! याचा अर्थ असा की राज्यकर्त्यांनी दुर्गावर येण्यास सोयीचा भाग म्हणून दक्षिण भाग निवडला, कारण त्या दिशेला एकदम तुटलेला कड्याचा भाग नाही. मात्र आजसुद्धा पूर्व भागातून चोरवाटेने दुर्गावर चढता येते, वा तेथून उतरता येते.

सर्वसामान्य माणसाने, जुन्नरच्या राज्य परिवहन आगाराजवळ असणाऱ्या वाटेने दुर्गाच्या दक्षिण भागापर्यंत यावे.

साधारणतः ३२५ मीटर उंच आणि दक्षिणोत्तर दीड किलोमीटर लांबीचा हा दुर्ग तसा अवघड नाही. केवळ तीन-चार तासात तो पूर्णपणे पाहून निवांतपणे परतता येण्यासारखा आहे.

दुर्गाचा दक्षिणेकडील भाग अर्धगोलाकृती असून उत्तरेकडे तो एवढा निमूळता होत गेला आहे की उत्तर टोकावर केवळ १० X १५ फूट आकाराची एकमेव जागा आपणास आढळते. या जागेवर एक खोली बांधून काढलेली होती आणि तिथे राजबंदी अथवा अशा प्रकारच्या अभियुक्ताना (कैद्याना) ठेवले जाई. कारण अगदी जवळच "कडेलोटाचे स्थळ" आहे. शिवनेरीवर अशारीतीने कडेलोटाची शिक्षा कार्यवाहीत आणल्याचे पुरावेही आहेत.

आपण दक्षिण भागासमीप आलो की पायथ्याशी "भातखळे" नावाचे ओसाड गाव दिसते. १५ व्या शतकाच्या, १६ व्या शतकाच्या मुस्लिम राजवटीत इथं बाजार भरे, दुर्गाची ती एक पेठ होती असं आढळून येतं.

आपण तसंच चालत राहिलो की दक्षिणेकडील नागमोडी मार्गाने आपणाला दुर्गाचे पूर्वाभिमुख पहिले महाद्वार लागते. नैऋत्येस तुटलेला कडा दिसतो, तेथे ३०

ते ४० मीटर लांबीची बुरुजासह बांधलेली तटबंदी आपल्या दृष्टीपथात येईल. या परिसराला 'जिभेचा पाडा' म्हणून ओळखतात.

पहिले महाद्वार संरक्षणाच्या दृष्टीने म्हणावे तेवढे बलाढ्य वाटत नाही. मात्र पुढे गेले की डावीकडे एक बुरूज लागतो, त्याला 'मांग बुरूज' म्हणतात, त्याची भिंत साधारणत: केवळ २ मीटर उंचीची असून त्यात बंदुकासाठी 'जंग्या' आढळतात. अल्पसे चालून गेले की दुसरे महाद्वार लागते, त्याला 'परवानगीचा दरवाजा' म्हणतात इथेही बंदूका आणि शतघ्नी (तोफा) यांच्यासाठी जागा आहेत. या द्वाराच्या कमानीच्या दोन्ही बाजूस हत्ती कोरलेले आहेत. वाघाच्या पायाखाली आणि मागील बाजूस हत्ती कोरले आहेत. असे शिल्प मुस्लिम स्थापत्य शैलीचा प्रभाव दर्शविते.


या तटबंदीसमान दारापासून पुढे काहीसा भाग सपाटीचा आहे. डावीकडे तटाच्या उंच भिंती तर उजवीकडे कठडेवजा भिंती आहेत.

तिसऱ्या महाद्वाराला 'हत्ती दरवाजा' म्हणतात. येथला तट साधारणत: ७ मीटर उंच आहे. यानंतर येतो तो 'पीराचा दरवाजा' इतर महाद्वारापेक्षा विशेष भक्कम बांधणीचे हे द्वार जवळच एक पीर असल्याने, तसेच काही घरांचे अवशेष यामुळे त्यातल्या त्यात महत्त्वाचे द्वार म्हणून ख्यात होते. या दरवाजाच्या जवळ अश्वशाळा होती असे अनुमान काढता येणाऱ्या गोष्टी आजही दिसतात.

यानंतर एक महत्त्वाचे महाद्वार लागते 'शिवाबाई दरवाजा' हे याचे नाव, अणकुचीदार लोखंडी खिळे ठोकून याच्या संरक्षणाची व्यवस्था केल्याचे जाणवते. या महाद्वारातून आत आले की दोन वाटा फुटतात. पूर्वेकडे जाणारी म्हणजे उजवीकडील वाट आपणास शिवाई मंदिराकडे नेते. आधी शिवाई देवीचे दर्शन घेऊनच पुढचा 'गड सर करणे' योग्य होय.

शिवाई मंदिर दगडी असून चौथरा पाच मीटर उंच वीस मीटर लांब आणि आठ मीटर रुंद आहे. सभामंडपात दोन ओळीत पाच पाच लाकडी खांब आहेत. गाभाऱ्यात चतुर्भुज देवीची मूर्ती आहे. शिवकालातील देवीचे मूळास्वरूप 'तांदळा' असे सांगितले जाते. जुन्नरहून एक पुजारी प्रतिदिनी इथे पूजा अर्चा करण्यास येतो. मंदिराच्या पश्चिमेस कातळात पाण्याची दोन प्रचंड कुंडे कोरलेली आहेत. मंदिराच्या नैऋत्य दिशेस एक सुंदर प्रवेशद्वारस्वरूप भारतीय स्थापत्यशास्त्रानुसार बांधलेली वास्तू आढळते. बांधकाम शैलीनुसार ती १८ व्या शतकातील पेशव्यांनी बांधलेली वास्तू वाटते. कारण शिवाई मंदिराचा मंडप पेशवे शैलीचा आहे. मूळ देवी बौद्ध कालीन लेण्यात होती. त्या लेण्यापुढेच सभामंडप बांधवल्याचे जाणवते.

शिवाई मंदिराच्या खाली उजव्या बाजूस असणाऱ्या कडेकपारीत बौद्ध लेणी आढळतात. दुर्गाच्या संरक्षणासाठी तट आणि बुरूज बांधून काढल्याचे जाणवते.



*शिवाई मंदिर, शिवनेरी*

शिवाई मंदिरापासून परत शिवाबाई दरवाजाकडे येऊन पुढे गेले की पाच मीटर उंचीचा 'फाटक दरवाजा' लागतो आणि जवळच १५-२० मीटर अंतरावर दुर्गाचा सातवा आणि शेवटचा 'कुलापकर दरवाजा' लागतो. हा दरवाजा चढून वर आले की सपाटीचा भाग अन् अनेक वास्तूंचे अवशेष आढळतात. आपल्या उजव्या हाताला एक टेकडी लागते, तर डाव्या हातास ४० मीटर दूरीवर ६० x ३० फूट लांब रुंद जुनी वास्तू दिसते. बांधणीवरून ती शिवपूर्वकालातील आढळते. ही वास्तू निजामशाहीच्या संस्थापकाच्या काळातील आहे असे मानतात. या वास्तूच्या छताला छिद्रे असून प्रसंगी ती उजेडासाठी वा खेळत्या वायूसाठी असावीत असे वाटते.

या वास्तूकडून उत्तरेकडे चालत राहिले की वाटेत डाव्या हाताला पाण्याची टाकीं दिसेल, दूरवर पश्चिमेस सह्याद्रिची रांग दिसेल, पुढे पुसट नाणेघाट दिसेल. तसेच चालत राहिले की एक जोड टाके दिसेल त्याला गंगा जमुना म्हणतात. मूळ डोंगरात कोरलेले हे टाके आजही तेवढेच शुद्ध पाणी पुरवते.

अल्पशा अंतरावर महाराष्ट्र शासनाने बनवलेली आधुनिक स्वरूपाची वास्तू दिसते. २७ एप्रिल १९६० ला या शिव स्मारकाचे उद्‌घाटन झाले. बाल शिवाजी आणि जिजाबाई यांचे सुरेख शिल्प या वास्तूत आहे.

या नव्या वास्तूच्या समोर उभे राहिल्यास आपल्या उजव्या हातास "कमानीची मशीद" या नावाने ओळखली जाणारी दोन मनोरे असणारी एक वास्तू दिसेल. ती एक खोलीवजा मस्जिद आहे. कमानीवर कुराणातली बोधवाक्ये असून दोन बाजूस मुगलकालीन लेख आहेत. समोरच एक टाके आहे त्याला लागून मशिदीच्या खाली डोंगराच्या गुहेत कोरलेली एक पुष्करणी आहे. हे पाहून पुनः मशिदीकडे परतावे. समोरच एक उद्‌ध्वस्त जोते आढळते. एके काळचा हा सरकारवाडा. या सरकारवाड्यातील स्नानगृह अवश्य निरखावे. लहान लहान खोल्या उद्‌ध्वस्त भिंती पहात आपण एका औरस चौरस पुष्करणीजवळ येतो. शिवछत्रपती याच परिसरात जन्मले याची काही मंगल चिन्हे आढळू लागतात ती पहावीत. 'शिंदखेड राजा' इथे जन्मलेल्या जिजाऊ राणीसाहेब मोठ्या धीराच्या! त्यांच्यासारखी तेजस्वी माता विरळीच! आपला ज्येष्ठ पुत्र संभाजी सतत आपले पती शहाजी राजासमवेत असतो. यावनी शासनाची सेवा करतो हे बहुधा त्यांना आवडत नसावे. आपला बाळ आपल्यापाशी असावा, त्यानं स्वतः राजा व्हावं असं त्यांना मनोमन वाटत असावं, पण पतिव्रतेचा वसा घेतलेल्या जिजाऊंनी आपल्या ज्येष्ठ मुलाला पतीसमवेत यवनशासनाच्या सेवेत जाण्यास विरोध केला नाही.

मात्र दुसरा पुत्र आपण घडवायचा या विचाराने त्यांनी काही निश्चय करून ठेवले असावेत. आपल्या ज्येष्ठ मुलाचे सासरे विश्वासराव यांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या या दुर्गात त्या साधारणतः अडीच वर्षे तरी असाव्यात.

याच काळात त्यांनी या शिवनेरीवर शिवाजी राजाना रामायण महाभारतातील कथा ऐकवल्या, चांगले कोणते, वाईट कोणते यांची पारख करण्याचे शिक्षण दिले. दुर्जनांचा निःपात केला पाहिजे, सज्जनांना रक्षण मिळत गेले पाहिजे हे बिंबवले. राजा सहृदयी, परंतु तेवढाच न्यायी न्यायदाता हवा. कठोर परंतु परिणामी कल्याण करणारा निर्णय कार्यवाहीत आणण्याचे धैर्य असणारा शासक हवा, प्रजेचा स्वामी असूनही आधी सेवक आहोत असे मानणारा योगी हवा, नि त्यानुसार वृत्ती करण्याची क्षमता अंगी बाणवणारा कर्ता पाहिजे. ही जीवनप्रणाली नि आयुष्यभराचे महान तत्त्व त्यांनी शिवबाच्या मनी रुजवले ते इथेच! याच शिवनेरीवर! शिवप्रभू घडवला गेला तो याच स्थळी!

जिजाऊला दास्यत्वाची कल्पनाच सोसवत नव्हती! या दास्यत्वामुळेच तिचे वडील आणि तीन भाऊ देवगिरीवर सुल्तानाकडून विनाकारण मारले गेल्याचे वृत्त

तिने ऐकले होते. तसेच आपला आणखी एक सख्खा भाऊ भोसल्याकडून मारला गेल्याचे तिने दु:ख सहन केले होते. सख्खा भाऊ आणि पती दोघेही यवनांचे दास्यत्व करताना नाती विसरतात हे तिने अनुभवलेले होते. म्हणून तर तिने निश्चय केला होता स्वत:चं राज्य स्थापायचा! तिला हवा होता आपला राजा, आपला ध्वज, आपली सेना, आपले राज्य!

जिजाऊ त्या स्वराज्य स्थापनेचे बाळकडू शिवनेरीच्या याच वाड्यात बालशिवाजीला पाजवीत त्याला वाढवीत होती. अशी ही वास्तू!

या पुष्करणीच्या पूर्वेस एक दोन मजली वास्तू आढळते. कोल्हापूर शाखेच्या छत्रपती शाहू महाराजानी इ.स. १९२५ च्या आसपास ही वास्तू बांधून काढली, ती छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थानाने पवित्र असणारी वास्तू त्या काळातील स्थापत्यानुसार बांधल्याचे जाणवेल. काळोख्या भागात राजानी पहिला हुंकार भरला



*शिवजन्मभूमी – शिवनेरी*

आणि साऱ्या महाराष्ट्राला ओरडून सांगितले "मा भी:" (भिऊ नकोस) दुर्गावरील ही एकमात्र वास्तू पाहून झाली की कारंज्याकडून या वास्तूच्या उतरेकडील बाजूने पूर्वेकडे वळावे. तिथं असणारा उंबरा अवश्य पहावा. सूर्यचंद्र चिन्हांनी, शुभ

लक्षणानी युक्त असणारा हा उंबरा त्याकाळचे स्मरण करून देईल. तसेच पुढे उत्तरेकडे गेल्यास आता सुकलेला पण एकेकाळी मस्त विहार करण्यास उपयुक्त असणांरा तलाव, आत असणारा कारंज्याचा स्तंभ, त्याची बांधणी इ. पाहून पुढे निघावे.

दुर्गाच्या उत्तरेकडील टोकाला आपण आलेले असतो. तिथंच 'कैदखाना' आढळेल. त्याच्या उजवीस कडेलोटाची जागा पहावी अन् मागे परतावे, शिवस्मारक असणाऱ्या वास्तूच्या मागे असणाऱ्या टेकडीवर चढावे. तेथला इदगा आणि चबुतऱ्यावरील घुमटी पहावी, परत फिरावे आणि कमानी मशिदीजवळून जाणारी चोरवाट शोधावी, अत्यंत कौशल्याने त्या वाटेने उतरावे आणि लेण्यामध्ये प्रवेश करावा हवी तेवढी लेणी पाहून पुनः मूळ पदाकडे यावे. निरनिराळ्या वृक्ष राजीमधून खाली उतरावे. दुर्गाकडे वळून पहावे. त्याची भव्यता जाणवेल. इ.स. १६७० मध्ये शिवाजी राजानी यावर धावा बोलला होता, पण त्याना तो जिंकता आला नव्हता, इ.स. १६५७ मध्ये जुन्नर नगरीवर छापा टाकून तीन लाख सुवर्ण मोहरा, २०० घोडे, मौल्यवान वस्तू मिळवूनही शिवनेरीकडे पाठ फिरवावी लागली होती. १६७५ मध्ये केलेला तिसरा प्रयत्नही अयशस्वी ठरला होता. याची आठवण करावी. एकेकाळी १५ लाख मोहरा उत्पन्न असणाऱ्या जुन्नर प्रांताच्या प्रमुख ठाण्याकडे यावे. ज्या गावाने महाराजाना प्रेरणा दिली, पण आता ज्याचे वैभव सरले त्या जुन्नराकडे येण्यास निघावे, मनी म्हणावे --

'भवानी आमुची आई शिवाजी आमुचा राजा

मराठी आमुची बोली गनिमी आमुचा बाणा!'

गनिमी कावा शिकवणाऱ्या, प्रत्यक्षात आणणाऱ्या महाराजांच्या जन्मस्थानाला पुनः भेटणार असा निश्चय करावा. कारण ते एक शिवतीर्थ आहे. शिवनेरी शिवतीर्थ आहे यात संशय तो कोणता? महाराष्ट्राचे ते प्रेरणास्थान आहे यात संभ्रम कसला? आम्ही आज जे आहोत ते महाराजांमुळे. म्हणून म्हणावे, जगदंब! जगदंब!! जगदंब!!!

● ● ●

# प्रतापगड

श्री शिवछत्रपती ज्या ज्या जीवघेण्या प्रसंगातून निभावून पुनः तेजाने उजळून निघाले आहेत त्या प्रसंगात प्रतापगड येथील अफझुलखान वध प्रसंग, आगरा येथील रक्तदुर्गामधून व्यवस्थित सुटका आणि पन्हाळगडहून विशालगडाकडे प्रयाण हे प्रसंग विशेष महत्त्वाचे आहेत.

त्यामुळे प्रतापगड, आगरा, पन्हाळगड या दुर्गांचे महत्त्व छत्रपती महाराजांच्या जीवनात अनन्यसाधारण आहे.

आगरा येथील रक्तदुर्ग, स्वराज्यापासून शेकडो योजने दूर! त्या दुर्गातून सुटका करून घेणे साधेसुधे काम नव्हते. आगरा येथे गेलो की आपण जिवंत परत येऊच याची शाश्वती नसतानाही महाराज तिथे गेले, एवढेच नव्हे तर आपल्या युवराजाला, त्यानी 'चल' म्हणून सुचवले. मिर्झाराजे जयसिंहाचे निमंत्रण स्वीकारून त्यानी आगरा येथे जाण्याचे प्रस्थान ठेवले. कारण आपल्या शत्रूचे सामर्थ्य 'ऐकून' ठरवण्यापेक्षा प्रत्यक्ष 'पाहून' निश्चित करणे महत्त्वाचे असते हे महाराजाना पूर्णपणे ज्ञात होते. तशी संधी मिळताच त्याचा लाभ उठवणे हे खऱ्या राजकारण्याचे धोरण असते.

या साऱ्या गोष्टींचा सांगोपांग विचार करूनच श्री शिवछत्रपती आगऱ्यास गेले होते. 'बेसावध' असणे हा शब्द महाराजांना मान्य नव्हता. सांगोपांग विचार करीत असता एखादा कच्चा दुवा आढळल्यास त्यावर विशेष विचार होऊनंच मग त्या योजनेवर तसा हात फिरवला जाई, त्यामुळे सहसा अपयश वा पराभव, झेलण्याची वेळ महाराजानी स्वतःवर येऊ दिली नाही.

आगरा असो वा पन्हाळगड, नाहीतर प्रतापगड किंवा लालमहाल असो, या सगळ्यानी विशेषतः पहिल्या तिघांनी महाराजांच्या जीवनावर क्षणभर का होईना चिंतेचे सावट पसरविले होतेच! प्रतापगडाची योजना आखताना त्याना सातत्याने चिंता सतावीतच राहिली, कारण त्यांच्या आयुष्यातला तो तसा पहिलाच 'जीवघेणा' प्रसंग होता. पण 'निराशा शूराच्या कधीही हृदया स्पर्श न करी' या न्यायाने महाराज सारे कामकाज हाकीत होते.

राजगड!

स्वराज्याची पहिली राजधानी! पंचवीस वर्षे सतत हिंदवी स्वराज्याचा कारभार जेथून चालवला जाई अशा दुर्गात सगळेच चिंताग्रस्त असत ते अफझलखान

स्वराज्याचा घास घेण्यास निघालाय या वार्तेने! इ.स. १६५९ चा म्हणजे शके १५८१ चा पाडवा तसा विचारग्रस्त मनानेच साजरा झाला.

सतत चर्चा घडे, विचारांची देवाण घेवाण किती झाली याची गणना करणं अवघड झालं!

एक गोष्ट निश्चित होती ती ही की अफझलखान स्वराज्याचा घास गिळण्यास येतोय तेव्हा त्याचाच घास गिळता येईल का हे पाहणे. हा विचार अत्यंत धाडसाचा होता. केवळ तीन वर्षे आधी म्हणजे १६५६ ला शिवाजी महाराजांचे सख्खे ज्येष्ठ बंधू संभाजीराजे अफझलखानाच्या कार्यवाहीमुळे मारले गेले असल्याने शिवाजी महाराजानी असा विचार करण्यास प्रारंभ केला होता. त्या दृष्टीने चाचपणी प्रारंभली होती. त्यातून महाराजानी निर्णय घेतला. अन् त्यानी प्रतापगडाकडे जाण्याचा निश्चय केला!

प्रतापगडाला जाऊन तेथून सूत्रे हलविण्यास प्रारंभ झाला. नि प्रतापगडाच्या पायथ्याशीच खानाच्या भेटीची योजना निश्चित झाली सुद्धा!

प्रतापगड!

अफझुलखानाच्या भेटीसाठी निवडलेला प्रतापगड तसा फार मोठ्या विस्ताराचा आहे असे मुळीच नाही. तसेच तो अजेय आहे अशातलाही भाग नाही. रायगडासारखा अभेद्य, राजगडासमान दुर्भेद्य नसतानाही महाराजानी तोच दुर्ग का निवडला?


महाराजांची दूरदृष्टी इथे लक्षात येते. शत्रूला अत्यंत अडचणीच्या स्थळी खेचायचे अन् त्याच वेळी आपणास अत्यंत सोयीच्या स्थळाची निवड करून तिथे शत्रूवर तुटून पडायचे ही युद्धनीती साधण्यासाठी महाराजांनी या दुर्गाची निवड केली! आहे त्या साधनसामुग्रीचा अधिकात अधिक लाभ उठवीत असता आपली हानी कमीत कमी व्हावी हे पहात शत्रूची सर्वात अधिक हानी करायची हा उद्देश ठेवूनच महाराजांनी प्रतापगडाची निवड केली!

कारण जावळीच्या खोऱ्यात असणारे चंद्रगड, मकरंदगड, कांगोरी, सोनगड हे स्वराज्यात आले ते इ.स. १६५६ ला. जावळीच्या जवळच पारघाटाच्या तोंडावर आणि रणतोंडी घाटाच्या नाकासमोर एक डोंगर अगदी विश्वासू रामोशासारखा बसला आहे. त्याला म्हणतात भोरप्याचा डोंगर! महाराजांचे लक्ष नेमके त्यावर गेले. देशावरून कोकणात जाणाऱ्या मार्गावर वचक ठेवता येईल अशा जागा निवडून महाराजानी दुर्ग बांधले. त्यात घाटावरून महाडला जाणाऱ्या मार्गावरील जावळीचे खोरे विशेष महत्त्वाचे होते. कारण नालासोपारा, जंजिरा अशा स्थानांना जाण्यास

हा मार्ग विजापूरकराना त्यातल्या त्यात जवळचा वाटे. एका अर्थाने हा राजमार्गच आपल्या दृष्टीच्या टप्यात, तसाच दडपणाखाली आल्यास शत्रूवर वचक ठेवण्यास सुलभ होणार होते अन् दुसऱ्या अर्थाने हा 'खिंडमार्ग' दळणवळणाच्या तसेच व्यापाराच्या दृष्टीने उपयुक्त, लाभप्रद असल्याने शिवाजी महाराजांनी या स्थानाकडे लक्ष देऊन त्याचा विकास केला, अन् एकेकाळचा भोरप्याचा डोंगर 'प्रतापगड' म्हणून प्रसिद्ध पावला.

मोरोपन्तानी जावळीच्या परिसरातील प्रतापगडावर वाडे, सदरा, तळी, चोरवाटा, चिलखती बांधणीची तटबंदी आणि 'बालेकिल्ला' या साऱ्यांची योजना करून दुर्गास आवश्यक त्या सुविधा पुरविल्या. इ.स. १६५६ च्या वर्षी डोंगरावरील एका जाईच्या वेलीखाली एक स्वयंभू शिवलिंग सापडले, त्यावरती राजांनी देऊळ बांधून त्याला नाव दिले केदारेश्वर! आजही प्रतापगडाचे वैभव वाढवतोय तो!

दुर्गाच्या पूर्वेस महाबळेश्वराचा प्रचंड डोंगर, दक्षिणेस नि उत्तरेस उंच उंच पर्वतपुत्र तर पश्चिमेस दरीखोरी! असा हा दुर्गम परिसर!



*प्रतापगड एक दर्शन*

सबंध मावळपट्टीत प्रतापगडाइतका अडचणीचा नि बिकट दुसरा दुर्ग नाही. गडाभोवती अरण्य इतके घनदाट की तिथं काय लपलंय याची निश्चिती करणे कठीण!

महाबळेश्वराचा आणि जावळीचा सारा परिसर आजही दऱ्या खोऱ्याने, घनदाट अरण्याने वेढलेला आहे, मग तीनशेहे वर्षांपूर्वी काय अवस्था असेल हे कल्पनेने जाणणेच बरे!

अशा या दुर्गास पोहोचण्यासाठी जी चढण चढावी लागते ती आंबेनळीपासून! आंबेनळी या पायथ्याच्या गावापासून डोंगराची चढण प्रारंभते. जवळ जवळ पाऊण मैल चढण चढली की आपण दुर्गाच्या परिसरात येतो. समुद्रसपाटीपासून जवळ जवळ ३५०० फूट उंच असणारा हा दुर्ग आंबेनळीहून चढायला ४० ते ४५ मिनिटे घेतो. आता महाराष्ट्र शासनाने थेट पायथ्यापर्यंत पक्क्या बांधणीचा मार्ग निर्माण केल्याने डोंगर चढण्याचे कष्ट घेतले जात नाहीत. दुर्गाच्या महाद्वारापर्यंत वाहने जाऊ शकतील अशी व्यवस्था असूनही अफझलबुरुजापर्यंतच वाहने नेता येतात. आंबेनळीपासून दुर्गाच्या अफझल बुरुजापर्यंतची चढण ६०० मीटर उंचीची होते. ज्याला जे आवडेल ते त्याने करावे! चालत वा वाहनाने!

पण दुर्ग चढणीचा आनंद घेणाऱ्यानी मात्र काही गोष्टी अवश्य कराव्यात. या दुर्गाच्या पायथ्याशी 'पार' नावाच्या गावात असणाऱ्या देवीचे दर्शन घ्यावे. प्रतापगडाच्या निर्मितीच्या आधीपासून ही माउली तिथं वास्तव्य करून आहे. लिंगायत मतानुयायींपैकी पुष्कळांची ही कुलस्वामिनी आहे.

समर्थ रामदासानी अफझलखानाच्या भेटीच्या क्षणी या देवीला सांकडे घालून तिने महाराजाना बळ द्यावे, यश द्यावे अशी विनंती केली होती. समर्थांची विनंती तिने मानली म्हणून आज ती 'रामवरदायिनी' म्हणून ओळखली जाते. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी या देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला होता.

या मंदिराजवळच नदीवर शिवकालीन लहानसर दगडी बांधीव पूल आहे. प्रतापगडाकडे येण्यासाठी बारमाही सौकर्य लाभावे म्हणून शिवाजी राजांनी तो बांधलाय. आज त्याच्याकडे दुर्लक्ष झाले आहे हे सत्य आहे पण इतिहासप्रेमीनी तो अवश्य पहावा.

प्रतापगडाच्या पायथ्याशी कुंभरोशी नावाचं आणखी एक दुसरे गाव आहे. यालाच "वाडा" असंही म्हणतात. या वाडा गावात राज्य परिवहन मंडळाच्या बहुतेक गाड्या थांबतात. याच गावात महाराजांचे जेधे, शिळिमकर, खोपडे यांचे वाडे होते. आज तिथे केवळ त्यांच्या वाड्यांची जोतीच शिल्लक आहेत.

जावळीच्या खोऱ्यातील जावळी हे गाव प्रतापगडपासून केवळ तीन साडेतीन मैल दूर आहे. तेव्हा पर्यटकाने वाडा येथे येणे सोयीचे. या 'वाडा'पासूनही दुर्गावर

जाण्यासाठी चढ चढता येतो. चढण चढून आल्यानंतर आपणास एक मोठी माची दिसते. आज तिला अफझलबुरूज म्हणून ओळखतात.

याच भागात पूर्वी 'किल्याचा ओहोळ' म्हणून जो भाग ओळखला जाई तो परिसर आहे. शिवाजी महाराजांच्या काळी 'किल्याचा ओहोळ' मार्गानेच महाद्वारापर्यंत येता येई. अन्य मार्ग नव्हता. गडाचा राबता त्याच मार्गाने असे. आता तो मार्ग बंद आहे.

दुर्गावर येण्यापूर्वीच, पोहोचण्यापूर्वी अफझलखान आणि महाराज यांची जिथे भेट झाली ते स्थळ लागते, ही जागा आता अफझलखानाच्या कबरीत परावर्तित झालेय. अफझलखान म्हणजे एक कर्तव्यदक्ष, उत्तम प्रशासक आणि शूर योद्धा आहे. तसाच तो कडवा राजसेवकही आहे. त्याच्या इतकी कठोर राजनिष्ठा विजापूरकर सरदारांपैकी एकामध्येही नव्हती. त्याच्यात एकच दोष होता. तो इतरांचा मान राखीत नसे, अन् अल्पसा गर्विष्ठ होता. आपल्या शक्ती संदर्भात, आपल्या कर्तव्यपालन संदर्भात त्याला नको तेवढा किंबहुना सर्वाधिक गर्व होता, या गर्वामुळेच त्याचा घात झाला. अशा या शूर सेनानीचे थडगे व्यवस्थित स्थितीत राखल्याचे आपणास जाणवेल.

भेटीचे हे स्थळ प्रतापगडाच्या आग्नेय दिशेस आहे. हे स्थळ निवडताना सुद्धा दूरदृष्टी ठेवलेय, चतुराई दाखवलेय. स्थळ धड गडाच्या पायथ्याशी नाही, परंतु गडाला जवळ भासावी असे, तसेच धड गडाच्या तटाला लागून नव्हे तरीही तसा आभास होत रहावा असे, आणि प्रतापगडावरील महाराजांच्या 'सदरे' वरून स्पष्ट दिसावे, तिथले वातावरण समजावे अशा पद्धतीचे निवडले आहे. प्रतापगडाच्या महाद्वारापासून पुष्कळ दूर, परंतु आताच्या अफझल बुरूजाच्या माऱ्याच्या टप्यात यावे असे! प्रसंगी गोंधळ माजला दगाफटका झाला तर प्रतापगडाचे रक्षण करण्यास पुरेसा अवधी उपलब्ध व्हावा हा हेतू मनात धरून त्याची निवड केली होती.

मुळात प्रतापगड अतिशय सुटसुटीत आकाराचा आहे. आकाराने लहान असण्यात काही लाभ आहेत तसेच काही तोटेसुद्धा! लहान असल्याने संरक्षणास सोपा, परंतु त्यामुळेच सहजासहजी जिंकता येण्यासारखाही!

परंतु प्रतापगडाच्या भोवतालचा परिसर, तिथल्या जाळ्या, जंगलातील हिंस्त्र श्वापदे, विषारी प्राणी यांचाही खानाच्या सैन्याला उपसर्ग व्हावा, होत रहावा हा हेतू प्रतापगडाची भेटीसाठी निवड करण्यामागे होता. तसेच स्वराज्याच्या राजधानीपासून शक्यतो दूर दक्षिण दिशेस असणाऱ्या भागात ही भेट घडवून आणण्यात स्वराज्यातील जनसामान्य व्यक्तीला कमीत कमी उपद्रव आणि उपसर्ग होण्याची शक्यतासुद्धा गृहित धरली होती. या सर्वांचा विचार करून हे स्थळ, हा दुर्ग निवडला होता.

मुळात भोरप्याचा डोंगर दोन गटात विभागला होता. तो तसाच ठेवून दुर्गाची बांधणी करून घेतलेय हे जाणवते. त्यामुळे या दुर्गाचे दोन भाग पडतात.

माथ्यावरचा तो 'बालेकिल्ला' तर महाद्वारापासूनचा मुख्य 'किल्ला'. बालेकिल्ला मूळ प्रवेशद्वारापासून उंच भागी वायव्य विभागात मोडतो असेही म्हणता येत नाही अथवा पश्चिमेस आहे असे सुद्धा सांगता येत नाही. या बालेकिल्ल्याचे क्षेत्रफळ साधारणतः ३७०० चौरस मीटर होईल, तर मुख्य किल्ल्याचे क्षेत्रफळ साधारणतः ३९०० चौरस मीटर इतके भरेल. याचा अर्थ असा की 'किल्ला' आणि 'बाले किल्ला' जवळ जवळ सारख्याच आकारमानाचे आहेत.

दक्षिणेकडून उत्तरेकडे उंचावत जाणारा भूभाग पुनः उत्तरेकडे उतरता झालाय. स्वतः शिवाजी राजानी याची बांधणी करवून घेतल्याने आवश्यक त्या सर्व सोयी होत्या. मुख्य म्हणजे पिण्याचे पाणी. यासाठी दोन्ही भागात तळी बांधून काढली आहेत. तटांची उंची १० ते १५ मीटर एवढी राहील अशी दक्षता घेतलेय. आवश्यक तेथे बुरूज आहेतच, यापैकी अफझल, रेडका, राज्यहारा, केदार इत्यादी अद्याप बऱ्या अवस्थेत आहेत. अर्थात अफझल बुरूज विशेष प्रसिद्ध आहे. इतरांची ओळख करून घ्यावी लागते.

बालेकिल्ल्यात केदारेश्वर मंदिर असल्याने त्या मंदिराच्या पश्चिमेस असणाऱ्या बुरूजाला केदार तर उत्तर टोकाला असणारा रेडका म्हणून ओळखतात, त्या रेडका बुरूजाच्या पूर्वेस असणारा म्हणजे यशवंत बुरूज! याच्याजवळच एक, नि कडेलोटाजवळ उत्तरेस एक अशा दोन चोरवाटाही आहेत. आज त्या मुजलेल्या असूनही ओळखता येतात. दोन्ही चोरवाटा बालेकिल्याला जवळ पण तेवढ्याच अवघड स्थानी आहेत.

या दुर्गाची आवश्यक ती संरक्षण व्यवस्था करून महाराजांनी एक महत्त्वाची गोष्ट केलीय. ती म्हणजे तुळजाभवानी या कुलस्वामिनीची एका स्वतंत्र मंदिरात प्रतिष्ठापना होय. याचं कारण त्यांची कुलस्वामिनी तुळजाभवानी ही स्वराज्यापासून कैक योजने दूर आणि त्यावेळी शत्रूप्रदेशात असणाऱ्या तुळजापुरात होती. इच्छा असूनही तिचे दर्शन घेणे अवघड व्हायचे, त्यावर उपाय म्हणून त्यानी प्रतापगडावर तिची प्रतिष्ठापना केली. प्रतापगडावर प्रतिष्ठापना करण्यामागे एक दृष्टी होती. यदाकदाचित् तिची प्रतिष्ठापना राज गडावर केली असती तर तिथे भक्तगणांचा राबता वाढला असता आणि राजधानीमधल्या संरक्षण व्यवस्थेवर अधिक भार पडून निष्कारण त्रास वाढत गेला असता. तो टाळणे हा दूरदृष्टीचा विचार महात्त्वाचा ठरून तिची प्रतिष्ठापना प्रतापगडावर केली गेली. त्यासाठी महाराजानी पुष्कळ कष्ट घेतले.

ही अष्टभुजादेवी हिमालयकन्या आहे. महाराजानी हिमालयाच्या पायथ्यास विश्वासू माणसे पाठवून श्वेतगंडकी आणि सरस्वती नदीच्या संगमाजवळील एकसंध शिलाखंड आणवून त्यातून ही देवी साकारून घेतली. मोरोपंत पिंगळे यांनी गंडकी नदीतून ही शिला आणवतेवेळी काशीचे विद्वान ब्राह्मण श्री विश्वनाथपंत हडप याना भवानीमातेच्या प्रतिष्ठापनेसाठी मुद्दाम महाराष्ट्रात आणले. पुढे महाराजांनी त्यानाच पुजारी म्हणून नेमले. मातेची पूजा अर्चा, तिची सेवा अखंडपणे चालत रहावी अशी व्यवस्था लावून दिली. आजसुद्धा त्यावेळच्या सेवेकऱ्यांचे वंशज तेवढ्याच निष्ठेने भवानीमातेची सेवा तत्परतेने करतात.

या दुर्गाला असणारे महाद्वार, इतर चोरवाटा यांच्या संरक्षणाची व्यवस्था अत्यंत विचारपूर्वक केलेली होती.

महाद्वार पश्चिमाभिमुख आहे. त्याच्या रक्षणासाठी बुरूज आहेतच. या द्वाराने आत प्रवेश केल्यावर समोर एक माची दिसते, तो भाग म्हणजे अफझल बुरूज! या बुरुजावर तोफांची तोंडे हव्या त्या दिशाना वळवता यावीत आणि योग्य त्या दिशाना मारा करता यावा अशी व्यवस्था केल्याचे आढळते. या बुरूजाने जवळ जवळ २५० अंशाच्या कोनामध्ये मारा करता येणाऱ्या भूभागावर लक्ष ठेवले होते. अन् पहारा केला होता. महाद्वाराचे रक्षण हे याचे महत्त्वाचे काम ठरे.

महाद्वाराकडे परत येऊन किल्याकडे जाण्यास निघालो की पुनः दोन दरवाजे दिसतात. गतवैभवाची आठवण काढत ते उभे आहेत कारण आता नव्या पायऱ्या बांधल्या गेल्याने त्यांच्यातला राबता संपलाय. या पायऱ्या चढताना उजव्या हाताला एक लहानसा तलाव आहे. व्यवस्थित बांधून काढलेला हा तलाव गडामधल्या शिबंदीना पाणी पुरवठा करण्याचे कार्य करतोय. तलावात आत उतरता येऊ नये याचीही दक्षता घेण्यात आलेली आहेच.

तसेच पुढे चढून वर आले की डाव्या हाताला भवानी मंदिरात प्रवेश करण्यासाठीचे महाद्वार लागते. हे द्वार उत्तराभिमुख असले तरी मंदिर–शिल्पशास्त्रानुसार मूळ मंदिर पूर्वाभिमुख आहे. या मंदिराचा 'नगारखाना' या शतकात पुनः बांधून काढलाय. मंदिर सभामंडप, कीर्तनमंडप, पुराणमंडप आणि शेवटी सभागृह अशा पद्धतीने बांधले आहे मंदिराभोवती उत्तम प्रतीच्या ओवऱ्या बांधून काढल्या होत्या. परंतु आता मात्र त्यातल्या बऱ्याचशा ओवऱ्या पडून नामशेष झाल्याचे आढळते. आता मंदिराच्या दक्षिणेस नवा सभामंडप बांधलाय. बाहेर गावाहून येऊन निवास करणाऱ्यांसाठी हा उपयोगात आणला जातो.

या मंदिराच्या दक्षिणेस एक तळे निर्माण केले आहे आणि ते एका बुरूजाने बंदिस्त केले आहे. मंदिराच्या नैऋत्येस एकदोन घरटी असून ती देवीच्या सेवेकऱ्यांची आहेत. आपण मंदिरप्रदक्षणा करून बाले किल्याकडे येण्यास निघावे.

उत्तर टोकावर समर्थ स्थापित हनुमानाची मूर्ती आहे. या मंदिरासमोरच एक बुरूज दिसेल. तो बालेकिल्याचे प्रवेश द्वार सांभाळतो. हा बुरूज उजवीस टाकून आपण एका सुस्थितीत असणाऱ्या दगडी दरवाजातून बालेकिल्यात प्रवेश करून २/४ पायऱ्या चढलो की दिसते एक सपाटी! चौथरा असणारी ही भूमी एकेकाळी महाराजांची 'सदर' होती.

येथूनच सारी योजना कार्यान्वित करण्याचे आदेश निघाले. या सदरेच्या पश्चिमेस केदारेश्वराचे देऊळ आहे. या केदारेश्वर मंदिराजवळ आई-साहेबासाठी वाडा होता. या केदारेश्वराच्या मागचा बुरूज तो केदार बुरूज! या बुरूजावरून दुर्गतटावर असणाऱ्या पायवाटेने जात पश्चिमेकडे पाहिल्यास सारे तळकोकण न्याहाळता येते. ते किती खोलवर आहे हे आढळून येते. तटावरून फिरता फिरता एका अगदी लहानसर वळणावर यायला होते, इथेच ती चोरवाट अथवा 'छोटा दरवाजा' दिसेल. आता त्याच्या पूर्वेस उद्यान आहे. या उद्यानातच छत्रपतींचा भव्य अश्वारूढ पुतळा आहे. दुर्गातील हा एकमेव सपाट भूप्रदेश होय. या स्थळी महाराजांचा राहता वाडा होता पण १००/१२५ वर्षा पूर्वी साताऱ्याच्या इंग्रज रेसिडेंटने तो सरकारी आज्ञेने जाळला. मराठ्यांचा तेजस्वी इतिहास काळाच्या ओघात विसरला जावा हा या मागचा हेतू होता.

या दुर्गाच्या उत्तरेस रायगड आणि राजगड आहेत. दुर्बिणीने ते न्याहाळता येतात. मात्र सराईत दृष्टीनेही ते तसे ओळखता येतील.

या शिवतीर्थावर ज्यांना प्रेक्षणीय स्थळे म्हणून म्हणता येतील अशी स्थाने अत्यल्प आहेत. मात्र स्फूर्तीदायक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून विपुल स्थाने आढळतील.

महाराजांच्या जीवनात या दुर्गाने एक अनन्यसाधारण स्थान पटकावले. या दुर्गाने जो प्रताप गाजवला त्यामुळे साऱ्या जगाचा इतिहास बदलला गेला. म्हणून तर हा प्रतापी प्रतापगड. तेथली भवानीमाता स्थानापन्न झाली ती इ.स. १६६४ ला, म्हणजे अफजलवधानंतर पाच वर्षांनी!

जुलै १६५९ मध्ये महाराज अफझलखानाच्या भेटीच्या निमित्ताने आले. मार्गशीर्ष शुद्ध षष्टीयुत सप्तमी गुरुवार शके १५८१, विकारी नाम संवत्सरात दुपारी आठवे तासी म्हणजे साधारणत: दोन अडीच वाजता ती ऐतिहासिक भेट झाली. इंग्रजी दिनांक होता १० नोव्हेंबर १६५९.

महाराजांच्या समवेत जे दहा वाघ होते ते म्हणजे संभाजी कावजी कोंढाळकर, जिवा महाला, सिद्दी इब्राहिम, काताजी इंगळे, कोंडाजी कंक, येसाजी कंक, कृष्णाजी गायकवाड, सूरजी काटके, विसाजी मुरुंबक आणि संभाजी करवर!

या निष्ठावंतानी दाखवलेल्या आदराला सीमा नाही. महाराजांच्या भोवती एखाद्या कोटा प्रमाणे राहून त्यानी महाराजांना संरक्षिले, म्हणून तर तो भाग्याचा दिवस उजाडला. इतिहास क्षणभर स्तंभित झाला!

अफझलखानाच्या वधानंतर महाराज स्वस्थ बसले नाहीत त्यानी आपला मोर्चा दुसऱ्याच दिवशी कोकणाकडे वळवला. तेथून वळून पन्हाळा जिंकला. दिवस होता. माघ वद्य दशमी शके १५८१ म्हणजेच २८ डिसेंबर १६५९.

प्रतापगडाच्या प्रतापाने असे बळ लाभले. नी दुर्गामागून दुर्ग स्वराज्यात येऊ लागले! कारण?

कारण होते प्रतापगडावरील यशस्वी वाटचाल! इ.स. १६६४ ला महाराजानी विधीपूर्वक भवानी मातेची प्रतिष्ठापना केली आणि १९ मे १६७४ दिवशी राज्यारोहण करण्याआधी तिची यथासांग मंत्रोपचाराने पूजा करून तिला सोन्याचे छत्र अर्पण केले. त्याचे मूल्य त्याकाळी पाऊण लाख होते–, नि वजन तीन मण!

संभाजी राजानीही २३ ऑगस्ट १६८० ला दहा सहस्र रुपयांची देणगी दिली होती या मातेला!

दुर्दैवाने इ.स. १६९० ला प्रतापगड मोंगल सैन्याने जिंकला. परंतु मराठे स्वस्थ बसले नाहीत. एक वर्षाच्या आतच तो त्यांनी पुनः जिंकून घेतला.

इ.स. १८०३ मध्ये या दुर्गावर होळकरानी आपला अधिकार गाजवला, पण १८१८ ला तो एका तहाने इंग्रजांच्या अधिपत्याखाली आला. तो १९४७ पर्यंत!

त्यानंतर मात्र तो स्वतंत्र आहे. साऱ्या महाराष्ट्राला प्रेरणा देत, साऱ्या भारताला सांगत–

केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे!

● ● ●

# पन्हाळगड

२ मार्च १६६० म्हणजेच चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १५८२. शार्वरीनाम संवत्सराने पन्हाळगडावर एक चैतन्य अनुभवले. छत्रपती शिवाजी महाराज त्या दिवशी गुढ्या तोरणे, भगवे ध्वज यांच्या आनंदाना उधाण आणीत पन्हाळगडावर उपस्थित झाले होते, आपल्या शूर योध्यांचे कौतुक करण्यासाठी!

केवळ चार महिन्याच्या आतच. अफझलखानाच्या वधानंतरच्या या कालावधीत पन्हाळा सजवला गेला होता. आपल्या धारकऱ्यांचं ऊत्तुंग असणारं मनोबल अधिक वर्धिष्णु करण्यासाठी महाराज स्वतः उपस्थित झाले होत त्या दिवशी!

पन्हाळा !

एकेकाळी अजिंक्य वाटणारा हा दुर्ग शिवाजी राजानी दि. २८ नोव्हेंबर १६५९ दिवशी स्वतः उपस्थित राहून जिंकला होता. म्हणजे केवळ अठरा दिवसानंतर! अफझलखानाच्या वधानंतर त्याचा मुलगा फाजलखान मार खात कसाबसा जीव वाचवीत पसरणीचा घाट उतरून वाईत येऊन पोहोचला अन् त्याने वाईतून पळ काढला. त्याच्या सतराव्या दिवशी पन्हाळा विजापूरकरांच्या हातून निसटला होता. मध्यरात्री महाराज पन्हाळ्यात प्रवेश करते झाले होते. या अप्रतिम दुर्गाची पाहणी करून योग्य त्या सूचना देऊन महाराज राजगडाकडे निघाले, परत येण्याचे आश्वासन देऊन! त्या आश्वासनानुसार महाराज पन्हाळ्यावर गुढीपाडव्याचा मुहूर्त साधून उपस्थित झाले होते.

असा हा पन्हाळा नेहमीच एकाच्या हातून दुसऱ्या धन्याकडे जात असे !

कोल्हापूरपासून वायव्येस १२ मैल अंतरावर असणारा आणि आता गिरीस्थान म्हणून मिरवायला लागलेला, आपलं दुर्जेयत्व हरवून बसलेला, चार चाकी वाहनात बसून सहजपणे फिरून पाहता येणारा हा दुर्ग एकेकाळी अजेय होता, अजिंक्य ठरला होता.

समुद्रसपाटीपासून २७७५ फूट उंचीवर असणारा हा दुर्ग पाहण्यासाठी एक दिवस राखून ठेवणे आवश्यक आहे. साधारणतः दुर्गापासून ५ मैल (म्हणजे ८ कि. मी.) अंतरापर्यंत उतार असलेल्या या दुर्गाची परीघ-व्याप्ती ५ मैल (म्हणजेच ८ कि. मी.) एवढी होईल. यातील अर्धा भाग जवळ जवळ १० मीटर उंच अशा नैसर्गिक कड्याने व्यापलेला आहे. तर उरलेला भाग साधारणतः ५ ते १० मीटर उंचीच्या अन् तेवढ्याच रुंदीच्या भिंतीने बांधून काढलेला असून योग्य त्या त्या स्थळी बुरुजांची जोड देऊन तो तट भक्कम करण्याकडे लक्ष पुरवले आहे.

असा हा दुर्ग मराठे अन् मुस्लिम राज्यकर्ते याना तेवढाच प्रिय असे. या दुर्गाला एकूण तीन महाद्वारे होती. पण कालाच्या ओघात आज दोन त्यातल्या त्यात सुस्थितीत आहेत.

कोल्हापूरहून पन्हाळ्यात येणे त्यातल्या त्यात सुखकर. कारण महाराष्ट्र राज्य परिवहनाच्या वाहनांची सतत ये-जा असते. त्यामुळे अन् कसेही असले तरी पन्हाळ्यापासून अग्नेय दिशेला ५ कि. मी. अंतरावर पन्हाळ्याला येण्यासाठी एकमेव मार्ग असल्याने अन्य मार्गाने येणाऱ्याला वाघदऱ्यापाशी उतरून पन्हाळ्याला येणारी वाहनेच पकडावी लागतात, त्यामुळे कोल्हापूर हे त्यातल्या त्यात सुखकर स्थान !

तर कोल्हापूरहून निघाल्यानंतर वाघदऱ्यापाशी आल्यानंतर आपल्या समोर एक विशाल बुरूज आपले लक्ष वेधून घेतो, वस्तुतः त्याचा नि पन्हाळ्याचा काहीच संबंध नाही. पन्हाळ्याच्या आग्नेय दिशेला असणाऱ्या, पन्हाळ्यापासून केवळ अर्ध्या मैलावर असणाऱ्या पवनगड (कोणी म्हणतात पावनगड) दुर्गाचा तो पूर्वोत्तर दिशेचा बुरूज आहे. आपण तसेच पुढे गेलो की पन्हाळ्याची एक पेठ लागते. तिथं आल्यावर मात्र पन्हाळा दिसू लागतो. (आता तर आकाशवाणीच्या प्रक्षेपण मनोऱ्यामुळे तो दुरूनही ओळखता येतो) अन् मग मन इतिहासकाळात रमून जाते.

वेदकाळी पराशर ऋषी इथं वास्तव्यास होते असं म्हणतात. आजही दुर्गाच्या दक्षिण भागात (आग्नेय म्हणणे योग्य) एक गुहा आहे. तीत त्यांचे वास्तव्य होते असे सांगितले जाते. अशा पराशर ऋषींनी या परिसरात असंख्य नाग, सर्प पाहिले अन् त्यांचे वास्तव्य पाहून या परिसराला "पन्नगालय" हे नाव दिले. कुणाला वाटते या पन्नगालयाचेच पन्हाळा असे रूपांतर झाले.

पण काही शिलालेखावरून असं मानलं जातंय की पन्हाळा हा शब्द "प्रणालक" किंवा "पद्मनाल" या शब्दावरून रूढ झालाय.

ग्रँट डफ मात्र याला "पन्नाला" अशा शब्दाने ओळखतो. तर काही भूगोलवेत्ते "परनाला", "पर्नाळा" या नावानं ओळखतात. तर काहीजण 'पुर्नाला' असे मानतात. कॅप्टन वेस्ट आणि मेजर ग्रॅहॅम यांनी पुष्कळशा संशोधनानंतर याला 'पनाला' या नावानं संबोधलं आहे.

या दुर्गावर असणाऱ्या विपुल पाण्यामुळे याला 'पद्मालय' हे नावसुद्धा शोभतेच. या दुर्गावर पुष्कळ पाणी होतं म्हणून कर्नल वेल्श याला पानीयदुर्ग म्हणून मानतो तर शेजारी असणाऱ्या पवन दुर्गाची (पावनगडाला) 'पवनपर्वत' म्हणून भलावण करतो. या दुर्गाचा इतिहास पाहता 'पाळेगार, 'शिलाहार', यादव वंश, बहामनी सत्ता, निजामशाही, विजापूरकर, मराठे, मोगल, पुनः मराठे, शेवटी

इंग्रज अशा भिन्न भिन्न सत्तेखाली याला वावरावे लागले असल्याचे दिसते. पाळेगारांचा शिलाहारानी पराभव करून हा आपल्या अधिपत्याखाली आणला तो काळ आहे. इ. स. ११०० चा ! त्याआधी कदंब, राष्ट्रकूट, चालुक्य सत्तेखाली हा काही काळ होता. पण १२१०च्या सुमारास यादव राजा सिंघणदेवाने याचे आधिपत्य आपल्या सत्तेखाली आणले. पण यादव सत्ता संपल्यामुळे अहमदनगरच्या महंमद गवानच्या हत्येनंतर तो भाग त्याचा मुलगा, म्हणजे मलिक अहमदचा बाप, निजाम उल मुल्क बहिरी याचेकडे आला, पण लौकरच निजाम उल्मुल्कच्या मृत्यूमुळे हा भाग मलिक अहमदकडे आला. परंतु विजापूरकरांनी निजामशाहीकडून हा प्रदेश जिंकून घेतला. इ. स. १४९४ च्या सुमाराची ही घटना आहे.

विजापूरच्या आदिलशाहीकडे याचे अधिपत्य आल्यानंतर मात्र पन्हाळ्याच्या वैभवाला प्रारंभ झाला असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. पन्हाळ्यातील बहुतेक वास्तू विजापूरकरांच्या राजवटीत निर्माण झालेल्या आहेत.

विजापूरकरांच्या अधिपत्याखाली हा आल्यानंतर त्याचे नाव "शाह-नबी-" दुर्ग असे पडले आणि आदिलशाही राज्याचा एक विभाग म्हणजेच 'सरकार' म्हणजेच इंग्रजी वाक्यानुसार 'डिव्हिजन' झाला. या 'सरकार'मध्ये पन्हाळा परिसर, सातारा अजिमतारा, चंदन वंदन हे तीन दुर्ग, वाई परिसर, वासोटा दुर्ग, परळी दुर्ग (म्हणजेच सज्जनगड) बतीस शिराळे परिसर एवढा विभाग समाविष्ट होता. अर्थात हे सगळे 'महाल' होते; हे महत्त्वाचे !

शिवाजी महाराजांनी हा जिंकल्यावर त्यातले काही महाल समाविष्ट झाले नाहीत हा भाग निराळा, मात्र सातारकर छत्रपती आणि कोल्हापूरकर छत्रपती यांच्यात झालेल्या इ. स. १७१०च्या विभागणीनुसार बेळगाव जनपदातील चिक्कोडी आणि मनोळी हा परिसर यांच्या कक्षेत येत होता, हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

तसं पाहिलं तर पन्हाळ्याची निर्मिती शिलाहार राजा, भोज दुसरा, याने केली होती असा पर्शियन भाषेत असणारा एक शिलालेख 'विशालगड' येथे उपलब्ध आहे.

एकसारखी हस्तांतरणे होत राहिली तरी हा दुर्ग शिवाजी राजाना विशेष आवडे याचे कारण हा सर्वच बाबतीत बळकट होता, प्रचंड होता, उंच होता, हे आहे.

त्यामुळेच १६६०चा गुढी पाडवा साजरा करावा म्हणून शिवाजी महाराज इथं आले होते. अन् इथेच अडकले, ते आषाढ शुद्ध पौर्णिमा शके १५८२ म्हणजे १२ जुलै १६६० पर्यंत !

शिवाजी महाराजांनी त्या दिवशी हा दुर्ग सिद्दी जोहरच्या हाती सोपवला अन् ते विशाळगडाकडे निघून गेले, तो पुनः जिंकून घ्यायचा म्हणून!

पण त्यासाठी ६ मार्च १६७३ चा दिवस उगवावा लागला! केवळ ६० सैनिकांच्या सहाय्याने हिरोजी फर्जंदने हा पुनः स्वराज्यात आणून बसवला. त्यानंतर केवळ एक वर्ष तो १६९१च्या संवत्सरात औरंगजेबच्या अधिपत्याखाली राहिल्याचा अपवाद वगळता मात्र तो सतत मराठी सत्तेखाली राहिला.

अशा इतिहासप्रसिद्ध दुर्गात प्रवेश केला की गिरीस्थानाचं प्रवेशकर घेण्याचं जे स्थान आहे तिथून आपण दुर्ग पहायला प्रारंभ करावा. राज्य परिवहनाचं वाहन जिथं थांबतं जिथं आपण प्रवेशकर देतो तिथं पूर्वी 'चार दरवाजा' होता इ. स. १८४४ मध्ये एका क्षणी त्याला इंग्रज अधिकाऱ्यांनी धराशायी करून त्याचा मागमूस पुसून टाकला. दुर्गाचे हे महत्त्वाचे प्रवेशद्वार होते. आज तेथे एकमेव बुरूज भग्न अवशेषात उभा आहे. याच परिसरात पश्चिमेस एक तळे आहे. त्याच्या उत्तर तीरावर एक दर्गा दिसेल. 'साधोबाचे तळे आणि दर्गा' या नावाने त्याला ओळखले जाते. एक मुस्लिम संत सद्रुद्दीन यांच्या स्मरणार्थ तो बांधला आहे. साधारणतः ३० फूट चौरसाकृती स्थळावर तो बांधला आहे. घुमटापर्यंतची उंची ५० फूट होईल. याच तळ्यात एक शिलालेख असून त्यामध्ये मुख्य 'खवस' मलिक खिद्र याने हिजरी सन् ९६४ मध्ये तो बांधल्याचा उल्लेख आहे याचा अर्थ असा की हा 'दर्गा' इब्राहिम आदिलशाह याच्या राजवटीत बांधला गेला आहे. या दर्ग्याच्या परिसरात अन्य शिलालेख उपलब्ध आहेत. अन् हे सगळे उद्ध्वस्त प्रवेशद्वाराच्या अवशेषातून उपलब्ध झालेले आहेत, हे महत्त्वाचे !

तसंच पुढं पश्चिम दिशेला गेलं की समोर बाजीप्रभू देशपांडे याचे पंचधातूचे स्मारक तुमचे स्वागत करील. शिवाजी महाराजांचे प्राण वाचावेत म्हणून गजापूरच्या पावनखिंडीत त्यांनी शत्रू सैन्याला अटकाव करून शिवाजी राजाना विशाळगडाकडे जाऊन आश्रय घेण्यास भाग पाडले होते आणि स्वतः प्राणार्पण करून लाखोंच्या पोशिंद्याचे रक्षण केले होते.

बाजीप्रभू हिरडस मावळचे पिढीजात देशकुलकर्णी म्हणजेच देशपांडे होते. बाजीप्रभू पन्हाळा प्रांताच्या मोहिमात महाराजांसमवेत होते. चाळीस पंचेचाळीस वय असले तरी २०-२० तास शारीरिक काम करण्याची त्यांची क्षमता होती. १२ जुलै १६६० म्हणजेच गुरुवार, आषाढ पौर्णिमा शके १५८२ ! रात्रौ १०च्या सुमारास सहाशेहे शस्त्रधारी सैनिकांसह महाराज गुपचुप दुर्गाच्या राजदिंडीतून बाहेर पडले. त्या सहाशे सैनिकांत दोन मोती होते एक पाणीदार टप्पोरे मोत्यें म्हणजे बाजीप्रभू देशपांडे तर दुसरे सर्वसाधारणच पण तितकेच उत्तम मोत्ये म्हणजे शिवा काशीद !

दोघांनी महाराजांच्यासाठी स्वतःचे प्राण अर्पिले. जवळ जवळ एकाच दिवशी.

राजदिंडीतून बाहेर पडल्यावर शिवा काशीद प्रतिशिवाजी बनून एका पालखीत बसला, सिद्दी जौहरच्या काही सैनिकांनी काळोखात शिवाजी पळून जातोय हे वृत्त सिद्दीच्या कानी घालताच त्याने त्याच्या सैनिकांना शिवाजीला पकडून आणण्याची आज्ञा दिली.

मिणमिणत्या टेंभ्याच्या प्रकाशात, धो धो पडणाऱ्या पावसात चिखल, काटे, दगडगोटे नि निसरडी वाट तुडवीत मावळे 'शिवा'ला पालखीत बसवून नेत होते. सिद्दीच्या सैनिकानी 'शिवा'ला पकडले. नि सगळ्यानी निश्वास सोडला. कारण त्यानी पळून जाणाऱ्या शिवाजीला पकडून आणलं होतं !

या साऱ्या घडामोडीत पुष्कळ कालावधी निघून गेला. शिवाजी राजे तोपर्यंत सिद्दीच्या वेढ्यापासून दूरवर पोहोचले होते. या 'शिवा'ला पाहताच मिळालेला आनंद क्षणभरात सरला कारण या 'शिवा'ची तोपर्यंत ओळख पटली होती. त्याला सत्वर यमसदनी पाठवण्यात आलं, पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटून जाण्यास महाराजाना साह्य करताना स्वतःचे प्राण ओवाळून टाकणारा शिवा काशीद आजही पन्हाळ्याच्या पायथ्यास चिरनिद्रा घेतोय.

बाजीप्रभू गजापूरच्या खिंडीत पावन मरण पत्करून पावन झाले. शिवा काशीद अमर झाला तो पन्हाळ्याशी पायथ्याशी, महाराजांसाठी, महाराज बनून स्वतःचे प्राण अर्पून !

या नरवीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या पूर्णाकृती प्रतिमेच्या मागे पश्चिमेकडे 'तीन दरवाजा' नैऋत्येस 'अंधार बाव' उत्तरेस बालेकिल्याची भिंत तर पूर्वेला दुर्गामधली आजची राहती घरे दिसतात.

आपण 'तीन दरवाजा' पाहण्याचे ठरवावे.

प्रारंभी 'तीन दरवाजा' बहामनी राजवटीत बांधवला गेला पण पुढे पुनः इब्राहिम आदिलशहाने तो दुरुस्त केला. याच्या प्रवेश द्वारावर असणाऱ्या शिलालेखावरून "अबू अक्क दाऊदने याच्यासमोर असणारा बुरूज बांधला. हा कालावधी हिजरी सन् ९३४चा म्हणजे आजच्या भाषेत इसवी सन् १५१३ च्या कालावधीचा होतो. या शिलालेखावरून असे ठरते की, आदिलशहाचा मंत्री अहमदच्या मुलाने तो बांधला.

दुर्गाचे पश्चिमेकडील प्रवेशद्वार म्हणून तीन दरवाजा ओळखला जातो. तीन भिन्न भिन्न बळकट, व्यवस्थित, आवश्यक तेवढे संरक्षित दरवाजे हे याचे वैशिष्ठ्य! मध्ये "गणपती" दोन्ही दिशाना यावनी शिल्प अशा संस्कृती संगमाचा उत्तम

नमुना म्हणून हे प्रवेशद्वार आजसुद्धा आपणास लोभविते. अत्यंत डौलदार दरवाजा असं त्याचं स्वरूप आहे.


या तीन दरवाजाच्या समीपच "अंधार बाव" आहे. तीन मजली असणारी ही विहीर स्थापत्यशास्त्राचा एक उत्तम नमुना आहे. जमिनीत विहीर, त्यावर उत्तम निवासस्थान आणि वर पुन: एक उत्तम निवासस्थान, कार्यालयीन स्थान, विश्रामगृह आणि अन्य शासकीय वा स्वीय स्थाने अशा हेतूने बांधून काढलेली ही विहीर आहे. दूरदृष्टी, वातावरण ज्ञान, नि त्याचा योग्य समतोल राखून, लाभ उठवण्यासाठी केलेले प्रयत्न याचे जिवंत जागते उदाहरण म्हणून, न विसरता, पहावी अशी ही वास्तू आहे.

'अंधार बाव' आणि 'तीन दरवाजांचे शिल्प' ज्या दृष्टीने निर्मिले आहे त्यामध्ये उपयुक्तता, संरक्षण आणि सौंदर्य यांचा सुरेख संगम झालेला आढळेल. या दोन शिल्पासमीप 'गोपाळ बाग' म्हणून ओळखला जाणारा एक लहानसर भाग आहे. दुर्गामधल्या निवासियांच्या पिण्याच्या पाण्याची सोय या बागेत असणाऱ्या कूपाने केलेली आहे. पाचशेहे वर्षे झाली तरी त्या बागेतले दुधाच्या रंगाचे पाणी तेवढेच पाचक अन् आरोग्यदायी असून तहान शमविणारे आहे.

या गोपाळ बागेतून मधल्या वाटेने अथवा पुन: बाजीप्रभूंच्या पुतळ्यापाशी येऊन उत्तरेस येण्यास निघावे नि दुर्गामधल्या बालेकिल्ल्यात यावे.

इथे या बालेकिल्ल्याचा तट अर्धवट पडलेला, अर्धवट उभा, उसासे सोडीत आपले स्वागत करील. एकेकाळी ही अश्वशाला आणि धान्याचे तसेच स्फोटकांचे (दारूगोळा) कोठार असणारी वास्तू त्यातल्या गंगा यमुना आणि सरस्वती या कोठारांनी सर्वांचे लक्ष वेधून घेते.

'अंबरखाना' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तीन कोठारानी युक्त अशा तीन स्वतंत्र वास्तू आपले लक्ष वेधून घेतात. यापैकी सर्वात उत्तरेकडची वास्तू 'गंगा' ही सर्वात विशाल, त्यानंतरची तिच्या दक्षिणेकडील यमुना आणि सर्वात दक्षिणेकडील सरस्वती होय. या तिन्ही वास्तू विशेष उद्देशाने बांधलेल्या असून प्रत्येक वास्तूची रचना इतरांपेक्षा भिन्न स्वरूपाची आहे. यापैकी गंगा २०० फूट लांब ५१ फूट उंच आणि ३५ फूट रुंद आहे. (म्हणजेच ६० X १६ X ११ मीटर आकाराची आहे) आणि त्यामानाने यमुना आणि सरस्वती लहान लहान होत जातात. या गंगा कोठीमध्ये एका वेळी १० सहस्र खंडी (म्हणजे जवळ जवळ ३ लाख मेट्रिक टन) धान्याचा साठा करता येत असे. पन्हाळ्यात पाऊस इतका असतो की अंगावर घेण्याची सोय नसते. या सर्वांचा विचार करून ही धान्यकोठारे आणि स्फोटक भांडार बांधून काढले आहे. यमुना कोठी १५२ फूट लांब ४० फूट रुंद आणि १८



*गंगा-जमुना कोठी पन्हाळा*

फूट उंच आहे तर सरस्वती ८५ फूट लांब ३५ फूट रुंद आणि ३० फूट उंच आहे. या कोठाराव्यतिरिक्त आणखी एक धान्यकोठार होते त्याला 'धर्मकोठी' म्हणत. अत्यंत उत्कृष्ट शिल्पकलेचे प्रतिक म्हणून आजही त्याला मान देता येतो. ही वास्तू संभाजी महाराज मंदिराच्या समीप दक्षिणेस असून त्यात आता शासकीय कार्यालय आहे.

या कोठारातून सरळ वायव्य दिशेस यावे. जवळ जवळ एक-दोन किलोमीटर अंतर चालून आले की दुर्गाच्या वायव्य कोपऱ्यात आपण आलेले असतो. या दुर्गाच्या टोकाला 'पुसाटी बुरुज' म्हणून एक लहानसर बुरुज आहे. पण या बुरुजावरच्या शतघ्नीने (म्हणजेच तोफेने) २४० अंशाच्या परिसरावर लक्षं ठेवून मारा करता येत असे. या परिसरावरून २४० अंशापर्यंतच्या शत्रूच्या आक्रमणाला यशस्वी तोंड देणे शक्य होईल, अशा पद्धतीची त्याची रचना आहे आणि तशा प्रकारचे स्थान त्याने पटकावले असून तीन दरवाजावर आक्रमण झाल्यास त्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यास त्या स्थानाचा, अंतर दूर असूनही उपयोग होतो अशी स्थिती या बुरुजाची आहे.

यानंतर तसेच उत्तरेला यावे मार्गात दोन स्थळे अशी आहेत की त्यांचा बोध होत नाही. एकाला 'दुतोंडी बुरुज' म्हणतात. तसा एक उंच 'बांधीव कट्टा' असं

त्याचं स्वरूप असूनही तो महत्त्वाचा आहे. इथं बसलं की उत्तरेकडील, ईशान्येकडील अन् पश्चिमेकडे डोंगराळ प्रदेश असल्याने काही प्रमाणात पश्चिमेकडील सुदूर प्रदेश न्याहाळता येतो. सर्वसाधारणपणे मांडव घालून तिथं सायंकाळचा निवांत वेळ व्यतीत केला जात असावा असं, आज तिथं असणाऱ्या चिन्हावरून वाटतं.

या बुरुजाजवळच दुर्गाचे दुसरे त्यातल्या त्यात संपूर्णपणे उध्वस्त न झालेले प्रवेशद्वार आहे. याला आता "वाघ दरवाजा" म्हणून ओळखले जाते. आता या प्रवेशद्वाराच्या पायथ्याशी साधारणतः ६० फूट खाली "तबक उद्यान' म्हणून एका उद्यानाची निर्मिती करून गिरीस्थानाचे आकर्षण वाढवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या 'वाघदरवाजा'च्या समोर दक्षिणेला, पण सहजासहजी लक्षात न येणारा एक वाडा आहे. शिवाजी राजानी तो इ. स. १६७३ च्या कालावधीत स्वतःच्या निवासासाठी बांधला असा आधार मिळतो. दुर्दैवाने आज त्याचे अस्तित्त्व संपुष्टात येत चाललं आहे. या वाड्यात माध्यमिक विद्यालय, गिरीस्थानाचे प्रमुख कार्यालय, अन् याचबरोबर नगरपरिषद याचे कार्यालय होते. त्यामुळे मूळ वास्तूच्या रचनेत हळूहळू एक एक चिरा निखळत नको तेवढे अंतर पडत चाललेय. कालाय तस्मै नमः हेच खरे !

या राजवाड्यावरून पुढे ईशान्यदिशेस यावे. पन्हाळ्यावर असणारी एक उत्तम वास्तू 'सज्जा कोठी' आपले स्वागत करील. या सज्जा याचा अर्थ "दीर्घा" म्हणजे "गॅलरी" असा होतो. बहुतेक सर्व शासकीय प्रमुखांच्या निवासाचे स्थान म्हणून याने स्थान पटकावले. विशेष म्हणजे पूर्वेकडील एका १५ मीटर उंच तुटलेल्या कड्यावर ही वास्तू बांधून काढली असल्याने संरक्षण, सौंदर्य, सृष्टीनिरीक्षणाचा आनंद आणि दुर्गाच्या उत्तुंग भागी ही उभी असल्याने भव्यता याचे प्रतीक आहे. पन्हाळ्यापासून ६४ कि. मी. दूर असगाऱ्या मिरज येथील दर्ग्याचे घुमट या वास्तूतून दिसतात असे म्हणतात. या वास्तूत असणाऱ्या शिलालेखावरूनन सुहूर सन १००८ मध्ये 'मकसुद अक्क'ने इब्राहिम आदिलशाहच्या राजवटीत ही वास्तू बांधून काढली असा बोध होतो. शिलालेख या वास्तूचे मापन देतो. त्यात म्हटलंय "एक नौरस लांबी रुंदीची आणि दोन नौरस उंचीची ही वास्तू रज्जब महिन्यात बांधली." आजच्या मापनाने ही ३६ फूट लांब ३१ फूट रुंद आणि जवळ जवळ ५० फूट उंच अशा स्वरूपाची भासते. सिद्दी जोहरच्या वेढ्याच्या वेळी शिवाजी महाराज येथूनच निसटले असं म्हणतात. अर्थात त्यात अत्यल्प सत्य भासते. परंतु दुर्गावरील सर्वात व्यवस्थित वास्तु, सुंदर वास्तु, उंच वास्तू म्हणून तिचं स्थान अटळ आहे. इंग्रज अधिकारी "निवासी प्रतिनिधी" म्हणून इथे रहात. त्यामुळे तिची देखभाल व्यवस्थित होत गेल्याने ती सुस्थितीत असावी.

याच 'सज्जा कोठीत' शिवाजी महाराजांनी आपले पुत्र संभाजी राजे यांना शिक्षा म्हणून बंदिस्त करून ठेवले होते असेही सांगितले जाते.

सज्जा कोठीहून 'चार दरवाजा'कडे येण्यास निघावे, महाराजांनी बांधलेल्या राजवाड्याजवळ यावे. तिथे पुष्कळ मंदिरे आहेत. कोल्हापूरकर छत्रपती संभाजी राजे (१७१२ त १७६०) यांच्या नावे त्यातले एक मंदिर आहे. त्याच्या जवळच 'जिजाबाई' यांच्या नावाचेही एक मंदिर आहे. या दोन मंदिराच्या परिसरात एक विशाल तळे आहे. साऱ्या दुर्गाच्या चतुष्पाद प्राण्यांची तृष्णा भागवण्याचे कार्य या तडागाने केले होते. या तळ्याच्या दक्षिणेस उघड्यावर एक दुर्लक्षित वृंदावन आहे. शिवाजी महाराजांच्या अष्ट प्रधानांपैकी एकाचे ते आहे.

तसेच पुढे आले की 'धर्मकोठी' लागते. यावनी शिल्पाने नटलेली ही वास्तू दानधर्म करण्यासाठी बांधली होती. दुर्गामधील दीनदलिताना या स्थानी दानरूपाने धान्य मिळत असे. आता तिथे शासकीय न्यायालय आहे. तिथून पुनः पुढे आलात की दुर्गामधली सर्वात उपेक्षित, अत्यंत पडक्या अवस्थेतील. परंतु एकेकाळी रसरसलेली वास्तु दिसेल "नायकिणीचा सज्जा" म्हणून प्रसिद्ध असणारी ही वास्तू भग्न अवशेषात आपल्या गतवैभवाची गाथा मनी जागवीत आपले स्वागत करील.

जनरंजन करीत, जेत्याना शरीरसुख देत, प्रसंगी हेरगिरी करीत इथल्या कलावतींनी स्वराज्यासाठी मूकपणे सहाय्य केले होते. स्वतः उदास जीवन जगत इतरांना आनंद देत ! नुपूर झंकारले, सारंगीला बोलती केली गेली, मैफिली रंगल्या, अदाकारी फिदा झाली. मैफिली संपता संपता धुंदी चढल्या, उतरल्या, कालानुसार हे सारे सरले, एक एक चिरा ढासळला, अन् निर्जीव जिणे जगणे भाळी आले. त्यात उपेक्षेने भर घातली आणि आता तर उसासे सोडत भूतकाळ चघळीत बसणे एवढेच हाती राहिले ! तो उन्माद ती मदान्धता, ते मनस्वी जीवन कुठल्या कुठे लुप्त झाले ! अन् उरले स्मरणगाथेचे चिंतन !

अत्यंत उदासवाणे वाटत राहते, या साऱ्या वास्तू पाहताना ! कारण त्या आपण व्यवस्थित सांभाळल्या नाहीत, त्यांचे महत्त्व जाणले नाही, इतिहासाचे भान राखले नाही, नाविन्याच्या मागे लागल्याने त्या वास्तूंच्या सौंदर्यावर ओरखडे ओढून त्याना विद्रूप केले आणि करंटेपणा दाखवला !

"नायकिणीचा सज्जा" पाहून झाला की परत फिरावे. मराठीतील एक दिग्गज कविवर्य मोरोपंत यांच्या आधुनिक स्मारकाला भेट द्यावी, तिथंच असणारी, दुर्लक्षित झालेली इतर मंदिरं पहावीत अन् मागे फिरावे !

काही कालावधी उपलब्ध असल्यास अर्धा मैल दूर असलेल्या पवनगडाकडे वळावे.

पन्हाळ्याच्या पाठीशी सख्ख्या भावाप्रमाणे उभा असणारा हा पवनगड सहसा पाहण्यासाठी कोणी जात नाही. पन्हाळ्याइतके त्याचे भाग्य उजळले नाही.

शिवाजी महाराजांच्या जीवनाला वळण लावणारा, महाराजाना सतत भुलवणारा पन्हाळा अंतिम क्षणापर्यंत मराठी साम्राज्याशी एकनिष्ठ राहिला. राजाराम महाराजाना जिंजीस जाताना म्हणाला होता,

"महाराजांच्या जिवावर बेतण्यास कारणीभूत झालो होतो. प्रमाद घडला त्यावेळी ! आता, तसं घडणं नाही ! स्वराज्याची सेवा हाच धर्म !"

पन्हाळ्याने प्रमाद पुसून काढला आपल्या वचनाने ! त्याने स्वराज्याची पुनः वंचना केली नाही ! तो स्वराज्याशी एकनिष्ठ राहिला !

कारण त्याच्यावर तसा संस्कार घडवला होता शिवाजी महाराजांनी !

● ● ●

# राजगड

स्वराज्याची राजधानी म्हणून पंचवीस वर्षे ज्या दुर्गानं वैभवाचं दिवस पाहिले त्या दुर्गाचं नाव आहे राजगड !

राजगड म्हणजे शिवाजी महाराजांचे पहिले राजकीय केंद्र ! त्यांच्या जीवनातील सुखदु:खाचा, चढउतारांचा, नि मावळातल्या अगणित मावळ्यांच्या निष्ठेचा साक्षीदार !

गुंजण मावळ प्रदेशात म्हणजेच फारतर मुरुमखोऱ्यातील सह्याद्रीच्या एका डोंगर रांगेत असणारा दुर्ग !

गुंजण मावळ भागात 'प्रचंडगड' नावाचा एक दुर्ग होताच. तो तसा आदिलशाही आधिपत्याखाली असला तरी त्याकडे आदिलशाहीचे दुर्लक्ष झालेले होते. प्रचंड विस्तार असूनही त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे हे हेरून शिवाजी राजांनी तो हस्तगत केला अन् त्यालाच प्रसिद्धीस आणला तो 'तोरणा' या नावानं !

या 'तोरणा' नावाच्या दुर्गापासून 'मुरुमदेव' अथवा 'मुरूंबदेव' केवळ ६.५ किलोमीटर अंतरावर अहे. 'मुरुमदेव' हा तसा मुस्लिमपूर्व काळात अस्तित्त्वात असावा असे अनुमान काढता येते. कारण इ. स. १४९० च्या काळात अहमदनगरचा संस्थापक अहमद बहिरी याने बालेघाट, तळकोकण विभागातील महत्त्वाचे दुर्ग जिंकून पश्चिम महाराष्ट्रात प्रभाव निर्माण केला. त्याने जिंकलेल्या शिवनेरी, चावंड, लोहगड, तुंग, तिकोना, कोंढाणा पुरंदर इत्यादि दुर्गासमवेत "मुरूंबदेव" जिंकल्याचा उल्लेख आहे. अर्थात मुरुंबदेव जिंकला गेला तरी त्यावेळी तो "राजगड" झालेला नव्हता हेही खरेच ! तसेच मुरुंबदेव हा निजामशाहीत साधारणत: १२५ वर्षे राहिला. याचा अर्थ त्या दुर्गावर पुन: इतरांचं आक्रमण झालं नाही असाही होतो.

यालाही एक विशेष कारण आहे. अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा, बीदर, येथल्या राज्यकर्त्यांनी आपल्या राजधान्या आणि राज्यविस्तार यासाठी मैदानी प्रदेशांची निवड केल्याने गिरीदुर्गांचे महत्त्व कमी होत गेले होते. त्यांच्या दृष्टीने सपाटप्रदेश सोयीचा होता. परिणामत: बहुतेक गिरीदुर्ग दुर्लक्षित होत गेले. शिवाजी राजांनी नेमके हेच ओळखले नि एक एक करीत गिरीदुर्ग जिंकण्यास प्रारंभ केला. प्रचंडगडानं त्याना पहिले यश दिले. स्वराज्याचे तोरण बांधले गेले अशी भावना झाल्याने राजांनी त्याचे 'प्रचंडगड' हे नाव बदलून 'तोरणा' हे नाव रूढ केले. तोरण्याच्या अग्नेय दिशेस असणारा मुरुंबदेवाचा डोंगर तोपर्यंत निजामशाहीकडून

आदिलशाहीकडे आला होता. प्रचंडगडाला समीप असणारा हा "मुरूंबदेवाचा डोंगर" आपण हस्तगत करायलाच हवा असे विचार राजांच्या मनात येणे स्वाभाविक होते. तोपर्यंत 'मुरुमदेवाचा डोंगर' तसा सुस्त असला तरी आदिलशाहीकडून निजामशाही, निजामशाहीकडून आदिलशाही अशी शहाजी राजांची "शाही" बदलण्याची कृती होत गेल्यामुळे त्याची हस्तांतरणे होत राहिली होतीच.

इ. स. १६४७ ला दादोजी कोंडदेवांचा मृत्यू झाल्यावर मात्र शिवाजी राजांनी वेगाने राजकीय चाली खेळण्यास प्रारंभ केला. कारण संपूर्ण जहांगीर सांभाळण्याचे उत्तरदायित्व त्यांच्या शिरावर येऊन पडले. त्यावेळेपासून !

या उत्तरदायित्वाचा लाभ उठवून शिवाजी राजांनी "मुरुंबदेवाचा डोंगर" आपल्या आधिपत्याखाली आणला असला पाहिजे. "जेधे करिना" मधील उल्लेखावरून या विचाराप्रत येता येते.

प्रचंडगडाचे जसा 'तोरणा' हे रूपांतर झाले तसेच 'मुरुमदेव' ही "राजगड" झाला. राजानी मुरुमदेवाला 'राजगड' हे नाव ठेवण्यात औचित्य तर दाखविले आहेच तसेच दूरदृष्टीही ! असे नामाभिधान करण्यामुळे दोन गोष्टी साध्य झाल्या. पहिली ही की तत्कालीन मुस्लिम राजवटीला अंधारात ठेवण्यात यश येत गेले कारण कागदोपत्री उल्लेख 'राजगड', व्यवहारात नाव 'राजगड' नी बोलाचालीत नाव 'राजगड' रूढ करण्यामुळे मुरुमदेव ह्या आदिलशाहीच्या दुर्गासंबंधी कुठलीच चिंता आदिलशाहीच्या राजसभेत करण्याची आवश्यकता उरली नाही. तसेच दुसरा लाभ म्हणजे स्वराज्यात असणारा हा दुर्ग 'राजाची राजधानी आहे' असं मत रूढ होत गेलं, जनसामान्यांच्या मनांत स्वराज्याचं मूळ रूजत गेले, तसेच स्वराज्यासंबंधीच्या निष्ठा वाढीस लागत गेल्या ते निराळेच. दुहेरी हेतू साध्य होत गेले या नव्या नामकरणामुळे !

हिंदवी स्वराज्याचे स्वप्न उरी बाळगूनच शिवाजी राजानी आपले प्रत्येक पाउल उचलले होते. हे कार्य करीत असता त्यांनी दूरदृष्टी ठेवली होती. त्या दूरदृष्टीचा एक भाग म्हणजे राज्यकारभार करण्यासाठी एक असं स्थान हवं की जेणेकरून आपणांस सोयीचे, शत्रूस अत्यंत अडचणीचे नि प्रजेला आश्वासक वाटावे असे स्थान हवे, असा भूभाग निवडावा नि तेथून सूत्रं हलवता यायला हवीत.

'राजगड' हा तसा धड देशावर नाही वा धड सह्याद्रीच्यावर कुशीत नाही अशा मध्यभागी वसला आहे. पूर्वेकडून पश्चिमेकडे जस जसे जात रहावे तस तसे दऱ्याखोऱ्यांचा लाभ मिळत जातो नी वाटचाल दुर्घट, दुर्गम होत जाते, उलट राजगडाहून पूर्वेकडे निघाल्यास सपाट प्रदेशाकडे जायला मिळते. तसला प्रकार

दक्षिण उत्तर दिशाना आढळत नाही. दोन्ही दिशांना सह्याद्री पसरला असल्याने जवळजवळ चढ उताराचा डोंगरासारखाच प्रदेश पादाक्रांत करावा लागतो. या परिसरात राहणाऱ्या मावळ्यांना त्याचे काहीच वाटणार नाही कारण त्याना तशा प्रदेशाची जन्मजात सवय असते. मात्र अन्य प्रदेशीयांना या भागात येण्यापूर्वी पुष्कळ विचार करावा लागलेला असतो, या साऱ्याचा विचार करून राजगडची निवड केली गेली.

राजधानी अजिंक्य असल्यास उत्तमच. परंतु तसे घडणे अवघड असते, म्हणून त्यातल्या त्यात अधिक संरक्षण लाभावे अशी उपाययोजनासुद्धा करावी लागते. शिवाजी राजानी याचासुद्धा विचार केलेला होता.

'राजगड' अशा विचारानी तपासून त्यानुसार निरनिराळ्या संरक्षण सामग्रीने रक्षिला गेलाय. राजगडाचा घेरा इतका मोठा आहे की त्याला वेढा घालताच येणार नाही. घालायचा म्हटला तरी फार मोठे सैन्य गुंतवून ठेवावे लागेल अशा रीतीने त्याची पुनर्रचना करून घेतली गेलेय. कोणत्याही दिशेने राजगडाकडे यायचे म्हटले तरी नैसर्गिक अडथळे पार करावेच लागतात हेही ध्यानात घेण्यात आले आहे. मार्गासनी गावाजवळ गुंजवणी नदी आहे ती ओलांडावीच लागते. पुढे गुंजवणे गाव ओलांडले की चढणीस प्रारंभ होतो. दरडग्याच्या वाडीपासून चढण अतिशय दमछाक करणारी ठरेल एवढी उभी आहे. या मार्गाने आजचा राबता असला तरी हा मार्ग चोरदिंडीपाशी नेऊन पोहोचवितो. पूर्वी हा मार्ग क्वचितच उपयोगात येई. त्याऐवजी गुंजण दरवाजा मार्गाने व्यवहार चाले.

गुंजवणेपासून असणारा मार्ग गुंजण द्वारापाशी आपल्याला घेऊन जातो. असे असले तरीही वाट अत्यंत चढाची असून त्रासदायक होती नी आताही त्रासदायक आहे. आता तो मार्ग घनदाट जंगलामुळे जवळ जवळ पुसून नष्ट झालाय ही गोष्ट निराळी. पण एकेकाळची ही वाट अवघड होती, तशी आजही आहे. हे लक्षात घेऊन ती शक्यतो टाळावी. पाबे गावाकडून आलात तर कानंदी नदी ओलांडावीच लागते, खरीव गावातून खरीव खिंडीचा चढाव चढून आल्यावर वाजेघरात येता येते. इथून उजव्या वाटेने आल्यास पाली दरवाजा लागतो. तर डाव्या वाटेने आलो तर चोरदिंडी लागते. कोणत्याही दिशेने आले तरी चढण अवघड राहील अशी निसर्गानेच दक्षता घेतलेली आहे, हे लक्षात ठेवायला हवे.

तिसरा मार्ग मळे नावाच्या गावापासून आहे. या गावाला येण्यासाठी भाटघरच्या धरणामधून होडीने यावे लागते. त्यामुळे हा मार्ग रोमहर्षक आहे. प्रत्येक मंगळवारी भोरच्या बाजारासाठी धरणामधून होड्या मिळतात. मळे गावी पोहोचल्यानंतर सुवेला मातीच्या 'चोरदिंडी' समीप पोहोचता येते.

रायगड जसा एकसंध वाटतो, तसा राजगड नाही, तीन दिशाना - आग्नेय, नैऋत्य आणि उत्तर दिशांना, पसरलेल्या मुरुमदेव विभागाच्या डोंगररांगानी त्याला तीन माच्या नी एक दुर्ग प्राण म्हणजे बालेकिल्ला अशा स्वरुपात विभागलं आहे.

प्रत्येक माची तसं म्हटलं तर एक स्वतंत्र दुर्गच आहे. परंतु पद्मावती माची नी दुर्गप्राण (बालेकिल्ला) हा भाग विशेष महत्त्वाचा आहे. कारण एकट्या पद्मावती माचीवरच काय ती सपाटी उपलब्ध आहे. तोच प्रकार दुर्गप्राणाचा !

यामुळे दुर्गावरची सगळी महत्त्वाची ठाणी पद्मावती माची नि दुर्गप्राणावर आहेत. दैनंदिन कारभारासाठी सगळी कार्यालये पद्मावती माचीवर होती. परिणाम स्वरूप या माचीची संरक्षण व्यवस्था विशेष लक्ष देऊन दृढ केलेली होती. दुर्गाचा विशेष राबता पाली दरवाजाने होता, त्यामुळे पाली गावाकडचा पहिला दरवाजा अंबारीसह हत्ती येऊ शकेल एवढा उंच नि रुंद आहे.

दुसऱ्या दरवाजापर्यंत येईतो निर्माण केलेल्या पायऱ्यामुळे एक परकोट निर्माण करून आपोआप शत्रूवर मारा करण्याचे साधन उपलब्ध करून ठेवले आहे.

अशा रीतीने दुर्गावर येण्याचे मार्ग दुर्घट, संरक्षणदृष्ट्या सोयीचे, शत्रूला दुर्घट, अडचणी निर्माण करतील अशी दक्षता घेऊन निर्मिले आहेत.

त्याचवेळी दुर्गाच्या तीन दिशांना असणाऱ्या मुरुमदेव डोंगराच्या तीन सोंडींना संरक्षक भिंत बांधून, त्या बाह्य भिंतीना पुनः आवश्यक तेथे उपभिंती बांधून भक्कम स्वरूप दिलं आहेच.

राज्याचा प्राण म्हणजे राज्यकारभारासाठी आवश्यक असणारी कार्यालये होत. ही शासकीय कार्यालये पद्मावती माचीवर होती. त्यामुळे, नि दुर्गप्राणावर ज्यासाठीचा मार्ग पद्मावती माची मधूनच जात असल्याने पद्मावती माचीची रक्षणव्यवस्था विशेष पद्धतीने केलेली होती.

गुंजवणे द्वारामधून प्रवेश केला तरी पद्मावती माचीवर येण्यासाठी आणखी पुनः एक संरक्षक भिंत बांधून काढली होती ती मधूनच आत यावे लागे. कारण या माचीवर, ढालकाठी, स्वतः छत्रपतींच्या वाड्याचे आवार, पद्मावतीदेवीचे देऊळ, रामेश्वर देऊळ, पद्मावती तलाव, दिवाणघर, अश्वशाला, धान्यभांडार, 'सदर' इ. स्थळे आहेत. दुर्गावर असणारा हा भाग अत्यंत महत्त्वाचा होता. स्वराज्याच्या निर्मितीकालातील पुष्कळ रोमहर्षक घटना या भागानं अनुभवल्या. मग ती घटना पन्हाळ्याहून सिद्दी जौहरच्या वेढ्यातून निसटून विशाळगडास सुखरूप पोहोचण्याची असो, वा आगरा येथून औरंगजेबच्या मगरमिठीतून सुटका करून घेऊन साधूरूपाने गडावर पाय ठेवण्याची असो, किंवा पुण्याच्या स्वतःच्या वाड्यात ठाण मांडून बसलेल्या शाहिस्तेखानाच्या मनांत भीती निर्माण करून त्याला तेथून

पलायनाला भाग पाडणारी असो किंवा सुरतहून लुटून आणलेल्या द्रव्यसंचयाची असो. या साऱ्या घटना मुक्त मनाने या माचीने स्वीकारल्या./

या माचीवर असणाऱ्या ढालकाठीनं हिंदवी स्वराज्याचा ध्वज २५ वर्षे मस्तकी मिरवला. स्वराज्याच्या राजधानीचा मान इ. स. १६७४ ला रायगडानं संपादिला. राजगडाचे महत्त्व ओसरले. राबता कमी झाला. पण त्यानं अंगाखांद्यावर बाळगलेल्या घटना, उरी जपलेल्या मधुर स्मृती इतिहासाला क्षीण करता आलेल्या नाहीत, करता येणार नाहीत.

असा हा राजगड.

सर्वसामान्य व्यक्तीने पुणे-वेल्हे राज्य परिवहन महामंडळाच्या वाहनाने पाबे गावापर्यंत यावे, अथवा ज्याला विशेष साहस करायचे आहे अशाने मार्गासनी येथे उतरावे.

मार्गासनीहून १२ कि. मी. अंतराची पायपीट करावी लागते तर पाबेपासून वाजेघरापर्यंत, तेथून पाली दरवाजा असा मार्ग त्यातल्या त्यात कमी अंतराचा असल्याने, दोहोपैकी आपणास सोयीचा असणारा निवडून तो घ्यावा.

मार्गासनीमार्गे आलात तर चोरदिंडीतून प्रवेश घ्यावा लागतो तर पाबेकडून पाली दरवाजाकडून प्रवेश घ्यावा हे उत्तम.

पहिल्यांदा येणाऱ्याने पाबेमार्गे यावे नि गड उतरताना चोरदिंडी, दरडग्याची वाडी, गुंजवणे, साखर मार्गासनी असा पथ स्वीकारावा.

कोणीकडूनही आले तरी पद्मावतीवरच प्रवेश असल्याने चोरदिंडीतून प्रवेश केला की पद्मावती तळे, पद्मावती देऊळ असा क्रम येतो. दुर्गावर आल्यानंतर पद्मावती देवीचे दर्शन घेऊन समीप असणाऱ्या कार्यालयात आपण आल्याची नोंद करावी. दुर्गाचा एक सेवेकरी तिथं असतो. त्याच्याकडून अल्प माहिती घेतली तरी चालते.

दुर्गावर राहण्यासाठी पद्मावती मंदिराव्यतिरिक्त, तसेच रामेश्वरमंदिर नि अंबरखाना या व्यतिरिक्त बंदिस्त स्थाने नाहीत. भोजन व्यवस्थाही नाही. त्यामुळे, उघड्यावर झोपण्याचा निश्चय करून वा तशी सज्जता ठेवून यावे. राजगड पाहण्यासाठी २४ तास आवश्यक आहेत. एक सूर्यास्त एक सूर्योदय पाहायचाच असा दृढ निश्चय असावा हे उत्तम. तेवढा २४ तासांचा कालावधी दुर्ग व्यवस्थित पाहण्यासाठी अत्यावश्यक आहे. कारण त्याचा विशाल विस्तार हेच आहे.

पद्मावती माचीवर असणाऱ्या मंदिरापासून दक्षिणेस एका उंचवट्यावर महाराजांचा राजवाडा होता. तिथं जाण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत अथवा रामेश्वर मंदिरासमोरून असणाऱ्या वाटेने गेले तरी चालण्यासारखे आहे.

राजवाड्याची जोती दक्षिणोत्तर असून त्यापैकी पूर्वेकडचे जोते कार्यालयीन विभागासाठी उपयोगात आणले जात असावे असे भासते. या राजवाड्याच्या आग्नेय दिशेला लहानशी वास्तू आहे ती अंबारखाना म्हणजे धान्यभांडार या नावाने ख्यात होती. राजवाड्याच्या दक्षिणेस अश्वशाला होती. विशेष म्हणजे राजवाड्याच्या दक्षिणेस असणारे तळे आजसुद्धा स्वच्छ पाणी पुरवते. पद्मावती मंदिराच्या दक्षिणेस, दुर्गाच्या आजच्या कार्यालयाच्या ईशान्येस दोन टाकी आपणास पाणी पुरवठा क़रीत असली तरी राजवाड्यासाठी, तिथल्या शिबंदीसाठी या तळ्याचा उपयोग केला जाई. या तळ्याच्या वायव्य दिशेकडूनच पाली दरवाजाकडचा राबता होता. आजसुद्धा तो तसाच आहे. या मार्गावरच 'सदर' नावाची वास्तु होती. 'सदर' म्हणजे प्रमुखस्थान म्हणजेच 'मुख्यालय' इंग्रजीनुसार 'हेडक्वॉर्टर' म्हणजेच सर्व शासकीय निर्णयांची कार्यवाही केली जाते की नाही हे पाहण्याचे, आज्ञा प्रसारित करण्याचे, अस सर्व तक्रारी निवारण्यासाठी विनंती करण्याचे स्थान !

हे ओलांडून दक्षिणेकडे यावे. चढणीच्या मार्गावरच ढालकाठी लागेल ती ओलांडून तसेच पुढे चालत रहावे पुनः एक तट लागेल हा पद्मावती माची संजीवनी माची नि सुवेळा माची याना विभागतो. उजव्या हाताला उंच दुर्गप्राण



*राजगड – किल्ला प्रवेशद्वार*

वक्षस्थळावर येतोय अशी भीती दाखवतो. त्याच्या पायथ्या पायथ्याने चालत रहावे म्हणजे आपण राजगडाच्या शिरोभागाकडे जाणाऱ्या स्थळी येऊन पोहोचतो. दुर्गप्राणाकडे जाणारा मार्ग अत्यंत कठिण नि अरुंद आहे. ज्या टेकडीवर दुर्गप्राण (बालेकिल्ला) वसवला/बांधला आहे ते टेकाडच मुळी निमूळते, सरळ, नि उंच असल्यामुळे दुर्गप्राणाची चढण अत्यंत अवघड आहे. दुर्गप्राणाच्या चढणीसाठी खडकात कोरलेल्या पायऱ्या असून एका दिशेला अतिशय खोल दरी आहे. उजव्या हाताला भिंतीसारखा कडा तर डाव्या हातास खोल दरी आणि अशा स्थळातून वर चढण्याचे कष्ट घ्यायचे म्हणजे सराव नसलेल्याना महाकष्टप्रद, भीतीदायक नी जीवघेणे काम वाटले तर नवल नाही. दरीच्या दिशेला आता सुरक्षिततेसाठी लोखंडी कांबा आहेत, तरीही चढताना, उतरताना भय हे वाटतेच ! शिवकालात हा भाग जिंकणे किती अवघड असेल याची कल्पना येते.

चढण संपल्यावर दुर्गप्राणाचे महाद्वार रक्षण्यासाठी शिबंदी होती त्यांच्यासाठी असणाऱ्या गुहेच्या आकाराच्या विश्रामगृहासमीप एक प्रवेशद्वार होते, याची चिन्हे उपलब्ध आहेत. ती पहाता दुर्गप्राणाच्या माथ्यावर आपण पोहोचलेलो असतो. दुर्गप्राणाचा महादरवाजा अष्टकोनी असून दोन्ही दिशाना अष्टकोनी कपीशीर्षक (बुरूज) आहेत. या द्वाराचे मुख पूर्वेकडे तोंड करून असून त्यावर स्वस्तिक, कमळ यासारखी शुभचिन्हे आहेत.

महाद्वारातून प्रवेश केला की प्रथम जननीदेवीचे मंदीर लागते. पुनः काही अंतरावर ब्रह्मऋषीचे मंदीर आहे. ब्रह्मऋषींच्या मंदिरामागे दक्षिणोत्तर मार्ग आहे. दोन्ही अंगास काही जोती दिसतात. ही बाजारपेठ असावी असं म्हणतात. (त्यात तथ्य नसावे) वस्तुतः ती सैनिकांची घरे असावीत हे सयुक्तिक वाटते. याच मार्गाने सरळ उत्तरेकडे उतरत यावे. अगदी टोकाला एक कपीशीर्षकापाशी आपण आलेलो असतो. इथे न विसरता एक शिला पहावी. चोरदिंडीसाठी उपयोगात आणलेल्या एक द्वारासारखी त्याची रचना महाराजांच्या हेरविभागाची क्षमता दाखवते.

याच कपीशीर्षकासमीप केवळ दोन हातावर असणारी चोरदिंडी सहजासहजी लक्षात येत नाही. पण तरीही आठवणीने पहावी.

परत मागे फिरावे. दुर्गप्राणाच्या काही पायऱ्या चढून दुर्गाच्या माथ्यावर आणणाऱ्या राजवाड्यापाशी आपण आलेले असतो. एकमेव उद्ध्वस्त वास्तू, चार भिंतीनी युक्त अशा या वास्तूत महाराज, त्यांचे कुटुंबीय रहात. तर एकदम पश्चिमेस स्फोटकशाला (दारूचे कोठार) होती.

या स्थळी शासनाने एक गोष्ट चांगली केलेय. एकेका स्तंभावर पोकळ नळ्या बसविलेल्या असून त्यामधून राजगडाच्या चहूदिशांना असणाऱ्या निरनिराळ्या दुर्गांचे स्थान, ते दुर्ग ओळखता येतात.

दुर्गप्राण उतरून पुनः दक्षिणेकडे चालत रहावे. आपण सुवेळा माचीकडे यायला निघालेलो असतो. जवळ जवळ एक कि. मीटर अंतर चालल्यानंतर प्रत्यक्ष सुवेळा माचीवर यायला होते.

मार्गात एक उंचवटा आहे. तीत पुष्कळ वृक्ष आहेत याच वृक्षराजीत शिवकालात या माचीवर राहणाऱ्या सैनिकांची, अधिकाऱ्यांची घरे होती. तानाजी मालुसरे, येसाजी कंक, शिलीमकर, सरनौबत इत्यादी अधिकाऱ्यांची निवासस्थाने या "डुब्या"वर होती. हा "डुबा" ओलांडून पुढे आले की माचीचा प्रत्यक्ष तटबंदीचा भाग प्रारंभ होतो.

येथील तटबंदी दोन टप्यांची आहे. प्रत्येक टप्याच्या अंती एक भरभक्कम कपीशीर्षक (बुरुज) आहेच. आजही त्यांच्या पायऱ्या उत्तम स्थितीत आहेत. दुसऱ्या टप्प्यात गेल्यानंतर तटबंदीच्या दोन्ही बाजूस आतून भुयारी चिलखतासारखा परकोट आहे तो अवश्य पहावा. दुसऱ्या टप्याकडे जाताना एक उंच खडक आहे त्या खडकात तीन मीटर व्यासाचे आरपार छिद्र आहे. फार दुरूनही ते दिसते. त्याला 'नेढे' म्हणतात तेही पहावे. सुवेळा माचीला एकूण १७ कपीशीर्षके (बुर्ज) आहेत यापैकी ७ कपीशीर्षकाना संरक्षण देण्यासाठी आतून पुनः उपकपीशीर्षक (चिलखती बुरुज) बांधून काढलेले आहेत.

विशेष म्हणजे या सुवेळा माचीवरसुद्धा एक मुख्यालय म्हणजेच "सदर" आहे अगदी असलाच प्रकार संजीवनी माचीवरसुद्धा आहे. याचा अर्थ असा की त्या त्या माच्यांकडे काही निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले होते. कारण संपूर्ण नियंत्रण करणारे मुख्यालय आणि माचीवरील कार्यालय अथवा तेथला भाग पद्मावती माचीपासून जवळजवळ दीड दोन मैल अंतराचा ठरतो. शासकीय शक्तीचे विकेंद्रीकरण करण्याचा, राज्यकारभार लोकाभिमुख करण्याचाच तो एक प्रकार ठरतो.

राजगडाच्या संरक्षणाच्या दृष्टीने केलेली परकोटाची रचना तेथली शिबंदी, तेथले मुख्यालय, तेथली व्यवस्था याकडे लक्ष दिले तर असे जाणवते की प्रत्येक माची जवळजवळ एक उपदुर्गच होता.

सुवेळा माचीनंतर महाराजांनी संजीवनी माचीकडे लक्ष पुरवले. सुवेळा माची प्रमाणेच प्रत्येक टप्प्याला पश्चिमेस भरभक्कम कपीशीर्षके बांधून उपकपीशीर्षकांची (चिलखती बुरुज) व्यवस्था करून सुनियोजित योजना कार्यान्वित केलेली होती.

नेहमीप्रमाणे पाणी पुरवण्यासाठी दोनी माच्यावर अनेक टाकी बांधून काढली आहेत. इथेही भुयारी परकोट आहेच. या भुयारी परकोटाचा अन्य उपयोग म्हणजे दुर्गावरील सैनिकाना लपून राहता येईल. या संजीवनी माचीवर प्रवेश करण्यासाठी

'आळू' नावाचे प्रवेशद्वार होते. मार्गामध्ये अनेक तुटलेले कडे असल्याने या मार्गाचा अवलंब अगदी क्वचित वेळी केला जाई. मळे गावाकडून येणाऱ्यांना याचा उपयोग होई. पण मुख्य राबता जवळ जवळ नव्हताच.

स्वराज्याची स्थापना झाल्यावर राजगड हे मुख्य केंद्र केले ते तेथील संरक्षणव्यवस्था राज्यविस्तारास उपयोगी होती म्हणून! पण जसजसा स्वराज्यविस्तार वाढत चालला तसतसा राजगड स्वराज्याचे मुख्यालय म्हणून थिटा पडत चालला त्यामुळे 'रायगडा'ची निर्मिती करणे अवश्य ठरले.

या दुर्गावर सतत चार अधिकारी असत. सरनोबत, हवालदार, कारखानीस, आणि सबनीस. शिवकालात हे सर्व व्यवस्था पहात आता केवळ (नामधारी) हवालदार असतो.

एकेकाळी (आतासुद्धा) दुर्गप्राणाच्या उत्तरेकडे असणारा सिंहगड वायव्येचा प्रचंडगड (म्हणजेच तोरणा) पश्चिमेचा रायगड. लिंगाणा, नैऋत्येचा कोटरगड, मंगळगड, एकदा जो दक्षिणेकडचा मनमोहनगड, केंजळगड, आग्नेयेचा विचित्रगड, ईशान्येचा पुरंदर, रूद्रमाळ राजगडालासाद घालीत असत, त्याला न्याहाळीत असत !

शंभू राजांच्या हत्त्येनंतर जून १६८९ ला किशोरसिंह हाडा या मोगल सरदाराने हा जिंकला पण मराठ्यांनी तो पुनः जिंकला. पण मोगलानी १७०४ ला तो पुनः घेतला तरी २९ मे १७०७ ला तो पुनः स्वराज्यात जो आला तो १८१८ पर्यत.

१६७० ला राजाराम महाराजांचा जन्म याच दुर्गावर झाला. राजगडावर जन्म म्हणून मुलाचे नाव राजाराम ठेवले गेले असा इतिहास आहे. राजगडाहूनच महाराजानी तान्हाजीस ४ फेब्रुवारी १६७०ला सिंहगड घेण्यास पाठवले होते हेही तेवढेच महत्त्वाचे आहे. राजाराम महाराजांनी जिंजीहून परतल्यावर मोगलाविरुद्ध लढण्यास राजगड हेच मुख्य केंद्र केले होते. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतरही राजगडचे महत्त्व कमी झाले नाही हे विशेष ! मोगलानी हा जिंकल्यावर याचे नाव ठेवले. "नबीशहा गड" ! पण ते टिकले नाही मराठ्यानी तो जिंकला तो जिंकलाच नि राजगड पुनः राजगडच राहिला तो आतापर्यंत !

भारत स्वतंत्र होण्यापूर्वी भोरचे संस्थानिक याची व्यवस्था पाहात. भारत स्वतंत्र झाला, संस्थाने विलीन झाली नी एकदम सारे सरले.

आता वैभव सरलेय. नैराश्य आलेय पण म्हणून चेतना काही कमी झाली नाही ! इतिहासात नोंदलेले मानाचे स्थान वक्षस्थळी मिरवीत राजगड आजही म्हणतोय "जगदंब ! जगदंब !! जगदंब !!!".

●●●

क्रं. ८०९० २८३२७ राजापाड...

# सज्जनगड

महाराष्ट्रातील सर्व दुर्गांमध्ये 'सज्जनगड' हा एकच एक असा दुर्ग आहे की शिवकालापासून तो नित्य प्रकाशात राहिलाय नि तिथं सातत्यानं राबता राहिलाय.

आता महाराष्ट्र शासन 'रायगड' संदर्भात नवी दृष्टी ठेवून तिथं प्रवाशांची रीघ लागेल, तो गर्जत राहील अशी व्यवस्था करण्यामागे लागले आहे हा भाग निराळा ! रायगड तसा चढायला दुर्गम, म्हणून तर रज्जुमार्ग (रोपवे) निर्माण करण्याची योजना राज्यकर्त्यांच्या मनी घर करून बसलेय. एकदा का रज्जुमार्ग झाला की दुर्गाचे दुर्गेयत्व सरेल नि मग तिथं प्रवाशांची टोळकीच्या टोळकी यायला लागून आधुनिक सभ्यतेच्या संस्कृतीचा प्रादुर्भाव प्रारंभेल, इतिहास लुप्त होईल, उरेल ती केवळ स्मृती. हा अनुभव नवा नाही. पण शासनाला हे सांगणार कोण?

पन्हाळा, सिंहगड, सज्जनगड येथे अगदी प्रवेशद्वारापर्यंत राज्यपरिवहन मंडळाची वाहने केव्हाच जाऊन पोहोचल्याने एका दृष्टीने सुविधा प्राप्त झालीय, पण दुसऱ्या दृष्टीने दुर्गाचा प्राण हरवत चालल्याचे दृष्य दिसते त्याचे काय? 'सज्जनगड' शिवाजी महाराजांपासून गरजतोय, प्रेरणा देतोय, कर्मयोग शिकवतोय. कर्मयोग नि राजकारण अंगी बाणावे म्हणून सतत प्रयत्नशील राहतोय. तेथल्या सेवक मंडळींनी केलेल्या प्रत्येक कृतीला भरभरून प्रोत्साहन देतोय. कारण?

कारण समर्थ म्हणत राजा कसा असावा? तर –

गनिमांच्या देखता फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा ।
ऐसा पाहिजे की राजा । कै पक्षी परमार्थी ॥
तयासी देखता दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे ।
बंडपाषांडांचे वारवे । सहजचि होती ॥
हे धूर्तपणाची कामे । राजकारण करावे नेमे ।
ढिलेपणाच्या संभ्रमे । जाऊ नये ॥

शिवाजी महाराजांनी समर्थांच्या उक्तिप्रमाणे ही शिकवण आपल्या अंगी बाणवली होती. महाराज खटनटासी खटनट होत, उद्धटासी उद्धट बनत, जशास तसे भेटत. यामुळे पुष्कळ वेळेला या राजकारणामुळे मनातून थकून जात. त्यांना मानसिक तसेच शारीरिक विश्रांतीची आवश्यकता भासे.

त्यांच्या मनाला उभारी देणारा, त्यांच्या श्रमाला परिहार देणारा एक संत त्याना भेटला. नाव होतं, नारायण सूर्याजी ठोसर. म्हणजेच स्वामी समर्थ रामदास !

मनात असणारी वेदना व्यक्त केली की बरे वाटते ! राजकारणाच्या धकाधकीतून आलेला थकवा नाहीसा करण्यासाठी राजे रामदास स्वामींची भेट घेत. शिवाजी राजांचे मोठेपण, द्रष्टेपण, कर्तृत्व रामदास स्वामीनी पूर्ण ओळखलं होतं, म्हणून तर रामदास स्वामींचा सक्रीय पाठिंबा राजांच्या मागे होता.

रामदास स्वामींच्या प्रत्यक्ष भेटीने महाराज शांतचित्त झाले. रामदास स्वामीसुद्धा मनी सुखावले. उभयतांच्या भेटी सौकर्याने तसेच सत्वर होण्याच्या दृष्टीने महाराजाना रामदासस्वामी कुठेतरी समीपवर्ती हवे होते. रामदास स्वामींनासुद्धा असेच वाटत असावे.

त्या ओढीतून निरनिराळ्या स्थळांची पाहणी प्रारंभली. त्या पाहणीतून कोकणातील अतिविस्तीर्ण पठारी माथा असलेला महिपतगड समर्थानी न्याहाळला. सातारा परिसरातील आटोपशीर घेराचा सपाट माथा असणारा परळी दुर्ग पाहिला. परळी त्याना विशेष रुचला. परिणामतः रामदासस्वामी परळी दुर्गात राहण्यास आले. पौष शुद्ध ९ शके १५९५ हा तो दिवस !

परळी ! त्याची केव्हा निर्मिती झालेय हे सांगणे तसं अवघड !

त्यामुळे त्याच्या निर्मात्याविषयी निश्चितपणानं विधानसुद्धा करता येत नाही.

कोणी म्हणतात आश्वलायन नावाच्या ऋषींचे वास्तव्य या डोंगरावर घडलं म्हणून या दुर्गाला "आश्वलायनगड" म्हणू लागले तर इतर काही असं म्हणतात या परिसरात अस्वलांची वसती पुष्कळ असल्याने हा अस्वलगड म्हणून ओळखला जातो. अन्य काही म्हणतात की आश्वलायनगड म्हणण्याऐवजी त्याचं सोपं सुटसुटीत नाव ठेवलं गेलं अस्वलगड. या दोहोपैकी कुणाचं बरोबर हेही ठरवणं मोठं दुष्कर ! परिणामतः त्याचा निर्माता नि निर्मिती काळ ठरवणं अवघड आहे.

साधारणतः इ. स. च्या १०-११ व्या शतकात शिलाहार राजानी साताऱ्याच्या 'अजिंक्यतारा' दुर्गासमवेत याची निर्मिती केली असावी. शंखाकृती माथा असणाऱ्या या दुर्गाच्या पायथ्याशी 'परळी' गाव असल्यानं हा 'परळी' किंवा 'परळीगड' या नावानेही ओळखला जातो. कोणी "परळीचा किल्ला" असेही संबोधतात.

बहामनी राज्याचा चौथा वंशजराजा महंमद शहा (१३५८-१३७५) याच्या राज्यकाळी परळीदुर्गाचा उल्लेख आढळतो. पुढे बहामनी राज्याचे जे विभाग झाले त्यामुळे हा विजापूरकर आदिलशाहीकडे आला, असेही आढळते.

विजापूरकर राज्ययंत्रणेने याचे नाव 'नवरसतारा'असं ठेवलं, काहीस्थळी "नौरसतारा" असा उल्लेख आढळतो. अर्थात लेखन शैलीच्या, उच्चार पद्धतीच्या वैचित्र्यामुळे अथवा विविधतेमुळे तसे घडले असावे.

पण अधिकतर दृष्टीने पाहू गेल्यास हा दुर्ग 'परळीगड' 'परळी' या नावानेच विशेष ओळखला जाई इ. स. १६७३ ला शिवाजी राजानी मंगळवार चैत्र वद्य १० शके १५९५ म्हणजेच २ एप्रिल १६७३ या दिवशी आदिलशाहीकडून हा जिंकून घेतला. याचा अल्पसा पूर्व इतिहास पाहिल्यास अफझलखानाचा मुलगा फाजलखान हा या दुर्गाचा दुर्गाधिपती असल्याचे आढळते.

हा दुर्ग स्वराज्यात आल्यावर शिवाजी राजाना वाटू लागले की समर्थ रामदास स्वामींनी स्वराज्यातल्या त्याना आवडेल अशा दुर्गावर वास्तव्य करून रहावे.

रामदासानी परळीच्या दुर्गाची निवड केल्याने महाराजानी त्याकडे विशेष लक्ष पुरवले. समर्थासमवेत आलेले संत सज्जन आणि त्यांचा शिष्यपरिवार यामुळे दुर्गाची महत्ती वाढली. या सर्व संतमंडळीना प्रारंभी दुर्गावर असणाऱ्या ओवऱ्यातूनच रहावे लागले. परंतु शिवाजी राजानी सत्वर समर्थ रामदासस्वामींसाठी एक मठ बांधून घेतला. त्या काळात जवळजवळ दोन सहस्र होन इतके द्रव्य त्यासाठी लागले.

शिवाजी राजे सिंहासनाधीश झाल्यानंतर काही काळानी ते 'परळी'वर आले. साधारणत: राजे दीड महिना तिथे वास्तव्यास राहिले असे इतिहास सांगतो. एवढेच नव्हे तर अशी आख्यायिका आहे की या दीड महिन्याच्या वास्तव्यात रंगनाथ स्वामी निगडीकर, जयरामस्वामी वडगांवकर, उद्धवस्वामी, वेणाबाई, अक्काबाई, कल्याणस्वामी इत्यादी समर्थशिष्यांनी सभेत कीर्तने तर केलीच पण सभेत शिवछत्रपतीनीही कीर्तन केले आणि आपणही समर्थशिष्य आहोत, शिष्य म्हणवून घेण्यास पात्र आहोत असं दाखवून दिलं.

याच काळात परळीचे 'सज्जनगड' असं नामांतर झालं असावं. कदाचित समर्थांची जी चौदा नांवे आहेत त्यातील एक 'सज्जन' असल्यानं रामदासस्वामींचा म्हणजे 'सज्जन' यांचा दुर्ग 'सज्जनगड' असंही असणं शक्य आहे.

इ. स. १६७३ ते १६८१ पर्यंत सज्जनगड म्हणजे समर्थांचे वास्तव्यस्थान असं समीकरण रूढ झालं. नि समर्थांच्या या दीर्घ वास्तव्याचा परिणाम या दुर्गावर तर झालाच तसाच तो इतिहासावरही घडला. एकेकाळी धारातीर्थ म्हणून असणारा हा दुर्ग समर्थांच्या संप्रदायाचे तीर्थक्षेत्र सुद्धा ठरला.

परिणामत: महाराष्ट्रात जेवढे म्हणून दुर्ग आहेत त्यापैकी कोणापेक्षाही कितीतरी अधिक आख्यायिका या दुर्गासंदर्भात असून विशेष म्हणजे बहुतेक आख्यायिका या सांप्रदायिक श्रद्धेतून निर्माण झाल्या असाव्यात असे वाटते. अर्थात त्याना ऐतिहासिक पाठबळ नसेल असेही म्हणता येणार नाही, अथवा त्या सर्व ऐतिहासिकच आहेत असेही सांगता येणार नाही.

सज्जनगड शिवपूर्वकाली होता तसाच तो त्यानंतरही राहिला. तरीही इतर सिंहगड, पन्हाळा इत्यादि दुर्गासारख्या इथं फारशा लढाया झाल्या नाहीत असं म्हणणं अधिक श्रेयस्कर ठरेल.

छत्रपती शिवाजी महाराजानंतर दक्षिणेत उतरलेल्या औरंगजेबाने शंभू राजांची हत्या करून मराठी राज्यापुढे प्रश्न निर्माण करून तर ठेवलेच तसेच एका पाठोपाठ एक एक दुर्ग घेण्याचा परिपाठ चालू ठेवला. अर्थात त्याच्या वावटळीचा उपद्रव सज्जनगडासही सहन करावाच लागला.

साताऱ्याचा अजिंक्यतारा औरंगजेबाने २१ एप्रिल १७०० ला म्हणजे छत्रपती राजाराम महाराजांच्या सिंहगड येथील मृत्यूनंतर केवळ दीड महिन्यातच अजिंक्यताऱ्याचा दुर्गाधिपती प्रयागजी प्रभूकडून जिंकून घेतला नि त्याच दिवशी परळी म्हणजेच सज्जनगडाकडे त्याने फत्तेउल्लाखानास तो जिंकण्यास पाठवले. कारण परळीचा दुर्गाधिपती परशुराम त्रिंबक प्रतिनिधी हा परळीहून प्रयागजी प्रभूला सहाय्य करीत होता असं त्याला आढळलं होतं.

फतेउल्लाखानाने दुर्गास मोर्चे लावले. सज्जनगड जिंकण्यास अधीर झालेल्या औरंगजेबाने ३० एप्रिल १७०० दिवशी सज्जनगडाचा पायथासुद्धा गाठला. नि स्वतःला वेढ्यात गुंतवून घेतले.

परळी गावाकडील सपाटीवर त्याचे सैन्यशिबीर (छावनी) होते. इतर सैनिकानी चहुबाजूनी दुर्ग घेरून माऱ्यास प्रारंभ केला. एके दिवशी फतेउल्लाखानाने एका मोठ्या खडकापर्यंत आपले सैन्य नेलेसुद्धा. हा खडक दुर्गाला अत्यंत जवळ होता. जर शत्रूने "सुलतान ढवा" केला तर आपला पराभव निश्चित हे दुर्गाधिपतीला ज्ञात होते म्हणून कोणत्याही स्थितीत हा "सुलतान ढवा" होऊ द्यायचा नाही यासाठी मराठे प्रयत्नशील होते. काही मराठे यासाठी दुर्गाबाहेर पडलेसुद्धा ! मोठी चकमक झाली, पण त्यात मराठ्याना यश आले नाही, म्हणून ते दुर्गात परतले. पण त्यांच्यासमवेत काही मोघल सैनीकही घुसले. अर्थात सगळे घुसलेले सैनिक मारले गेले हा प्रश्न निराळा पण त्यामुळे चिंता वाढीस लागली.

या समरप्रसंगी फतेउल्लाखानाचा नातू मारला गेला. सुलतानढव्याचा आदेश मिळालेला असताना काही लाकूडफाटा आणावा म्हणून फतेउल्लाखान दुर्गाखाली गेला. आधी झालेली चकमक, मराठ्यांचा सततचा मारा यामुळे धसका घेतलेल्या सैनिकानी फतेउल्लाखान जवळ नाही हे पाहून जिंकलेला खडक सोडून दिला.

प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन परशुराम त्रिंबक प्रतिनिधी आणि उद्धव गोसावी यानी दुर्गावर असणाऱ्या सर्व पूजनीय मूर्ती घेऊन दुर्ग सोडला, नि जावळीच्या परिसरात असणाऱ्या वासोटा म्हणजेच व्याघ्रगड या दुर्गम दुर्गाचा आश्रय घेतला. नेमका याचवर्षी पावसाळा लवकर प्रारंभ झाला.

४ ते ६ जून १७०० या काळात प्रतिनिधी नि औरंगजेब यांच्यात वाटाघाटी झाल्या, नि ९ जून १७०० दिवशी हा दुर्ग औरंगजेबाच्या स्वामित्वाखाली देण्याचे ठरले. प्रत्यक्ष औरंगजेब १३ जून १७०० या दिवशी वर आला. तेथे असणाऱ्या मशिदीत त्याने प्रार्थना केली. नि दुर्गावर असणारी सर्व मंदिरे नष्ट करण्याची आज्ञा दिली. दुर्गाचे नाव "नौरसतारा" असे ठेवून टाकले. २१ जून १७०० पर्यंत तो तिथे कसाबसा राहिला. तिथल्या धो धो कोसळणाऱ्या पावसाने तो चांगलाच हबकला नि कंटाळला. त्याने सुरक्षिततेसाठी भूषणगडाकडे प्रयाण करण्याचा आदेश दिला.

मार्गामध्ये असलेल्या उरमोडी नदीला अचानक आलेल्या पुराने मोघल सैन्याची अक्षरशः वाताहत केली.

औरंगजेबाने आपले प्रतिनिधी म्हणून प्रारंभी मन्सूर खानची सज्जनगडाचा दुर्गाधिपती म्हणून नेमणूक केली, पण पुढे लौकरच दलपतराय बुंदेल्याचा मुलगा रामसिंग हा नियुक्त झाला.

औरंगजेब या भागातून निघून गेल्याची संधी साधून परशुराम त्रिंबक प्रतिनिधीनी हा दुर्ग परत जिंकून घेतला. वासोट्यावरच्या मूर्ती परत आणविल्या. बहुधा यानंतरच राममंदिर उभारले गेले असावे. दुर्ग पुनः उत्साहाने ओसंडू लागला.

समर्थांच्या मृत्यूनंतर त्यांच्या माघारी सज्जनगड नि चाफळ येथील देवस्थानाची व्यवस्था समर्थशिष्या आक्काबाईनी मोठ्या धैर्याने नि शौर्याने सांभाळली. त्यामुळेच त्याचे महत्त्व टिकून राहिले. ते आजपर्यंत !

आजसुद्धा शिवकालाप्रमाणेच नैमित्तिक कार्यक्रम प्रारंभतात नि संपतात. विशेष म्हणजे रात्री दहा वाजले की दुर्गद्वार बंद होते ते सूर्योदयालाच उघडते.

असा हा सज्जनगड !

या दुर्गाला यायचे असल्यास दोन मार्ग उपलब्ध आहेत.

एक परळी गावापासून निघून तीनशेहे मीटर उंचीवर असणाऱ्या दुर्गद्वारापर्यंत नेतो. यासाठी ७८० पायऱ्या चढाव्या लागतात. या पायऱ्या चढताना श्रम होतात हे जाणून निरनिराळ्या स्थळी वाटेत विश्रांती कट्टे बांधून काढले आहेत तसेच मार्गावर वृक्षछाया लाभावी म्हणून दोन्ही दिशाना वृक्षांची रांग उभी राहील अशी व्यवस्था केलेय. सातारा ते परळी हे अंतर दहा किलोमीटरचे असून राज्य परिवहन मंडळाच्या वाहनांची ये-जा सतत असते त्यामुळे त्याचा लाभ मिळतो.

दुसरा मार्ग सातारा नगरातूनच आहे. पण हा पहिल्यापेक्षा पुष्कळ सुगम आहे. कारण सातारा वाहनस्थानकापासून परिवहन मंडळाच्या वाहनाने अगदी दुर्गाच्या प्रवेशद्वारापर्यंत विनाकष्ट येता येते. गजवडी गावापासून दुर्गाच्या दक्षिण दिशेकडचा कातळ फोडून हा मार्ग बनवलाय. ज्याच्याकडे स्वतःचे वाहन आहे



*श्री छत्रपतीद्वार, सज्जनगड*

त्याना हा मार्ग अत्यंत सुखाचा ठरतो. केवळ २०-२५ पायऱ्या चढल्या की दुर्गाचे पहिले द्वार लागते.

समुद्रसपाटीपासून नउशेहे मीटर उंच असणारा हा दुर्ग विस्ताराने विशाल नाही. चहू दिशानी १५-२० मीटर उंचीच्या सरळ तुटलेल्या कड्यानी बंदिस्त असणारा हा दुर्ग केवळ १६७० मीटर परिघाचा असून पश्चिमेकडे चिंचोळा होत गेलाय. दुर्गावर बहुतेक स्थळी सपाटीच असल्याने फिरण्यातही श्रम होत नाहीत.

त्यातल्या त्यात आधी सूचना दिली की भोजन व्यवस्थासुद्धा होऊ शकते. निवासाची सुविधाही उपलब्ध होते. त्यामुळे इतर दुर्गात असणारी असुविधा इथं अनुभवावी लागत नाही.

आपण कोणत्याही मार्गाचा अवलंब केला तरी चालेल, पण दुर्ग चढण्याचा आनंद घेण्यासाठी परळी गावी यावे नि तेथून दुर्ग चढणीचा प्रारंभ करावा हे उत्तम. अथवा राज्यपरिवहन मंडळाच्या वाहनाने यावे नि निवांतपणे दुर्ग उतरीत परळी येथे यावे हे उत्तम!

दुर्गाच्या प्रथम प्रवेशद्वाराला आता छत्रपती शिवाजी महाद्वार म्हणून संबोधतात. दुर्गाच्या आग्नेय दिशेला असणारे हे प्रवेशद्वार ओलांडण्यापूर्वी समीपच कामधेनू मंदिराचे बांधकाम आढळते तिथे बहुधा मुख्य प्रवेशद्वार असावे. शिवद्वारावर पर्शियन शिलालेख आहे. तेथून आत आल्यावर दोन देवड्या आहेत. श्रीधरस्वामींनी एका दिशेला हनुमान तर दुसऱ्या दिशेला वराहाची स्थापना केली आहे.

यानंतर पुढे चालत राहिले की पूर्वाभिमुख असणारे दुसरे महाद्वार लागते याला समर्थ प्रवेशद्वार म्हणतात. ही दोन्ही दारे रात्रौ १० नंतर जी बंद होतात ती सूर्योदयालाच उघडतात. आजसुद्धा ही प्रथा अस्तित्त्वात आहे हे तिचे वैशिष्ठ्य.

हे द्वार ओलांडले की उजव्या हाताला एक काळा घोटीव दगड आपले लक्ष वेधून घेतो. त्यावर दोन भागात शिलालेख आहे. शिलालेखामधील विवरणावरून महंमद आदिलशहाच्या काळातील रेहान याने हे काम केले असा त्याचा बोध होतो.

आपण तसेच पुढे चालत राहिलो की दुर्गावर प्रवेश घेतलेला असल्याचे ध्यानी येते. आधुनिकतेने इथेही आपली मुद्रा दुर्ग माथ्यावर उमटवली असल्याचे जाणवते ते सलोह (काँक्रीट) कमानीमुळे ! तिचे प्रयोजन ध्यानी येत नाही !

इथेच डाव्या हाताला घोडाळे तळे आहे. त्याच्या काठावरच वीराचा पाळा आहे. येथून आग्नेय दिशेस जाणाऱ्या पाऊल वाटेने गेले की मशिदीसारखे बांधकाम आढळते. १३ जून १७०० दिवशी औरंगजेबाने इथं प्रार्थना केली असं इतिहास म्हणतो. बहुधा १३५८-१३७५च्या बहामनी राज्याच्या महंमदशहा नावाच्या राजाच्या काळात अथवा विजापूरकर आदिलशहाच्या मृत्यूनंतर इ. स. १६२५ नंतर केव्हातरी ती बांधवली असावी.

जवळच आंग्लाई देवीचे मंदिर आहे. श्री समर्थांना अंगापूरच्या डोहात दोन मूर्ती सापडल्या त्यापैकी ही एक आहे. मातोश्रींचा अंतकाळ समीप आल्याचे अंतर्ज्ञानाने जाणल्यानंतर समर्थांनी स्वतःला या मंदिरात कोंडून घेतले होते नि एका विशिष्ट दिवशी हे मंदिर उघडावे असे सांगून ठेवले होते. त्याप्रमाणे दार उघडल्यावर समर्थ बाहेर आले. पण त्यांनी क्षौर केल्याचे आढळले अशी दंतकथा सांगतात.

मंदिरासमीप तटबंदीच्या आत दीडमीटर नि चार मीटर अशी उत्तराभिमुख गुहा आहे तीही पहावी. समोरच दुर्गाचा ध्वजस्तंभ आहे तो ज्या कपीशीर्षकावर आहे त्याला 'आंग्लाई बुरूज' म्हणतात. येथून सूर्योदय अवश्यमेव पहावा !

पुनः मूळ वाटेकडे आले की समर्थ सेवा मंडळाचे कार्यालय लागते तिथं आपण आल्याची सूचना अवश्यमेव द्यावी.

पुढे श्रीधर कुटी, पेठेतील मारुती, पिण्याच्या पाण्यासाठी उपयोगात आणले जाते ते सोनाळे तळे, अशोकवन समर्थ मंदिर नि "समर्थ वृंदावन" पर्यंत यावे.

या दोघांची निर्मिती शिवकालानंतरची ! समर्थ सज्जनगडावर आले तेव्हा इथं एक मोठा खड्डा होता. तो बुजवण्याची कल्पना निघाली असता समर्थच म्हणाले होते. "नको पुढे कामास येईल." तो पुढे समर्थ निजधामास गेल्यानंतर कामाला

आला. त्यांच्यावर इथं अग्निसंस्कार केले. पुढे संभाजी राजांच्या आज्ञेवरून तिथं मंदिर उभारण्यात आलं. पण औरंगजेबाने ते उद्ध्वस्त केले. दुर्ग मराठ्यांच्या हाती आल्यावर परशुराम त्रिंबक प्रतिनिधींनी त्याच जागी समर्थ वृंदावन, त्यावर राममूर्तीची स्थापना असणारा गाभारा असे आजचे मंदिर बांधले.

औरंगजेबाच्या आक्रमणाच्यावेळी मूळ समर्थ वृंदावन बुजवून टाकून तिथे केवळ एक हनुमानमूर्तीची स्थापना करून त्याला वाचवले होते.

या समर्थवृंदावनाची (समाधी स्थानाची) रचना लक्षणीय आहे. तळघरात समर्थवृंदावन असून सज्जनगडावरचे आजचे ते पवित्रस्थळ आहे. मात्र सकाळी ८ ते १० पर्यंतच उघड्या स्मारकशिलेचे दर्शन घेता येते. इतर वेळी ती शिला वस्त्राने आच्छादित असते नि त्यावर फुले, पुष्पमाला वाहण्यात येतात. या पवित्रस्थळी सतत तेवणारी एक पिवळी समई तळघर तेजाळण्याचे कार्य करते.

श्री राममंदिराच्या प्रदक्षिणा मार्गावर अकरा मारुतींची स्थापना केलेली आढळेल. तेथून जवळच श्री वेणाबाईंचे वृंदावन आहे. चैत्र अमावस्या शके १६०० म्हणजे १० एप्रिल १६५८ ला त्यानी कीर्तन केले नि नमस्कारासाठी समर्थांच्या पायी डोके ठेवले त्या पुनः उठल्याच नाहीत. त्यांचे हे वृंदावन समर्थांच्या आज्ञेनुसार निर्मिलेले आहे.

त्यानंतर मंदिराच्या पश्चिमभागी विशाल पठार आहे ते भटकून यावे, विश्रांतीसाठी काही ओटे आहेत. दुर्गावर सायंकाळी मोकळी हवा खाण्यास जाणारे त्याचा उपयोग करतात.

सज्जनगडाच्या ईशान्य कड्याखाली 'रामघळ' म्हणून एक स्थान आहे. समय असल्यास ते पहावे. मात्र त्यासाठी कष्ट घ्यावे लागतात. समर्थ तिथे ध्यानासाठी बसत, असे सांगितले जाते.

संपूर्ण दुर्ग ३/४ तासात सहज पाहून घेता येतो. कारण त्याचा विस्तार विशाल नाही.

माघ वद्य नवमीस मोठा उत्सव असतो त्यावेळी अत्यंत गर्दी असते. ज्याला ती हवी त्याने त्याचा लाभ घ्यावा. निवांतपणे दुर्ग पाहावा तो इतर वेळी हेच खरे!

महाराजांच्या मानसिक अस्वस्थतेला निवांतपणा आणून देणारा म्हणून महाराजांच्या जीवनात आदराचे स्थान मिरवणारा हा दुर्ग खऱ्या अर्थाने सज्जनगड आहे हे सत्य आहे. समर्थांच्या पदस्पर्शाने, निर्वाणाने गाजत असणारा दुर्ग तुम्हाला साद घालत म्हणत असतो "या एकदा भेटीला नि म्हणा जय जय रघुवीर समर्थ !"

●●●

# सिंहगड

शिवाजी राजांच्या जीवनात काही दुर्गांनी चिरंतन ठाण मांडलं, रुखरुख लावली, तर काहींनी पाठशिवणीचा खेळ खेळून त्यांना दमविलं सुद्धा !

शिवाजी राजांच्या हृदयात कोंढाणा आणि शिवनेरी या दोन दुर्गांनी सातत्यानं सल ठेवली.

शिवनेरी शेवटपर्यंत स्वराज्यात समाविष्ट होऊ शकला नाही. कोंढाणा मात्र सतत हुलकावण्या देत देत एकदाचा शरण आला. पण अधिक काळ स्वराज्यात राहणे त्याला मानवत नसावे. कारण पुन: त्याला मोघलांच्या आहारी जाण्याची इच्छा व्हायची. असा सतत एका राज्याचे अधिपत्य न स्वीकारणारा हा दुर्ग आता आपली कवचकुंडले गळाल्यामुळे निष्प्रभ झालाय. नाही म्हणायला पुण्याला अगदी समीप असल्यानं नि आता दूरदर्शनाच्या प्रक्षेपणकेंद्र निर्मितीमुळे तो गजबतोय एवढेच काय ते !

असा हा कोंढाणा आज सिंहगड म्हणून प्रसिद्ध आहे. आता सिंहगड या नावाने परिचित असणारा, आज सहज पादाक्रांत करता येईलसा दुर्ग एकेकाळी दुर्जेय होता.

या दुर्गाच्या आग्नेय दिशेला असणाऱ्या कोंढणपूर नावाच्या गावात एकेकाळी बाजारपेठ असावी अन् त्यामुळे या दुर्गाच्या आग्नेय दिशेला चार मैलावरच्या (६ कि. मी. अंतरावरच्या) कोंढणपूर नावाच्या गावामुळेच याला कोंढाणा म्हणून ओळखले जायचे.

सामान्यत: महाराष्ट्रातील बहुतेक दुर्गांचा जन्म केव्हा झाला हे सांगणे कठीण आहे, कारण तसा लिखित इतिहास जवळ जवळ नाहीच. मात्र पन्हाळा, मार्कंडा, देवगिरी इत्यादी दुर्ग मुसलमानपूर्व कालात ही प्रसिद्ध होते याविषयी माहिती उपलब्ध आहे.

कोंढाणा दुर्गाचे निर्देश, तेथले अवशेष यांचा विचार करता याचाही जन्म मुसलमानपूर्व कालातच झाला असला पाहिजे असे अनुमान काढता येते.

मात्र प्रत्यक्ष निर्देश मुसलमान कालापासूनच झालेले/प्रारंभलेले दिसतात. आज उपलब्ध असणारा प्राचीन उल्लेख इ. स. १३५० मध्ये रचलेल्या 'शाहनामा -इ - हिंद' नावाच्या पारशी काव्यरूपी इतिहासात आढळतो. या काव्यात महंमद तुघलकाने 'कुंधियाना किल्ला' कसा घेतला या संदर्भातले उल्लेख आढळतात.

महंमद तुघलकाने ज्यावेळी या परिसरावर आक्रमण केले तेव्हा 'नागनायक' नावाचा कोळी या परिसरावर अधिपत्य गाजवीत होता. पराभव होतोय असे दिसताच नागनायकाने दुर्गपरिसर सोडून या दुर्गात आश्रय घेतला. परिणामत: दिल्लीच्या महंमद तुघलक नावाच्या सुल्तानाने 'कुंधियाना' दुर्गासही वेढा घातला. दुर्गावर जाण्यास असणारा एकमेव मार्ग आठ महिने अडवून ठेवल्याने नागनायक दुर्ग सोडून निघून गेला नि 'कुंधियाना' महंमद तुघलकाच्या स्वामित्वाखाली आला. महंमद तुघलक तेथून देवगिरीकडे वळला. साधारणत: इ.स. १३२८ च्या वेळची ही घटना आहे. यानंतरचे अन्य उल्लेख अहमदनगरच्या 'निजामशाही' काळातले चार निर्देशही आढळतात.

इ. स. १४८३-८४ वर्षी मलिक अहंमद बहरी निजामशाह याने आपल्या बापाच्या राज्यकारभार कालातच कोकणातले जुनेर, सिनेर आणि इतर दुर्ग जिंकले. तेथली प्रचंड संपत्ती घेऊन तो कुंधियाना दुर्गाकडे निघाला. त्याचे सैन्य पाहून दुर्गाधिपतीने हा दुर्ग मलिक अहंमद बहरी निजामशहाच्या स्वाधीन केला.

यानंतरचा उल्लेख आहे तो इ. स. १५५३ च्या काळातला बुऱ्हान निजामशहाच्या अधिपत्याखाली जे ५८ दुर्ग होते त्यात "कोंधाना" असल्याचे आढळते.

तिसरा उल्लेख इ. स. १५६९-७० चा आहे. मुर्तजा निजामशहा याने खूंजा हुमायून हिला पकडून शिवनेरीवर कैदेत टाकले आणि ताजखान, ऐनुल्मुक यासारख्या तिला प्रोत्साहन देणाऱ्याना सेवेतून मुक्त करून टाकले. परिणामत: अहमदनगर येथे गोंधळ उडाला, त्याचा लाभ उठवून आदिलशाहीमधील किशवरखान इत्यादी श्रेष्ठींनी आपल्यासमवेत सैन्य घेतले नि धारूर येथे येऊन तिथे दुर्ग बांधण्यास प्रारंभ केला. धारूरपासून समीप असणारा 'कोंधाना' हस्तगत केला आणि तेथून बादशाही मुलुखास तो त्रास देऊ लागला. असा उल्लेख बुर्हानमध्ये आहे. पण यात त्रुटी वाटते. कारण कोंढाणा धारूरपासून पुष्कळ दूर आहे.

चौथा उल्लेख इ. स. १६३६ च्या कालाचा आहे. त्यावर्षी मोंगल नि आदिलशाही हे एक होऊन निजामशाही नष्ट करण्यात मग्न झाले होते. त्या वर्षी शहाजीराजे हे निजामशाही वाचवता येते का हे पहात होते. निजामशाहीचा हा सरसेनापती पुरंदर, कोंढाणा इत्यादी दुर्ग आपल्या अधिपत्याखाली ठेवून होता. कोंढाण्याचा दुर्गाधिपती सिद्दी अंबर याला वश करून मोगल+आदिलशाही युतीने हा दुर्ग जिंकला. दुर्ग हस्तगत होताच युतीच्या पदरी दुर्गासमवेत ५०,६० सहस्र 'होन' संपत्ती आपोआप येऊन पडली. असे हे चार निर्देश शिवकालापूर्वीचे !

शहाजीराजांच्या राज्ये बदलण्याच्या घालमेलीत त्यांचे कुटुंबीय नेहमी संकटाच्या नि अस्वस्थतेच्या छायेत वावरत असत. अशावेळी शहाजीराजाना एक

चांगला मनुष्य मिळाला. दादोजी कोंडदेव मलठणकर हे त्याचं नाव ! शहाजी राजांचा मुतालिक अथवा प्रतिनिधी म्हणून किंवा कारभारी म्हणून दादोजींना तत्कालिन राज्यव्यवहारात ओळखले जात असले तरी शहाजी राजे मात्र त्यांना "सुभेदार नामजद किले कोंढाणा" असे संबोधित असत.

दादोजींना 'कोंढाणा दुर्गाचा मुद्दाम नेमलेला सुभेदार' म्हणून ओळखत असले तरी दुर्ग विजापूरकरांच्या हवालदाराच्याच अधिपत्याखाली असे. दादोजी जिवंत असेपर्यंत शिवाजीराजानी तो जिंकण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु दादोजींचा अंत होताच खेड-शिवापूर भागाचा देशपांडे बापूजी मुद्‌गल नऱ्हेकर यांच्या सहाय्याने कोंढाण्याच्या दुर्गाधिपतीस वश केले गेले आणि अचानकपणे दुर्ग शिवाजी महाराजांच्या अधिपत्याखाली आणण्यात आला.

परंतु शहाजीराजांना मुहम्मद आदिलशहाच्या कैदेतून सोडविण्यासाठी इ. स. १६४८ मध्ये हा विजापूरकराना परत द्यावा लागला. अशा रीतीने एकच वर्षात कोंढाण्याने आपला स्वामी बदलला.

जो कोंढाणा विजापूरकरांच्या अधिपत्याखाली पुष्कळ वर्षे होता तो शिवाजीराजांकडे जेमतेम एक वर्ष राहिला, फिरून विजापुरांकडे गेला तरी इ. स. १६५६ च्या वेळेस मुहंमद आदिलशाह अर्धांगवायुसारख्या दुर्धर दुखण्याने आजारी पडल्याने महाराजानी संधी साधून कोंढाणा पुनः जिंकून स्वराज्यात आणला अन् त्याला सिंहगड हे नाव ठेवून दिले. विशेष म्हणजे तानाजीचा मृत्यू होण्याआधीच महाराजांनी सिंहगड हे नाव कागदोपत्री रूढ केलेले आढळते. कारण इ. स. १६६३ च्या ३ एप्रिलच्या एका आज्ञापत्रात मोरोपंत पिंगळे याना महाराजांनी सिंहगडावरील विश्वासघातक्याना काढून टाकून त्यांच्या जागी बरोबर नेले त्यांची नेमणूक करावी असे आज्ञापिले असल्याचे स्पष्ट आहे.

केवळ दोन दिवसांनीच म्हणजे ५ एप्रिल १६६३ दिवशी पुणे येथे शाहिस्तेखानाच्या निवासावर आक्रमण करून, त्याला पिटाळून लावून महाराज सिंहगडाकडे परतले हाही याचा इतिहास आहेच.

शाहिस्तेखानाचा अपमान झाल्याने औरंगजेबास जो राग आला त्याचे पर्यवसान त्याच वर्षी मोघल सरदार जसवंतसिंह राठोड याला सिंहगड घेण्यास पाठवण्यात झाले. त्यानेही नोव्हें-डिसेंबरात सिंहगडला वेढा घातला. पण त्याला परत फिरावे लागले नि जयसिंहाने वेढ्याचे काम पुढे चालविले. आपणास यश येणे अवघड आहे असे दिसताच जयसिंहाने मावळ परिसरात धुमाकूळ घालण्यास प्रारंभ केला. परिणामतः महाराज चिंताक्रांत झाले. आणि त्यांनी १४ जून १६६५ ला सिंहगड जयसिंहाचा मुलगा कीरतसिंह याकडे सोपविला. अशा रीतीने सिंहगडाने पुनः स्वामी बदलला.

पण महाराज आगऱ्याहून परत आल्यानंतर मात्र स्वस्थ बसले नाहीत त्यानी तह मोडून एकामागून एक दुर्ग घेण्यास प्रारंभ केला नि ४ फेब्रु. १६७० या दिवशी सिंहगडावर झडप घातली. त्यात तानाजी मारला गेला. पण दुर्ग मिळाला.

विशेष म्हणजे तानाजी संदर्भात सिंहगडाशी जो संबंध जोडला गेलाय तेवढीच तानाजीविषयी ऐतिहासिक माहिती आहे असं ग. ह. खरे म्हणतात. तानाजीविषयी ऐकीव माहिती पुष्कळ असल्याचे सांगून खरे म्हणतात की तानाजी पंचहजारी सरदार होता. अफझुलखानाच्या वधाच्यावेळी तानाजीने खानाच्या सैन्यावर आक्रमण केले नि पुष्कळ हानी केली. तसेच तानाजी पायदळाचा एक मोठा अधिकारी होता, महाराजानी त्याचा वेळोवेळी त्याच्या शौर्यासाठी सन्मान केला होता. तानाजी संदर्भातली माहिती बखरीवरून, पोवाड्यावरून घेतलेली असते. काही का असेना तानाजी नि सिंहगड यांचे नाते अतूट आहे हे निर्विवाद होय.

तानाजीच्या बलिदानामुळे प्रसिद्ध झालेला सिंहगड १६८९ पर्यंत मराठी साम्राज्यात राहिला. पण संभाजी राजांच्या मृत्यूमुळे तो मोंगलाकडे गेला पण फार काळ मोंगलांच्या अधिपत्याखाली राहणे त्याला मानवले नसावे, कारण १ जुलै १६९३ला मराठ्यांचा पंचहजारी सरदार नावजी बलकवडे याने तो पुनः स्वराज्यात आणला. याचा लाभ एवढा झाला की राजाराम महाराजाना अल्पसा निवांत मिळाला पण ३ मार्च १७०० दिवशी छत्रपती राजाराम महाराजांचे निधन याच गडावर झाले नि त्यांची समाधी तिथे बांधावी लागली.

एवढ्यावरच हे थांबायचे नव्हते २७ डिसें. १७०२ ला औरंगजेबने पुनः वेढा घालून १४ एप्रिल १७०३ ला तो आपल्या स्वामित्वाखाली आणला. औरंगजेबाने त्याचे नाव बदलले नि नवेनाव दिले "बक्षिंदाबक्ष" स्वतः औरंगजेब दि. १८ एप्रिल १७०३ दिवशी सिंहगड पाहण्यास आला होता असे अनुमानता येते.

औरंगजेबाची पाठ फिरताच २८ एप्रिल १७०५ पूर्वी थोडे दिवस आधी मराठ्यानी हा पुनः जिंकला पण आश्चर्य म्हणजे औरंगजेबने इ.स. १७०६ च्या मार्च-एप्रिलमध्ये त्यावर पुनः आपले स्वामित्व स्थापित केले.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर १७०८ ला तो पुनः स्वराज्यात आला. पण असे असले तरी स्वराज्यात असतानाही सातारकर नि कोल्हापूरकर यांच्यातील वितुष्टामुळे सचिव आणि पेशवे यांच्यामध्ये वितुष्ट येत गेले नि सिंहगडाला वेढा पडणे, तिथं संघर्ष पेटणे असे घडत गेले. मात्र सिंहगड जून १७५० पासून पेशव्याकडे राहिला तो १८१८ पर्यंत !

जेव्हा जेव्हा पुण्यावर संकट आले तेव्हा तेव्हा पेशव्यांचे स्नेही, कुटुंबीय, त्यांचे महाजन सिंहगडाचा आश्रय घेत. इ. स. १७५० पासूनच्या बहुतेक

इतिहासाचा भाग अशा कृत्यानीच भरलेला आढळतो. त्यात ११ आक्टो १७७१ च्या दसऱ्याच्या दिवशी दारूखान्यावर वीज पडली नि गडावर सर्वाधिक हानी घडून आली, ते वेगळेच !

२ मार्च १८१८ ला ब्रिगेडियर जनरल फ्रिट्झलरने तोफांचा मारा करून दुर्ग जिंकून घेतला एकूण पाच स्थळी शतघ्नींचे (तोफांचे) तळ (मोर्चे) उभारले. धारजाईचे टोक, दक्षिणेकडील खोऱ्यात दोन, कल्याणद्वाराच्या दक्षिणेस एक टेकडी आहे तिथे एक नि त्याच द्वारातून बाहेर पडल्यानंतर विंझरकडे जी पायवाट जाते तिच्यावर एक असे पाच मारे ठरविले. जवळ जवळ ३७०० गोळे उडवून दिल्याने ७०० गोसावी नि ४०० अरब यांचा धीर सुटला आणि त्यांनी पांढरे निशाण दाखवून शरणागती स्वीकारली नि सिंहगड पारतंत्र्यात अडकला. इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचा धसका घेऊन इंग्रजांनी याचे महत्त्व कमी करण्यासाठी या दुर्गाची तटबंदी निरनिराळ्या स्थळी पाडून टाकली, नि त्याचे महत्त्व संपुष्टात आणले ते अंततः!

एकदा इ. स. १८८९ ला लोकमान्य टिळक सिंहगडावर आले नि तेथील वातावरण, हवापाणी, ऐतिहासिक पार्श्वभूमी, पुण्याचे सानिध्य याचा विचार करून त्यानी उन्हाळ्यात विश्रांतीसाठी येण्याचे ठरवून सदनिका बांधून टाकली. इतरानी त्यांचे अनुकरण केले.

आता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत शासनाने आपले स्वामित्व स्थापिले नि तो पुराणवस्तू विभागाकडे ऐतिहासिक वस्तू म्हणून रक्षणासाठी सोपविला आहे.

अलीकडे तर तिथे दूरदर्शन केंद्राचा प्रक्षेपक बसवला असल्याने पायथ्यापर्यंत सुंदर वाहनमार्ग निर्मिला गेलाय. परिणामतः कोणीही तिथे विशेष श्रम न घेता जाऊ शकतो.

पण दुर्ग पहायला जायचे असेल तर डोणजे गावापर्यंत वाहनाने जावे नि चढण प्रारंभावी, चढण किती दुर्गम आहे याचा अनुभव डोणजे गावाकडच्या चढणीने येतो किंवा कल्याणद्वाराने येऊन अल्पशा चढणीचाही आनंद लुटता येतो.

कल्याण दरवाजाकडून आल्यास आपणास दोन दरवाजे ओलांडावे लागतात तर पुणे-डोणजे दरवाजाकडे मात्र तीन दरवाजे ओलांडावे लागतात. पुण्याकडून येणे त्यातल्या त्यात सुखकर ! गड जिंकल्याचा आनंद मिळवायचा असल्यास पुणे-डोणजे मार्ग स्वीकारावा, हे उत्तम !

गडावर विशेष प्रेक्षणीय स्थळे नाहीत म्हटले तरी चालतील पण असे असले तरी इतिहासात आपलं नाव कोरून ठेवणारा दुर्ग म्हणून एकदा अवश्य भेट द्यावा

असा हा दुर्ग समुद्रसपाटीपासून ४३२५ फूट तर उत्तरेकडील पायथ्यापासून २३०० फूट उंच आहे. माथ्याची पूर्व पश्चिम लांबी तीन हजार फूट तर दक्षिणोत्तर रुंदी साधारणतः दोन हजार फूट असून आकार एखाद्या लहान दांड्याच्या कुऱ्हाडीसारखा आहे.

दुर्गास जाण्यास दोन मार्ग एक धायरी, खडकवासले डोणजे आतकरवाडी असा, तर दुसरा पुणे सातारा मार्गाने शिवापूर-कोंढणपूर कल्याणपेठेपर्यंतचा. दोन्ही मार्गांनी राज्य परिवहनाच्या वाहनांची सोय आहे.

दुर्गाला सर्व ठिकाणी तटबंदी नाही. कारण पुष्कळ स्थळी नैसर्गिक कडे आहेत. जिथे नैसर्गिक कडा नाही तिथं हुडे (बुरूज) बांधून भिंती बांधून तो संरक्षिला आहे. तटाच्या आतून हिंडण्यासाठी पक्की फरसबंदी वाट आहे.

आपण पुणे द्वाराने यावे. एकावर एक अशी तीन द्वारे ओलांडली की मुख्य दुर्गात येतो. तिसरे द्वार यादवकालीन आहे. कारण गणेशपट्टीवर कमळ आहे. अगदी पहिल्या द्वाराजवळ येताच डावीकडे गेल्यास आपण खांदकड्याच्या खाली असलेल्या सपाटीवर येतो. इथेच आता वाहनं येऊन थांबलेली असतात. याच ठिकाणी दोन भुयारे आहेत. सरपटत १०-१५ फूट आत गेल्यास पाणी भेटते. यालाच 'सुरुंगाचे पाणी' म्हणतात.

दुर्गावर विशेष सपाटी नाहीच. पण दुर्गाच्या मध्यभागी असणारा उंचवटा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाई. त्याच्या मध्यभागी पूर्वाभिमुख एक देऊळ आहे. ते कोंढाणेश्वरचे मंदीर, तिथे समीप दुघईखोल्यांची मालिका आहे. गिलाव्यावरून ती विशेष व्यक्तीसाठी असावी असे वाटते. उंचवट्याच्या दक्षिणभागी अमृतेश्वर भैरवाचे दक्षिणामुखी मंदिर आहे. भैरव आणि शक्ती भैरवी अशा दोन उभ्या मूर्ती युद्ध प्रसंगी चेतना जागविण्यासाठी उपयोगी पडत होत्या. त्यांच्या समीप दोन पायावर रक्त पिण्यासाठी उभा असणारा कुत्रा पाहून या अनुमानापर्यंत येता येते. अमृतेश्वराच्या मूर्तीचा विध्वंस झाल्याचे निर्देश कागदपत्रात आढळतात.

या मंदिराच्या थोडेसे वर उत्तरेला तानाजीची समाधी आहे. इ. स. १९३५ मध्ये सिंहगड तानाजी स्मारक मंडळ स्थापन झालं. ते प्रतिवर्षी माघ वद्य नवमीस तान्हाजीची पुण्यतिथी साजरी करते.


या समाधी स्थळाजवळचे देवटाके हे सिंहगडाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. त्या टाकीचे पाणी पिणे हा सिंहगडास भेट देणाऱ्यांचा धर्म होऊन बसतो.

कल्याण दरवाजाकडून नैऋत्येकडील बुरूजाकडे जाताना वाटेत उदयभानाचे थडगे लागते. अर्थात उदयभान हिंदू असताना त्याचे थडगे कसे असा प्रश्न पडतो.

पुणे द्वाराने आले की उजवीकडे किंचित खोलगट स्थळी एक दगडी वास्तू आपले लक्ष वेधून घेते. तिचे छप्पर दुपाखी आहे. ही वास्तू स्फोटकगृह (दारूखाना) म्हणून उपयोगात आणली जात असावी असे मानतात. ज्याला जवाहिरखाना म्हणून दाखवले जाते तिथे सरकार वाडा असावा असे अनुमान काढता येते. तिथेच राजवाडा असला पाहिजे हे उघड आहे.

पुणे द्वाराने आत प्रवेश केला की दगडामध्ये गुंफेच्या आकाराची एक वास्तू आढळते. ती अश्वशाळा होती असे म्हणतात. साधारणतः २० ते ३० तट्टू या आवारात राहू शकतील अशी ही नैसर्गिक गुहा अवश्य पहावी. पावसाळ्यात पाणी पाझरत असल्याने ही वास्तू अश्वशाळा (पागा) कशी असेल असा संशय अवश्यमेव येतो.

दुर्गावरील त्यातल्या त्यात सुस्थितीतली वास्तू म्हणजे छत्रपती राजाराम महाराजांची समाधी होय. कोंढाणेश्वराच्या उत्तरेस बऱ्याच अंतरावर एका खोबणीत अगदी कड्यासमीप पूर्वाभिमुख चौरस आकाराची ही वास्तू एका उंच जोत्यावर उभारलेली आहे. शहाजहान पद्धतीची घुमटी आपले लक्ष वेधून घेते.



*श्री छत्रपती राजाराम महाराज समाधी, सिंहगड*

आत एक देवी, दोन बाण, राजारामाच्या म्हटल्या जाणाऱ्या पादुका इतर एकदोन देवदेवी अशा पूजनीय वस्तू आहेत. या बाणाची पूजा एका ब्राह्मण पुजाऱ्याकडून करवली जाई तसेच ढमढेरे नावाचा मराठा पुजारी होता. पुढे त्यांच्या जागी पवार या नावाचा पुजारी नेमला गेला. ब्राह्मण पुजारी पलुसकर नावाचा होता. पूजा-अर्चा इत्यादीसाठी 'एक पंधरा कलमी याद' भा.इ.स. मंडळात उपलब्ध असून या दोन पुजाऱ्यांनी कोणत्या क्रमाने पूजा करावी, पूजेसाठी पाणी ज्या टाक्याचे घ्यावे त्याची स्वच्छता कशी राखावी इत्यादी लहानसहान गोष्टी त्यात निर्देशिल्या आहेत.

राजाराम महाराजांच्या समाधीस्थानापासून दक्षिणेला एका उंचवट्यावर आले की तिथे एक दगडी स्मारक दाखवतात. नरवीर तानाजीचा हात जिथं तुटला ती हीच भूमी असं सांगण्यात येतं. तसंच पश्चिमेला गेलं की तुटलेला कडा लागतो त्या कड्याच्या वर एक पुरलेला दगड दाखवला जातो. घोरपडीच्या सहाय्याने तानाजी वर चढून आल्यानंतर त्यानं इथं खुंटा रोवला, त्याला दोर बांधला नि इतर मावळे वर चढून आले असं सांगितलं जातं, इतिहासात याची नोंद आहे की नाही हा भाग वेगळा, मात्र घोरपडीसारखा तटाला चिकटत, चिवटपणे शत्रूला आपला माग लागू नये अशा पद्धतीने तानाजी नि इतर मावळे वर चढून आले असा विश्वास करता येतो. तेथून दक्षिणेकडे जाऊन पुन: पश्चिम भागाची तटबंदी निरखीत आपण झुंजार बुरूज टेहळणी बुरूज करीत कल्याण द्वारापाशी आलेले असतो.

युद्धशास्त्रानुसार कल्याणद्वार बांधलेले आढळते. आता त्यांचे तेज लोपलेय पण एकेकाळी या दोन्ही द्वारानी कितीकजणांना मोहविले, किती जणांना झुंजविले, किती जणांना रुखरुख लावली याची आठवण काढीत मागे फिरावे.

इतिहासाच्या पानोपानी नोंदलेल्या घटनांचा आढावा घेत दुर्ग उतरावा, पुनः एकदा येतो म्हणून,

म्हणावे शिवरायाचा सिंह सिंहगडीं पडला समरांगणी

मराठा गडी यशाचा धनी जी, जी ऽजीर जी जी जी,ऽऽ.

कारण, हेच खरे असते नि आपण त्यांचे यशोगान करीत इतिहास जागवायचा असतो.

● ● ●

# रायगड

ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व ज्याला कळले, तो त्या वास्तूमधून प्रेरणा घेतो. त्या वास्तूने घडवलेल्या इतिहासाचा आस्वाद घेत स्वतः आनंदी होतो, दुःखाने कढतो, स्वतःच्या अगतिकतेमुळे विषण्ण होऊन स्वतःवर चरफडतो.

ऐतिहासिक वास्तू "कालाय तस्मै नमः" म्हणत उसासे टाकीत काळ कंठित असतात, गतवैभवाच्या खुणा जपत तुमच्या आमच्याशी सुखसंवाद साधण्याचा यत्न करीत असतात.

महाराष्ट्रातल्या बहुतेक दुर्गांची आजची अवस्था कींव करावी अशी आहे. शिवनेरी, प्रतापगड, पन्हाळा, राजगड, सिंहगड, सज्जनगड, रायगड हे त्यातल्या त्यात सुदैवी दुर्ग !

सिंधुदुर्ग, विजयदुर्ग हे बऱ्यापैकी दैववान जलदुर्ग !

महाराष्ट्रात असणाऱ्या अन्य कोटांची, दुर्गांची, ऐतिहासिक नगरांची महत्ती केव्हाच लोपलेय.

'नवी विटी, नवे राज्य' नियमानुसार नवी सत्ता केंद्रे निर्माण झाली की, नवी स्थाने महत्ता संपादितात, त्या स्थानांचं वैभव वाढीस लागतं, जीर्ण राजधान्या लोप पावतात, नव्या राजधान्या नव्या ईर्षेने फुलतात, भरभराटतात.

असे असले तरी काही "स्थान विशेष" असे असते की ती ती स्थाने ताठ मानेने उभीच असतात, कालावर मात करून !

उज्जैन, वाराणशी, गया, ही तीर्थक्षेत्रे देहली, आगरा, कलकत्ता ह्या राजधान्या, किंवा झांसी, चित्तौड, रायगड येथले दुर्ग ही याची काही उदाहरणे !

रायगड !

राजांचा गड, गडांचा राजा !!

महाराष्ट्राची महान अस्मिता ! मोगलाना मिळालेले आव्हान !! इंग्रजांचा केलेला थरकाप !!!

इंग्रजांच्या दृष्टीने पूर्वेकडील दुर्गम दुर्गेय जिब्राल्टर ! मोगलांच्या दृष्टीने त्यांच्या साम्राज्यवाढीला मिळालेले आव्हान, आगऱ्याच्या रक्तदुर्गातून निसटून जाऊन मोगल सत्तेवर केलेला आघात ! मराठी स्वराज्याच्या राज्याभिषेक स्थळामुळे निर्माण झालेली महाराष्ट्राची अस्मिता.

प्रतापगड येथे अफझुलखानासारख्या बलाढ्य वीराला धूळ चारून, त्याचे सामर्थ्य मातीमोल करणारा शिवाजी, आगरा येथे प्रत्यक्ष शत्रूच्या शिबिरात जातो, औरंगजेबाच्या नावाला काळिमा फासतो, संपूर्ण मोगल साम्राज्याला, तसेच त्या साम्राज्याच्या नाव लौकिकाला धक्का बसेल असे कृत्य करतो आणि महाराष्ट्रात सुखरूप परत येतो, रायरी सारख्या एका दुर्लक्षित गिरीशिखराची निवड करून तेथे आपल्या सत्तेची, राज्यव्यवस्थेची सुयोग्य आखणी करतो, तिथे एक राजधानी वसवतो याचा अर्थ आपल्या व्यापारावर, आपल्या राज्य लालसेवर आलेले ते एक महान संकटच आहे असं इंग्रजाना वाटू लागलं. इंग्रज आधिकाऱ्याना असं वाटायला लावणारा इंग्रजांचा थरकाप उडवणारा दुर्ग म्हणजे रायगड.

साधारणत: ५०० वर्षांपूर्वी सह्याद्रीच्या ज्या एका शिखरावर पाळेगारानी प्रथम एक दुर्ग बांधून काढला आणि आपल्या अधिपत्याखाली तो ठेवला त्या डोंगराला कुणी "राशीवटा" म्हणे तर कुणी "तणस" म्हणे.

हे पाळेगार विजयनगरच्या साम्राज्याचे मांडलिक होते. विजयनगरचे साम्राज्य नष्ट झाल्यावर हा प्रदेश निजामशाहीच्या अधिपत्याखाली आल्याने, निजामशाहीत या डोंगरी दुर्गाचा उपयोग त्या राज्यातील अभियुक्त (कैदी) ठेवण्यासाठी केला जाऊ लागला.

पुढे दिल्लीश्वर मोंगलानी अहमदनगरचे राज्य जिंकले. या युद्धप्रसंगी विजापूरकर आणि दिल्लीश्वर यांच्यात झालेल्या बोलण्यानुसार हा दुर्ग विजापूरकरांच्या अधिपत्याखाली आला.

विजापूरकरांच्या मांडलिक सरदारांपैकी जावळीचे मोरे यांच्या व्यवस्थेखाली हा काही काळ होता. इ. स. १६५६ व्या वर्षी श्री शिवछत्रपतीनी जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांचा पराभव करून हा दुर्ग आपल्या अधिपत्याखाली आणला. तोपर्यंत हा राशिवट्याचा डोंगर "रायरीगड" या नावाने ख्यात झाला होता.

श्री छत्रपती शिवाजी राजानी याचा विस्तार, अजेयपणा आणि परिसर पाहून मनी एक निश्चय करून ठेवला होता. अन् ते संधीची वाट पहात राहिले. दि. ६ मे १६३४ ला शहाजहान आणि विजापूरकर यांच्यात निजामशाही बुडवण्या संबंधीची बोलणी पूर्ण झाली. त्यानंतर निजामशाही संपुष्टात आणण्याचा प्रयत्न झाला, तो यशस्वी झाला. अहमदनगरची निजामशाही सरली आणि विजापूरकर या दुर्गाचे 'धनी' झाले. इ. स. १६३६ पासून इ.स. १६४४ पर्यंत हा दुर्ग ज्या कुणाच्या व्यवस्थेखाली होता त्या हवालदारांची नावे उपलब्ध आहेत. याच काळात चंद्रराव मोरे यांनी विजापूरकरांचे स्वामित्व अमान्य करण्यास प्रारंभ केला. विजापूरकरांकडे हे वृत्त जाऊ लागले अन् हे वृत्त विजापूरकराना वरचेवर ऐकावे लागल्याने तसेच

इ.स. १६४८ ला चंद्रराव मोरे यांनी उघड उघड बंड केल्याने आदिलशाहीने आपला श्रेष्ठ हितचिंतक अफझुलखान यास चंद्रराव मोरे याचा पराभव करून त्याचे बंड मोडण्यासाठी पाठवून दिले.

पण तोपर्यंत चंद्रराव मोरे याने एक सुंदर योजना आखून ती कार्यवाहित आणण्याचे ठरवून केव्हाच पावले उचलली होती.

रायरीचा "हवालदार" शिर्के विजापूरकरांचे मांडलिकत्व स्वीकारून हा दुर्ग आणि त्या भोवतालचा परिसर आपल्या व्यवस्थेखाली राखू इच्छितोय हे पाहून, त्याचा अधिकार संपुष्टात आणावा, त्याचबरोबर आपले सामर्थ्य वाढीला लागावे म्हणून जावळीच्या चंद्रराव मोरे याने श्रीशिवछत्रपतीना निमंत्रण दिले होते अन् रायरी आपल्या आधिपत्याखाली आणण्यात यश मिळवले होते.

अशा रीतीने 'रायरी' चंद्रराव मोरे यांच्या अधिपत्याखाली आला अन् त्याचवेळी अफझुलखानाने जावळी विभागावर (आक्रमण कसले? कारण तो विभाग विजापूरकरांचाच होता पण "बंड" झाल्याने तो प्रकार निपटून काढावा म्हणून केलेल्या प्रयत्नाचे स्वरूप म्हणजेच) आक्रमण करण्याचे ठरविले. पण यात अफझुलखानास यश मिळाले नाही.

जावळी, रायरी आणि तेथला परिसर शिर्के यांचे हातून निसटून चंद्रराव मोरे यांचे हाती आला होता. चंद्रराव मोरे यांची एक इच्छा पूर्ण झाली होती. विजापूरकरांचे आपल्यापुढे काही चालले नाही या विचाराने चंद्रराव मोरे उद्दामपणे वागू लागला होता. एकदा "श्री शिवाजी राजे म्हणजे तरी या मोरे समोर कोण" अशी भाषा त्याने उच्चारली. परिणामतः आपण कोण हे दाखविण्यासाठी महाराजांनी मोऱ्याविरुद्ध योजना आखली, नि सत्वर ती कार्यवाहीतही आणली. इ. स. १६५६ च्या वर्षाची ही गोष्ट ! अशा रीतीने रायरीचा परिसर शिवाजी राजांच्या अधिपत्याखाली आला त्यामुळे तळकोकणात हिंदवी स्वराज्याच्या विस्ताराचा मार्ग सुकर झाला तसेच देश आणि कोकण याना जोडणाऱ्या महत्त्वाच्या घाटावर नियंत्रण ठेवणेही सोपे झाले

या घाटामध्ये ढवळा घाट, कोंडेनळीचा घाट, सापळखिंडीचा घाट, हतलोटचा घाट आणि पार घाट हे त्यातल्या त्यात महत्त्वाचे होते. या घाटावर लक्ष ठेवू शकतील असे दुर्ग त्या त्या घाटाच्या परिसरात होते. असे असले तरी केवळ पार घाटावर नियंत्रण ठेवण्यासाठी समीपवर्ती भागात दुर्ग नव्हता. ती त्रुटी शिवाजीराजांनी "प्रतापगड" दुर्ग बांधून नाहीशी केली. कोकण, मावळ आणि देश या भागावर नियंत्रण ठेवण्यास ज्या ज्या गोष्टी आवश्यक होत्या त्या त्या करण्याकडे महाराजानी लक्ष पुरवले होतेच. यातला एक भाग म्हणजे त्या त्या

परिसरात असणारे दुर्ग आपल्या अधिपत्याखाली आणणे हा होता. म्हणून तर रायरीचे नियंत्रण आपल्या हाती येण्यासाठी शिवाजीराजांनी योग्यवेळी कार्यवाही केली होती.

याच काळात विजापूरकर बादशहा आदिलशहा आजारी पडला, या संधीचा लाभ उठवून कल्याण-भिवंडीपासून रायरी दुर्गापर्यंतचा सारा प्रदेश शिवाजी राजांनी जिंकून घेतला.

रायरी परिसराची व्यवस्था करीत असता, त्याचा विकास व्हावा म्हणून योजलेल्या कार्यात शिवाजीराजांनी आणखी एका गोष्टीत भर घालण्याचा निश्चय केला ! मुळात असणारा दुर्ग अधिक दुर्जेय करायला हवा असेल तर त्याच्या संरक्षणाची व्यवस्था नव्या दृष्टीने केली पाहिजे नि तशी निर्मिली पाहिजे हे त्यांनी ओळखले होते. त्यासाठी त्यांनी नवे बांधकाम करण्याची योजना आखली आणि तसे आदेशही दिले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत त्यानी 'रायरी' हे नाव बदलून 'रायगड' असं नावही रूढ केलं. स्वराज्याची राजधानी असणारा "राजगड" पंचवीस वर्षे सातत्यानं लोकांच्या, जनमानसाच्या हृदयात स्थान मिळवून होता त्यापेक्षा निराळे स्वरूप असणारा, स्वराज्याची राजधानी म्हणून हा नव्या नावाने ओळखला जावा, स्वराज्याची सारी सूत्रे तेथूनच हलवली जावीत, त्यासाठी आवश्यक ते सारे संरक्षण, दुर्जेयत्व, विस्तारीकरण नि परकीय शत्रूंचे निर्दालन करण्यास लागणारे सौकर्य मिळावे इत्यादी गोष्टींचा विचार करून, तसेच तो स्वराज्याची राजधानी म्हणून नव्याने नांदणार असल्याने 'राजगड' नावाला सादृश्यासमान असणारा 'रायगड' हा शब्द योजून शिवाजीराजानी रायरीचे नामांतर 'रायगड' केले.

इ. स. १६६१ मध्ये राजापूरच्या इंग्रजांच्या साहित्य भांडारावरील (वखारीवरील) आक्रमण करण्याची योजना रायरीवरूनच कार्यान्वित करण्यात आली होती. इंग्रजांचे प्रतिनिधी रेव्हिंग्टन आणि इतराना महाराजांनी रायरीसमीप असणाऱ्या 'सोनगड' दुर्गात अटकेत ठेवले होते.

पण त्याच शिवाजीराजाना जेव्हा मिर्झाराजे जयसिंह याने कोंडीत धरून १३ जून १६६५ मध्ये पुरंदर येथे तह करायला लावून स्वराज्यातील २३ दुर्ग मोंगलाना देणे भाग पाडले होते, तेव्हा श्री शिवाजी राजांनी, रायरी, तोरणा, राजगड, लिंगाणा यांचे महत्त्व ओळखून ते त्यांनी आपल्याकडेच ठेवून घेतले होते. हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कारण राजांना त्यांचे महत्त्व पुरेपूर ज्ञात होते. कारण जो दुर्ग आपण आपल्या अधिपत्याखाली ठेवण्याचा निश्चय करतो तेव्हा त्याच्या समीप असणारा दुर्ग शत्रूच्या आधिपत्याखाली राखणे/ठेवणे म्हणजे स्वतःला

सतत संकटाच्या छायेत वावरायला लावणेच होय हे राजांना पूर्णपणे कळत होते. त्या दृष्टीने मिर्झा राजे जयसिंह यांना दिलेले दुर्ग आणि आपणाकडे ठेवून घेतलेले दुर्ग याकडे लक्ष दिल्यास शिवाजी राजांना 'रायरी'चे महत्त्व किती वाटत होते हे लक्षात येते. राजगडाजवळचा तोरणा तसेच रायगडाजवळचा लिंगाणा त्यानी आपल्याकडे ठेवून घेतलेला होता. असे करण्यात त्यांची दूरदृष्टी तर दिसतेच तसेच जो दुर्ग आपल्या अधिपत्याखाली असणार आहे त्याच्या परिसराला शत्रूपासून अत्यल्प हानी पोहोचून तो अधिकात अधिक सुरक्षित राहिला पाहिजे अशी धारणासुद्धा त्यामागे असे, हेही लक्षात येते !

आगऱ्याहून परतल्यानंतर मिर्झाराजे जयसिंह यांच्याशी झालेल्या बोलण्यानुसार जे २३ दुर्ग पुरंदरच्या तहानुसार गमवावे लागले होते ते परत घेण्याचा सपाटा महाराजांनी आरंभिला.

गेलेले सगळे दुर्ग परत जिंकण्याची कार्यवाही करण्यात रायरीचा पुष्कळ उपयोग झाला, हेही महत्त्वाचे आहे. जवळ जवळ, इ.स. १६६७ पासून हळूहळू राजगडाचे महत्त्व कमी करण्याचा प्रारंभ झाला नि त्याच क्रमाने रायगडाचे महत्त्व वाढवीत नेलेले आढळते.

पोर्तुगीज आणि शिवाजीराजे यांच्यामध्ये १६ डिसेंबर १६६७ ला एक तह झाला. तोही राजगडावर न घडविता जाणून बुजून तो रायगडावर घडवून आणला गेला होता. परकीय सत्तेला 'रायगड' म्हणजे हिंदवी स्वराज्याची नवी राजधानी आहे हे ज्ञात व्हावे हा यामागील आंतरिक हेतू होताच.

इ. स. १६६८, नि १६६९ ला राजानी महाड येथे आपली निवास व्यवस्था केली होती असे आढळते. एवढेच नव्हे तर त्यांनी महाड येथे स्वतःसाठी एक निवासस्थानसुद्धा बांधले होते अशी माहिती मिळते. 'रायगड'चे महत्त्व वाढावे, कोकणच्या किनारपट्टीवर पाश्चात्य परकीयांचे असलेले वर्चस्व मोडून काढावे आपला राज्य विस्तार करताना शत्रूला आपल्यावर आक्रमण करताना पंचवीस वेळा विचार करावा लागावा हाही यामागे हेतू होताच. हेही लक्षात घ्यायला हवे. शिवाजी महाराजांनी इ. स. १६७०च्या मध्यास जुन्नर हे मोंगलांचे ठाणे लुटले, याचवर्षी आक्टोबरमध्ये पुनः दुसऱ्यांदा 'सुरत' लुटले. या साऱ्या योजना 'रायगड' वरूनच कार्यवाहीत आणल्या गेल्या होत्या. याचवेळी त्यानी निश्चित स्वरूपाच्या सूचनांद्वारे कल्याणचा सुभेदार आबाजी सोनदेव यांना रायगडावर राजधानीसाठी आवश्यक त्या वास्तू, सुखसोयी नि संरक्षण व्यवस्था निर्मिण्याची आज्ञा दिलेली आढळते !

याच वर्षी 'रायगड' साठी ५० सहस्र 'होन' खर्च करण्यास अनुमती दिल्याचे आढळते, यापैकी १५ सहस्र होन केवळ तटबंदी, संरक्षण व्यवस्थेसाठी तर ३५

सहस्त्र होन वास्तू तळी, आणि इतर कार्यासाठी होते. यावरून असे अनुमान निघते की इ. स. १६६९ ते १६७४ पर्यंतचा आपला बहुतांश काळ राजांनी रायगड परिसरात व्यतीत केला होता.

राजकीय वाटाघाटी, सैनिकी नि शासकीय कृती करण्यासाठी इ. स. १६६७ पासून प्रारंभ झाला पण यातल्या राजकीय वाटाघाटी प्रामुख्याने इंग्रजांसमवेत झालेल्या आढळतात. त्यानंतर क्रम आहे तो पोर्तुगीजांचा ! परकीय व्यापाऱ्यांसमवेत झालेल्या बोलण्यात फ्रेंच, डच यांच्याशी संपर्क आल्याचे जाणवत नाही.

इंग्रज प्रतिनिधी व्यापारी स्वरूपाच्या सवलती मिळाव्यात म्हणून रायगडावर येत. त्यातल्या टॉमस निकल्सने ३१ मे १६७३ ला रायगडावर पाय ठेवला. त्याने आपली दैनंदिनी लिहिली असून तो म्हणतो "जेथे टेकडीस नैसर्गिक अभेदता नाही तेथे २४ फूट उंचीचा तट बांधला आहे. ४० फुटावर दुसरी भिंत (तटबंदी) बांधून दुर्ग इतका अभेद्य बनवला आहे की, अन्नाचा भरपूर साठा असल्यास हा दुर्ग, संपूर्ण जगाविरुद्ध लढू शकेल. पाण्यासाठी मोठे जलाशय असून ते पावसाळ्यात भरल्यावर पाणी वर्षभर पुरून उरते. टेकडीच्या माथ्यावर मोठे नगर वसले आहे. घरे सामान्य प्रतीची आहेत, दुर्गाच्या अत्युच्चभागी शिवाजीचा चौसोपी वाडा आहे, त्याच्या मध्यभागी मोठी वास्तू असून शिवाजी तेथून कारभार पाहतो."

या चौसोपी वाड्यात विवेक सभा, कल्याण महाल, प्रकट सभा तसेच अभिलेख (दफ्तर) महाल, विशेष (खास) मंदिर, अष्ट महाल, अष्ट कुलवधूस आणि राजकुंवरास, राजकन्येस महाल बांधून दिलेले होते.

याच वाड्यात ३२ मण भाराचे सुवर्ण सिंहासन होते. याच वाड्यातून १९ मे १६७४ दिवशी तीन मण भाराचे सुवर्ण घेऊन प्रतापगडास नेऊन तेथल्या भवानी देवीस अर्पण केले होते.

याच वाड्यात २९ मे १६७४ ते ५ जून १६७४ पर्यंत राज्याभिषेक समारंभ संपन्न झाला होता.

या वाड्यातला ला ७ मार्च १६८० या दिवशीचा राजाराम महाराजांच्या मुंजीचा कार्यक्रम नि त्यांचाच १५ मार्च १६८० चा विवाह समारंभ आनंदी सोहळा ठरला, आणि चैत्र शुद्ध पौर्णिमा शके १६०२ म्हणजे दि. ३ एप्रिल १६८० हा काळाकुट्ट आणि वेदनामय दिवसही निरंतर आपल्या उरी बाळगला तोही याच वाड्यानं ! १६८९ च्या ३ नोव्हेंबरला याच वाड्याने आपली लाडकी महाराणी येसूबाई आणि युवराज शाहू यांना मोंगलानी अभियुक्त (म्हणजे कैदी) बनवून नेल्याचे दृश्य पाहिले.

याच वाड्याला आपले छत्रपती राजाराम महाराज शत्रूच्या वेढ्यातून निसटून जात असल्याचे पाहणे दैवात असल्याचा अनुभवही आला होता.

तसेच इ.स. १७३३ पर्यंत त्याला सिद्दीच्या अधिपत्याखाली अपमान गिळीत जीवन कंठावे लागले होते हेही तो विसरू शकत नव्हता.

पेशवेकालातील सखारामबापू बोकील, मोरोबा फडणीस, सदाशिव नातू, शिवाजी कान्हो, सदाशिव रामचंद्र अशा श्रेष्ठ राजकीय मंडळीनासुद्धा आपल्या दक्षिणेला अगदी समीप असणाऱ्या कोठीत अभियुक्त (कैदी) म्हणून डांबून ठेवल्याचं याला माहीत होतं.

स्वराज्यात असतानाही होळकरांनी पेशव्यांवर चिडून रायगडाच्या परिसरात येऊन जाळपोळ केल्याचे वृत्तही याला ऐकावं लागलं होतं !

सवाई माधवरावांची पत्नी यशोदाबाई १४ जानेवारी १८११ या दिवशी तर प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांची पत्नी राणी काशीबाईसाहेब या १८ मार्च १६७४ दिवशी याच वाड्याच्या परिसरात मरण पावल्याची, आणि दोन राजघराण्यातील दोन भिन्न राण्यानी रायगडला धक्के देण्याचे कार्य केल्याची घटना या वाड्यानं मूकपणे सहन केली होती.

१० मे १८१८ दिवशी याला कर्नल प्रॉथर आणि मेजर हॉल या दोन इंग्रजांनी आपल्या अधिपत्याखाली आणून पारतंत्र्यातले जीवन जगण्याची पाळी आणली ती सतत १३० वर्षे !

१५ ऑगस्ट १९४७ ला रायगड पुनः स्वतंत्र झाला ! पण तोपर्यंत दुर्गाची महत्ता केव्हाच सरली होती.

नाही म्हणायला इ. स. १८९६ पासून लो. टिळकानी याच दुर्गावर शिवजयंती उत्सव प्रारंभ करून अल्पसे चैतन्य जागते ठेवले. एवढेच काय ते सुख ! परिणामतः याच्याकडे इतरांसारखे दुर्लक्ष होत राहिले नाही हाच काय तो आनंद !

असा हा रायगड !

पश्चिम सागरापासून केवळ ५० मैल दूर !

महाडपासून समीप !

महाडपासून राज्य परिवहनाच्या वाहनातून येण्यास निघावे. महाडपासून केवळ २४ कि. मी. अंतरावरचा हा दुर्ग आडवळणानेही पादाक्रांत करता येतो. छत्री निजामपूर पासून २६ कि. मी. दूर असणाऱ्या या दुर्गाकडे पायवाटेने येता येते. अथवा बिरवाडीपासून बैलगाडीने किंवा स्वतःचे वाहन असल्यास त्याने येता येते.

ज्याना दऱ्याखोऱ्यातून यायची इच्छा आहे अशांनी माणगावपासून पायवाटेने यावे.

महाडपासून २० कि. मी. अंतरावर कोंझर नावाचं गाव आहे. तिथून ४ कि. मी. पाचाड आहे. अर्थात ही चढण चढावी लागते. मगच या पाचाडपर्यंत येता येते, हवे तर तिथून यावं.

पाचाड ही एकेकाळची रायगडची पेठ ! शिवाजी महाराजांच्या पूज्य मातोश्री जिजाबाई यांचा वाडा इथं होता. त्यांची छत्रीही इथंच आहे. हवे तर जिजाऊंना वंदन करून तिथून येण्यास निघावे किंवा पाचाडवरून अथवा राज्यपरिवहन मंडळाच्या वाहनानेही चितद्वारापर्यंत यावे. पाचाड ते 'चितदरवाजा' हे अंतर जवळ जवळ ७ कि.मी. आहे. हे लक्षात ठेवून कसे यायचे ते ठरवावे.

आता गडाची चढण चितदरवाजापासून असली तरी या चित दरवाजापासून १ कि.मी. अंतरावर 'नाना दरवाजा' म्हणून एक प्रवेशद्वार आहे. एकेकाळी दुर्गाचा प्रवेश प्रारंभ तेथून होता. प्रत्यक्षतः हा "लहान दरवाजा" किंवा 'नाणे दरवाजा' या नावाने त्याकाळी परिचित असावा. दुर्गाच्या चढणीच्या मध्यभागी "महा दरवाजा" म्हणजेच दुर्गाचे "महाद्वार" आहे. त्यावरून हा लहान दरवाजा असावा हेच सत्य वाटते. पण आज या मार्गाने दुर्ग चढण्याचे कष्ट घेतले जात नाहीत. चितदरवाजाने दुर्ग चढत असले तरी प्रत्यक्षात तिथे कुठेही 'दरवाजा' नाही. केवळ पायऱ्या आहेत.

दुर्ग चढण्यास प्रारंभ करण्यापूर्वी बहुतेक व्यक्ती दुर्गाच्या या पायऱ्यांवर पाय ठेवण्यापूर्वी त्याना नमन करतात आणि मगच चढणीस प्रारंभ करतात. ही एक संस्कृती लक्षात घेणे योग्य होय.

काही अंतरावर 'खूब लढा बुरूज' लागतो. संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय सुयोग्य स्थळी याची निर्मिती केलेली आहे. उंची ८.२५ मीटर, घेरा १५.२५ मीटर एवढ्या आकाराचा हा 'बुरूज' खिंडीवर लक्ष ठेवण्यास उपयोगी पडत होता.

साधारणतः १.५ कि.मी. चढण चढल्यानंतर दोन उद्ध्वस्त वास्तूंचे अवशेष दृष्टीस पडतात, त्यापैकी एक १२ मीटर लांबीची वास्तू पहारेकऱ्यांचे निवासस्थान नि दुसरी वास्तू २२.४० मीटर लांब, ६ मीटर रुंद ही धान्य कोठारं असावीत असे मानतात.

अल्पशा अंतरावर 'मस्जिद मोर्चा' नावाचे स्थळ लागते. मुस्लिम सेवकांसाठी ही बांधली होती असे मानतात. पण आज तिथे कोणतेच अवशेष नाहीत मात्र समीपच 'मदनशहा' नावाच्या साधूची समाधी (कबर) आहे.



*महादरवाजा (तटबंदी)*

साधारणत: ४०० मीटर अंतर चढून गेल्यानंतर एका अस्तरात (खडकात) तीन गुहा खोदलेल्या आढळतात. यांचा उपयोग धान्य कोठार म्हणून केला जात असावा.

या कोठारापासून आणखी १०० मीटर अंतरावर रायगडचा 'महादरवाजा' लागतो.

दुर्गाचे हे 'महाद्वार' तसे सहजासहजी गाठता येत नाही. त्यासाठी आधी अत्यंत उंच पद्धतीच्या ३२ पायऱ्या चढाव्या लागतात. यदाकदाचित शत्रूला महाद्वारापर्यंत येण्याची संधी मिळाली तरी या इतर पायऱ्यांपेक्षा उंचीस अधिक असणाऱ्या पायऱ्यांनी शत्रूपक्षाची पुन: अधिक दमछाक करावी म्हणून तर त्या मुद्दाम निर्मिलेल्या आहेत.

दुर्गाचे महाद्वार सहजासहजी दृष्टीपथात येऊ नये अशा स्थानी निर्मिलेले आहे. उत्तराभिमुखी महाद्वार दोन प्रचड (बुरूजानी) कपिशीर्षकांनी अशा रीतीने बांधून काढलेय की त्या द्वारातून आत प्रवेश करण्यापूर्वी या कपिशीर्षकामध्ये असणाऱ्या जंग्यामधून होणारा गोळयांचा वर्षाव झेलावा लागे, नि यातून जगला वाचला तरच प्रवेश द्वारापर्यंत पोहोचण्याची शक्यता असे.

गंड-भैरुंडाची शिल्पे कोरलेली कमान, वर्तुळखंडी असून तत्कालीन स्थापत्यशास्त्रानुसार मुस्लिम स्थापत्य कलेचा प्रभाव पडलेली आहे. दुर्गावर जाण्यासाठी हे त्यातल्या त्यात महत्त्वाचे आणि एकमेव द्वार असल्याने याची संरक्षण व्यवस्था अशी आहे की हे द्वार कुठे आहे हे सहजासहजी शत्रूच्या लक्षात येऊ नये.

या महाद्वाराव्यतिरिक्त आणखी "वाघदरवाजा", भवानी आरोहणमार्ग 'चोरखिंडी' असे मार्ग आहेत. परंतु शिवकालातसुद्धा त्यांचा उपयोग अत्यंत अत्यल्प प्रमाणात केला जाई.

महाद्वाराच्या रक्षणासाठी ठेवलेल्या पहारेकऱ्यांच्या निवासाची व्यवस्था समीपच केलेली आढळते. या महाद्वाराच्या पश्चिमेस हिरकणी टोक, वायव्येय टकमक टोक आपल्यास साद घालीत असल्याचे जाणवेल. या महाद्वारापासून साधारणतः १.५ कि.मी. अंतर चालल्यानंतर गडाच्या माथ्यावर पोहोचायला होते.

पठारावर आल्यानंतर प्रथम मदारशहाची समाधी (कबर) लागते. पण ती मदारशहाचीच असावी का असा संशयही व्यक्तविला जातो.

या मदारशहाच्या समाधीस्थळासमीप एक कोरडे तळे दिसते, केवळ पावसाळ्यातच ते भरलेले असते. हत्ती तलाव म्हणून ते ओळखले जाते. त्याच्या काठावर एक लोहस्तंभ आहे. काहीजण म्हणतात तो हत्तींना बांधण्यासाठी होता, तर काही म्हणतात तो रायगडावर होऊन गेलेल्या प्रसिद्ध व्यक्तींच्या स्मरणार्थ उभारला असावा.

या हत्ती तलावासमीप जनपद परिषदेने बांधलेले विश्रामधाम आहे. तिथे आधी सांगून ठेवल्यास राहण्याची व्यवस्था होते. त्याच्या समीप उपाहारगृह आहे. आधी विश्रांती घेऊन मग गड पहायला निघावे.

प्रारंभ गंगासागरापासून करावा. १०० मीटर लांब ९० मीटर रुंद असा हा 'गंगासागर' शिवकालातील लोकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बांधला. त्यातून निघणाऱ्या दगडातून "बालेकिल्ल्या"तील वास्तू बांधून काढल्या आहेत या गंगासागराने मुख्य प्रासादाला आपोआप संरक्षण देण्याचे कार्यसुद्धा केले आहे.

गंगासागराच्या दक्षिणेला १०० मीटर अंतरावर दोन उद्ध्वस्त मनोरे आपले लक्ष वेधून घेतात. एकेकाळी पाच मजली असणारे हे मनोरे आता केवळ उसासे सोडत सुधारणेची वाट पहात भग्नावस्थेत उभे आहेत. द्वादशकोनावर उभे असणारे हे वास्तुस्तंभ संपूर्ण महाराष्ट्रात एकमेव प्रकारची वास्तूनिर्मिती आहे. १३ मीटर उंच असणाऱ्या या वास्तुस्तंभात (मनोऱ्यात) तांब्याच्या नळ्या असून त्या मध्यभागी असणाऱ्या जलस्तंभा (कारंज्या)स जोडलेल्या होत्या. या मनोऱ्यांना

जगदीश्वराच्या शिलालेखात "स्तंभ" म्हणून उल्लेखिले आहे. दुर्गप्राण (बालेकिल्ला) बाहेर असणाऱ्या या स्तंभातून त्यांच्या तळमजल्यामधून दुर्गप्राणात (बालेकिल्ल्यात) जाण्यास दगडी जिने बांधलेले आहेत.

हा दुर्गाचा प्राण म्हणजे त्यावेळच्या भाषेतला बालेकिल्ला !

मूळ दुर्ग पूर्व-पश्चिम २.५ कि. मीटर लांबीचा नि दक्षिणोत्तर रुंदी १.५ कि. मीटर अशा विस्ताराचा आहे. वायव्येला टकमक टोक आणि ईशान्येला भवानी टोक तर नैऋत्येला 'हिरकणी बुरूज' अशा अलंकारानी नटलेला हा दुर्ग बालेकिल्ल्यापासून पाहण्यास प्रारंभ करावा.

बालेकिल्याजवळ असणाऱ्या दोन स्तंभासमीप 'पालखी दरवाजा' आपले स्वागत करण्यास तत्पर असतो. ३२ पायऱ्यांचा जिना बालेकिल्यात जातो. हा 'पालखी दरवाजा' केवळ राजकुटुंबातील मंडळीसाठीच होता. या द्वाराच्या बाहेर पहारेकऱ्यांची निवासस्थाने होती. त्यामुळे या द्वाराने जाणाऱ्या येणाऱ्यावर लक्ष ठेवता येणे सहज शक्य होई

पालखी दरवाजापासून साधारणतः १५० मीटर अंतरावर दक्षिण दिशेला पुनः एक द्वार आहे. त्याला 'मेणा दरवाजा' म्हणतात. राजघराण्यातील स्त्रिया या द्वाराने सूर्यास्ताची शोभा पाहण्यास नि मोकळ्या हवेत फिरता यावे म्हणून या द्वाराचा उपयोग करीत.

'पालखी दरवाजा' आणि 'मेणा दरवाजा' मार्गाच्या पश्चिमेस सहा वाड्यांचे अवशेष आहेत. त्यांना 'राणीवसा' म्हणतात. शिवाजी राजांच्या राण्यांची ती निवासस्थाने होती. या वास्तूंचे वैशिष्ट्य म्हणजे मलनिःसारणासाठी केलेली अभिनव योजना होय !

या राणीवासाच्या पूर्वेला 'राजभवन' आहे. 'पालखी दरवाजातून बालेकिल्ल्यात प्रवेश केला की डाव्या हातास सिंहासनाकडे जाण्यासाठी एक मार्ग आहे. राजकीय कार्यालयाकडेही जाण्यासाठी येथूनच मार्ग होता. याच्या समीप पाणी साठवण्यासाठी दोन वाप्या (हौद) आहेत. या वाप्या ओलांडून गेले की महाराजांसाठी बांधलेला शौचकूप आहे. याच विभागात असणारी 'रत्नशाळा' पहायला विसरू नये ! याला कोणी कोणी 'खलबतखाना' म्हणतात ६ मीटर लांब ३ मीटर रुंद असणारी चिऱ्यांनी बांधून काढलेली ही वास्तू आजसुद्धा तेवढ्याच ताठ्याने उभी आहे. काही काही वेळा इथे गुप्त यंत्रणा (खलबते, योजना) केल्या जात नि पुढील आक्रमणासंदर्भात निर्णय घेतले जात, असे मानण्यात येते.

यानंतर पुनः राजभवनात प्रवेश करावा नि दुर्गामधले महत्त्वाचे स्थान पहावे !

राजसिंहासनाने पवित्र झालेली वास्तू, आता जिथे एक मेघडंबरी उभी करून सुशोभित करण्याचा प्रयत्न केलाय, ती या सर्व दुर्गप्राणाची – बालेकिल्याची महत्त्वाची भूमी !

साधारणतः ३२५ मीटर लांब नि १७५ मीटर रुंद असणारा हा भूखंड म्हणजे दुर्गाचा प्राण !

राजसिंहासनासमोर उभं राहून नेहमीच्या स्वरात जे काही बोलाल ते स्पष्टपणे दुदुंभीगृहा (नगारखाना) जवळ उभ्या असणाऱ्या व्यक्तीला सहज ऐकायला यावे, कोणत्याही कृत्रिम साधनांचा उपयोग करण्याची आवश्यकता भासू नये अशा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून ही वास्तू निर्मिलेय !

आधुनिक ध्वनीशास्त्राचा (अकौस्टिक्स) गंध नसणाऱ्या त्या वास्तूशिल्पीचे हे कौशल्य निर्विवादपणे आपणास आश्चर्यचकित करते.

या दुर्गप्राणाचे (बालेकिल्ल्याचे) पूर्व टोक म्हणजे दुंदुभीगृह (म्हणजे नगारखाना !) संपूर्ण दुर्गावर त्यातल्या त्यात सुस्थितीत असणारी, सर्वात उंच स्थानी भासणारी, सर्व दुर्गांवर लक्ष ठेवण्यास उपयुक्त ठरणारी वास्तू !

हे दुंदुभीगृह म्हणजेच राजवाड्याचे प्रवेशद्वार ! असणारे ३२ फूट उंच ६ फूट रुंद हे प्रवेशद्वार रेखीव भासते. भूतलापासून ६० फूट उंच असणारी ही वास्तू दोन माळे पद्धतीची (मजली) आहे.

दुर्गप्राणात सिंहासनाच्या मागे पश्चिमेला किंवा 'राणीवसा' वास्तूच्या पूर्वेला असणाऱ्या चौथऱ्यावर स्तंभाच्या अनेक चिन्हांनी आपण आश्चर्यचकित होतो. कारण चौथऱ्यावर काही गोल तर काही चौकोनी चिन्हे आहेत बहुधा ती खांबाच्या पायाची असावीत. ९१ कलमी बखरीत ज्याचा उल्लेख आहे तो अष्टकोनी महाल या स्थळी असावा असं अनुमान त्या चिन्हावरून काढता येतं. याच चौथऱ्यावर 'सदर' नावानं प्रसिद्ध असणारी दुसरी वास्तू होती असेही अनुमान काढता येते.

दुर्दैवाने 'सदर', अष्टकोनी महाल, सिंहासनस्थळ, 'राणीवसा', 'विवेकसभा' 'कल्याणमहाल' इत्यादी वास्तूपैकी एकावरसुद्धा छप्पर नाही. केवळ 'सिंहासन' स्थळी विटांच्या भिंती उभ्या असून, अन्य वास्तूंच्या भिंतीही पाहण्यासाठी सुद्धा उपलब्ध नाहीत ही आजची स्थिती आहे. इ. स. १७७३-७४ च्या कागदपत्रावरून असं अनुमान निघतं की राजवाड्यावर २० सहस्र कौलांची शाकारणी केली गेली. असाच शाकारणी केल्याचा अन्य उल्लेख इ. स. १८१३-१४ च्या कागदपत्रात आढळतो. राजवाडा सोडून अन्य वास्तूसाठी पेंढा, गवत, सायलीची पाने यांचा उपयोग केला जात असावा असे म्हणता येते.

दुंदुभी गृहातून (नगारखान्यातून) बाहेर पडले की वायव्येला मोठा माळ लागतो, यालाच होळीचा माळ म्हणतात. इथंच श्री शिवप्रभूंची पंचधातूंची सिंहासनाधिष्टित प्रतिमा आढळेल. समीप 'शिर्काई देवी' केवळ एका चबुतऱ्यावर अधिष्ठित असल्याचे आढळेल.

दुंदुभीगृहाच्या दक्षिणेस खालच्या पठारावर काही पडक्या घरांची जोती आणि भिंताडे आढळतील. ती अष्टप्रधानांच्या राहण्याची ठिकाणे होत. याच पठाराखाली १०० फूट खाली 'वाघ दरवाजा' तर वर कुशावर्त तलाव "महादेव मंदिर" नावाचे ठेंगणे देऊळ, कलुशा कब्जीचा वाडा, सेनाधिकाऱ्यापैकी काही अठरा कारखान्यांचे प्रमुख यांची घरे होती. गडावरील हा भाग सहजासहजी लक्षात न येण्यासारखा असल्यानं बहुतेक सर्व अधिकाऱ्यांसाठी हा निवडला असावा.

दुंदुभीगृहापासून होळीचा माळ ओलांडून पुढे आले की रायगडावरील भव्य पणनविभाग (बाजारपेठ) आपले लक्ष वेधून घेतो. पेठेमधून जाणारा १३ मीटर रुंदीचा पथ अशा पद्धतीने निर्माण केलाय की नैऋत्य दिशेकडून येणारा पाऊस या पणनविभागाचे काहीच वाकडे करू शकणार नाही. आग्नेयेस २२ वायव्येस २२ अशी पणनगृहे (दुकाने) निर्माण केली असली तरी ११ गृहानंतर दोन्ही दिशांना जाता यावे अशा पद्धतीने त्यांचे भाग केले आहेत. थोडक्यात अकरा पणनगृहांचा एक समूह असे चार समूह आहेत. यापैकी आग्नेय दिशेच्या समूहात एका दगडावर नागाचे शिल्प कोरलेले आहे. ते मुद्दाम पहावे. प्रत्येक पणनगृहाचे दोन भाग असून पहिला दर्शनी भाग तर दुसरा भांडारगृह म्हणून उपयोगात यावा अशी त्यांची रचना केलेली आढळते.

'बाजारपेठ' ओलांडून टकमक टोकाकडे यावे. भिरभिरता' वारा आपली तारांबळ उडवतो. वाटेत एक स्फोटकगृह (दारूखाना) आहे. सर्वसामान्य वसतीपासून दूर असे हे स्थळ आजसुद्धा पुष्कळ चांगल्या स्थितीत आहे. टकमक टोकावरून परत मागे येऊन जगदीश्वर मंदिराकडे येण्यास निघावे. वाटेत पुष्कळ उद्ध्वस्त जोती आढळतील. काही टाकी आढळतील. दुर्गावर पिण्याच्या पाण्याचा विपुल साठा हवा या दृष्टीने निरनिराळ्या स्थळी त्यांची निर्मिती केलेली होती.

जगदीश्वर मंदीर पूर्णतया तत्कालीन मुस्लिम स्थापत्यशैलीनुरूप बांधलेले आढळते. पूर्वाभिमुख मंदिराच्या पुढे असणाऱ्या अंगणात अर्धवट भग्न नंदी आहे. दक्षिण उत्तर दिशाना ओवऱ्या होत्या याची साक्ष देणाऱ्या भग्न अवशेषाकडे पहात मंदिरात प्रवेश करावा.

प्रत्यक्ष मंदीर १०.६ मीटर लांब ६.७ मीटर रुंद नि ५.५ मीटर उंच आहे. मुख्य द्वारावर मीनार-स्तंभ आहेत. शिल्पकाम मुस्लिम शैलीचे असल्याने एकदम संशयात पडायला होते.

या मंदिराच्या समोर दुर्गावरील महत्त्वाचं स्थान आहे. महाराजांची छत्री आपला डौल संभाळीत आपणाला खुणावत असते. चिरेबंदी अष्टकोनी चौथरा त्यावर महाराजांची स्मृती म्हणून उभी असणारी चौकोनी वर निमुळती होत जाणारी शिळा आपणास नतमस्तक व्हायला लावते. क्षणभर आपण आपणास विसरून जातो. समाधिसमीप वाघ्या कुत्र्याचे स्मारक आहे. दक्षिणेला ओवऱ्या आहेत त्या ओवरीत क्षणभर बसावे. शिवस्वरूप आठवावे नि पुनः नतमस्तक होऊन मागे फिरावे..

या समाधिसमीप इतर राज्यांचे प्रतिनिधी यांची निवासस्थाने "बाराटाकी" "दारूकोठ्या" इत्यादी अवशेष आहेत. पण त्याकडे दुर्लक्ष करावे नि परतीची वाट धरावी.

हवे तर हिरकणी बुरूजाकडे यावे मात्र तेथून रायगडावरचा सूर्यास्त पाहण्यासाठी अवश्य थांबून सूर्यास्त पहावा. सकाळी लौकर उठून होळीच्या माळावर यावे. शिवप्रतिमाची पार्श्वभूमी साधून सूर्योदय पहावा. आनंद लुटावा. मन प्रसन्न झालेलं असतं.


प्रसन्न मनानं दुर्ग उतरावा कवी सोपानदेव चौधरींच्या ओळी आठवीत म्हणत जावे ---

सह्याद्रीच्या लिपीत लिहला वीरश्रीचा इतिहास
पूज्य समाधी विरामचिन्हे संतजनांचा सहवास
शौर्य धैर्य त्यागाने ज्यांच्या भूषविले तुझिया विभवा
शक्ति आणखी भक्तीचा हा इथेच जुळला खरा दुवा !
हीच प्रभूची पूजा
जय जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र माझा

सचेतनासी द्याया मसलत, अचेतनाला फुटे गिरा
मराठमोळ्या ! तुला सांगतो रायगडाचा चिरा चिरा,
इथे पताका आणिक भाला ताल मृदंगा ढाल चढे
वारकऱ्याचा धारकरी हो रक्तांचे शिंपून सडे
जय महाराष्ट्र गर्जा,
जय जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र माझा
सकल गुणांचा राजा !
(सकल गडांचा राजा)

मराठी ग्रंथ संग्रहालय
दाखल ७९०
क्र. २८३२५
रुपये
(स्थळ)

●●●



REFBK-0028327
REFBK-0028327

छत्रपती शिवरायांची समाधी

## दुर्ग —

जणू महाराष्ट्राचं, स्वराज्याचं स्पंदन.

आपल्या आसमंताचं रक्षण करण्याचं ब्रीद घेतलेला प्रहरी.

अस्पष्ट का होईना पण स्वराज्याचा हुंकार ऐकण्यास आसुसलेला एक सेवक.

– नव्हे, एका शककर्त्या राष्ट्रपुरुषाचा जन्म आपल्यावर झाल्यानं पुलकित होणारा, परंतु स्वराज्याची सेवा करायची संधी एकदाही न मिळाल्यानं खिन्न असणारा **शिवनेरी** !

– छे! महाराजांवर जीवघेणा प्रसंग कोसळला असताही त्यातून यशस्वीरित्या निसटून जाण्यात त्यांना यश आल्याचे पाहून सुखावणारा **पन्हाळा**!

– का म्हणू या 'गो ब्राह्मण प्रतिपालक क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधीश छत्रपति' म्हणून प्रसिद्धीस येणाऱ्या महाराजांचे प्रताप जगभर घुमवीत ठेवणारा **प्रतापगड** ?

– नाही, तसंच काही नाही, स्वराज्याची संकल्पना मूर्त स्वरूपात येत चाललेय हे सातत्यानं पंचवीस वर्षे न्याहाळणारा मूर्तिमंत साक्षी **राजगड** च!

– अहो, धर्मकारण आणि राजकारण यांचा सुरेख संगम असल्याने जिथल्या स्वराज्याचे सुराज्य झालेले पाहण्याचे सुदैव ज्याला लाभले तो **सज्जनगड** तर नव्हे ना?

– असेल, पण कधी परकीयांचे दास्यत्व स्वीकारून स्वराज्याशी द्रोह करणारा, परंतु उपरति होताच स्वराज्यात येण्यास उत्सुक असणारा **सिंहगड** म्हणजे तरी कोण?

– "तो तर हिंदवी स्वराज्य अवतरले हो!" अशी गर्जना करीत स्वराज्यसंस्थापकाच्या शरीराची कण अन् कण धूळ निष्ठेने नि आदराने अंगावर मिरवण्यात स्वतःला कृतकृत्य मानणारा **रायगड**!

असे हे दुर्ग! त्यांचा हा परिचय, त्यांचे वर्णन!

**इंप्रेशन्स**

**पब्लिशिंग हाऊस**

३३६०/४, गोंधळी गल्ली, बेळगाव-५९० ००२. दूरध्वनी : ४२१३०९